
१९६५९
म. ग्रं. सं. ठाणे
विषय व्यापार
सं. क्र. १–२–०

REFBK-0014446



# जवाहर दर्शन

मराठा ग्रंथ संग्रहालय, ठाणे. स्थळप्रत.
अनुक्रम 35638 वि: चरित्र
क्रमांक 2228 नोंद दि: 24455

संपादक

क्रु. भा. बाबर

मूल्य दोन रुपये

REFBK 0014446
सूर्य REFBK-0014446

मराठी ग्रंथ संग्रहालय ठाणे
ग्र. क्र. 98886

जवाहर दर्शन

पहिली आवृत्ती

२६ जानेवारी १९६५

मूल्य दोन रुपये

प्रकाशक

शामकान्त बनहट्टी

सुविचार प्रकाशन मंडळ

४६१।४ सदाशिव, पुणे २

धनतोली, नागपूर १

मुद्रक

चिं. स. लाटकर

कल्पना मुद्रणालय

‘ शिव-पार्वती ’

४६१।४ सदाशिव, पुणे २

# प्रास्ताविक

'जवाहरदर्शन' हे पुस्तक मी दोनतीन महिने मेहनत घेऊन तयार केलेले आहे. ह्यामध्ये माझे असे काही नाही. पण पंडित जवाहरलाल नेहरू यांचे दर्शन चांगल्या प्रकारे घडावे म्हणून लोकांनी त्यांच्यासंबंधी सांगितलेल्या गोष्टी यामध्ये दिलेल्या आहेत. वेगवेगळे प्रसंग निवडून ते एकत्र केलेले आहेत. मी फक्त संकलनकार झालो आहे. स्वतः जवाहरलालजींनी लिहिलेल्या आत्मचरित्रातूनही काही प्रसंग निवडलेले आहेत. त्यासाठी इंग्रजी, मराठी व हिंदी पुस्तके, मासिके व वर्तमानपत्रे यांचा उपयोग करावा लागला आहे. ज्यांच्या लेखनाचा मी उपयोग केला आहे, त्या सर्वांचा मी अत्यंत ऋणी आहे.

'दर्शन' हे पवित्र स्वरूपाचे असते. ते घेताना एक प्रकारचा आदरभाव घेणाराच्या मनामध्ये असतो. पण काही झाले तरी ते थोडे दुरूनच असते. मी पंडितजींचे हे असे दर्शन घेतले आहे, आणि ते इतरांनाही घडावे म्हणून त्यांच्या जीवनातील प्रसंग निवडण्याचा प्रयत्न केलेला आहे. पंडितजी हे आपल्या देशातील फार मोठे थोर पुरुष होऊन गेले. कित्येक शतकात एवढा मोठा माणूस झालेला नाही. तेव्हा त्यांचे हे दर्शन कोणालाही सुखावह होईल, असे मला वाटते.

'सुविचार प्रकाशन'चे तरुण व उत्साही चालक श्री. राजेंद्र बनहट्टी यांच्या इच्छेवरून मी हे लहानसे पुस्तक तयार केलेले आहे, त्यांच्या ह्या इच्छेलाही ह्या पुस्तकाचे काही श्रेय द्यावेच लागेल. आणि कल्पना मुद्रणालयाचे चालक श्री. लाटकर यांनी ते चांगले छापून दिल्याबद्दल त्यांचेही आभार मानणे जरूर आहे.

१४८६ सदाशिव पेठ, पुणे २
दिनांक २६ जानेवारी १९६५

सर्वांचा नम्र
कृ. भा. बाबर

## अनुक्रम


| | | |
|---|---|---|
| १ | स्वतः घडविलेले | १ |
| २ | वहिणीने घडविलेले | २३ |
| ३ | इतरांनी घडविलेले | ३५ |

मराठा ग्रंथ संग्रहालय, ठाणे. स्थळप्रत.
अनुक्रम ३८६३५ वि: चरित्र
क्रमांक १२२८ नों. दि. २५।६।८५

१

# स्वतः घडविलेले

स्थळप्रत.
अनुक्रम ......... दि: .........
वर्ग ......... दि .........

## शिकारीची हौस !

शिकारीसारख्या करमणुकीत मी भाग घेत असे. पण त्यात मी फारसा वाकबगार नव्हतो आणि मला त्यात विशेष गोडीही वाटत नसे. मोकळ्या हवेची आणि अरण्याची मौज अनुभवावयास सापडे एवढेच त्यात मला समाधान होते. शिकारीची आस्था मी कधी बाळगिली नाही. अहिंसावादी म्हणूनच माझी विशेषतः ख्याती होती. तरी पण काश्मिरात एकदा चुकून माझी गोळी बरोबर लागली व तिला एक अस्वल बळी पडला !

शिकारीची जी काय थोडीबहूत आवड माझ्या ठिकाणी होती, तीसुद्धा एका लहानशा प्रसंगाने नाहीशी झाली. एकदा एक लहान निरुपद्रवी हरणीचे पाडस माझ्या गोळीने जिव्हारी घायाळ होऊन पडले; आणि अश्रूनी डबडबलेल्या आपल्या टपोऱ्या डोळ्यांनी त्याने माझ्याकडे दृष्टि वळविली. ते डोळे मला अद्यापि कधी कधी दिसतात !

## नीतिनियमांतील अंतर

पंडीतजी म्हणतात, " राजकारणाशी थोडासुद्धा संबंध नसलेल्या एका लहानशाच प्रसंगामुळे श्रीनिवास शास्त्र्यांच्याबद्दल मात्र मला फार आश्चर्य वाटले. विद्यार्थ्यांच्या सभेत अलाहाबादला त्यांचे भाषण चालले होते. ' आपल्या शिक्षकांच्या व आचार्यांच्या आज्ञा माना, त्यांच्याबद्दल आदरबुद्धी राखा आणि अधिकाऱ्यांनी घालून दिलेले नियम व शिस्त मोठ्या दक्षतेने पाळीत जा ' वगैरे उपदेश त्यांनी केला. हा गुळमुळीत उपदेश मला फारसा पसंत पडला नाही. तो शिळा तर होताच, पण त्यात जीहुकूमवृत्तीवर भर दिलेला असल्यामुळे मला तो अनिष्टही वाटला. हिंदुस्थानात सगळीकडे अर्धवट नोकरशाही कल्पनांचाच जोर असल्याकारणाने असे विचार प्रकट होत असतील

अशी माझी समजूत झाली. पण श्रीनिवास शास्त्र्यांनी पुढे आणखी असाही मंत्र दिला की, 'आपले वर्गबंधु बुद्ध्या किंवा अबुद्ध्या जे काही आज्ञा भंग करतील, त्यांची खबर वरिष्ठांना ताबडतोब देत जा.' निराळ्या शब्दांत सांगावयाचे म्हणजे एकमेकावर पाळत ठेवून गुप्तहेरांचे काम करीत जा. अगदी हेच असेच शब्द शास्त्र्यांनी उच्चारले नाहीत, पण त्यांचा आशय हाच होता. एका थोर पुढाऱ्याने केलेला हा उपदेश ऐकून मी अगदी थक्क होऊन गेलो! नुकताच मी इंग्लंडहून परत आलो होतो. तेथल्या शाळाकॉलेजात मी जर कोणता धडा घटविला असेल, तर हा की वर्गबंधूंचा विश्वासघात केव्हाही करू नये. वळचणीला उभे राहून चोरून ऐकावे, वर्दी द्यावी आणि सहाध्यायाला गोत्यात आणावे, शिष्टाचाराविरुद्ध यापेक्षा मोठे पाप नाही. हे तत्त्व हिंदुस्थानात आल्याबरोबर एका झटक्यासरशी उलटे पालटे झालेले पाहून माझे मन क्षुब्ध झाले. मला वाटले, मला शिकविलेले नीतिनियम आणि शास्त्र्यांचे नीतिनियम यांच्यामध्ये केवढे हे अंतर!

## हिमालयातील साहस

१९१६ साली काश्मिरातून हिमालयामध्ये प्रवास केला त्या संबंधाची गोष्ट.... या प्रवासात एक रोमांचकारी प्रसंग अनुभवावयास सापडला. 'झोजीला' घाट चढल्यावर 'मातायान' पाशी आम्हांला कळले की अमरनाथची गुहा फक्त आठ मैलच दूर राहिली आहे. हिमाच्छादित एक मोठा पर्वत वाटेत आडवा होता हे खरे, पण त्यात काय मोठेसे? आठच तर मैल सारे अंतर. जोमाच्या भरात आमच्यासारख्या अननुभवी माणसांनी ठरवले की अमरनाथला जायचे. ११५०० फूट उंचीवरचा तळ सोडून आम्ही थोडेजण पुढे निघालो. वाटाड्या म्हणून एक स्थानिक धनगर बरोबर घेतला होता.

कमरेला दोऱ्या बांधून कित्येक हिमनद्या चढून गेलो. कित्येक ओलांडल्या. पण त्रास फार व्हायला लागला. श्वासोच्छ्वास करणेही कठीण पडू लागले. आमच्या हमालाच्या पाठीवर थोडेसेच सामान होते, तरीही त्यांच्या नाकातून रक्त वाहू लागले. हिमनद्यांची पात्रे कमालीची घसरडी झाली. आम्ही अगदी थकून गेलो. एकेक पाऊल मोठ्या मुष्किलीने पडत होते. तरी पण आमचा मूर्खपणाचा बेत आम्ही सोडला नाही. सकाळीं चार वाजता आम्ही तळ

सोडला होता. जवळ जवळ बारा तास एकसारखे चढल्यावर आम्हांला एक हिमाच्छादित मैदान लागले. तेथील देखावा मात्र उदात्त रम्य होता. हिमशिखरांनी वेष्टित असा तो भूभाग रत्न खचित मुकुटाप्रमाणे अथवा स्वर्गातील देवतांच्या क्रीडांगणाप्रमाणे शोभत होता. बर्फ व धुके अधिकच पडू लागले तसा तो देखावा दिसेनासा झाला. आम्ही किती उंचीवर होतो कळले नाही, पण बहुधा १५ ते १६ हजार फूट उंचीवर ती जागा असावी. कारण अमरनाथाच्या गुहेच्या बरेच वर आम्ही उभे होतो. आम्हांला आता अर्धा-एक मैलाचा तो बर्फमय प्रदेश ओलांडायचा होता. मग खाली गेले की अमरनाथ. चढ संपल्यामुळे आता त्रास संपला असे आम्हांला वाटले. साहजिकच शरीर थकले होते तरी मनाला हुशारी वाटू लागली व आम्ही पुढे पाऊल टाकले. जमीन फार फसवी होती. वाटेत अनेक चर होते व नुकत्याच पडलेल्या बर्फाने काही धोक्याच्या जागा झाकून गेल्या होत्या. ह्या बर्फापायीच इतिश्री होण्याचा प्रसंग मजवर येऊन ठेपला. बर्फ पाहून पाय टाकला तो बर्फाचा पापुद्रा पायाखाली फाटून मी एका प्रचंड चराच्या जाभाडात गडप झालो. फार मोठी अशी ती भेग होती. तिच्या तळाशी वस्तू गेली की ती काही युगे तरी सुरक्षित राहणार याविषयी शंका घेण्याचे कारण नव्हते ! पण माझा तोल सुटला नाही. त्यामुळे चराच्या कडांना मी घट्ट धरून ठेवले. मग मला वर खेचण्यात आले...अमरनाथाचे दर्शन काही घडले नाही.

## नाभा संस्थानातील अटक

१९२३ सालची गोष्ट. नाभा संस्थानच्या अधिपतीला काढून टाकून एक ब्रिटिश अधिकारी तेथे नेमला होता. महाराजांना काढून टाकल्यामुळे त्या कृत्याविरुद्ध शीख लोकांनी निषेध चालवला होता. संस्थानांतील जैतो या ठिकाणच्या धार्मिक उत्सवाला लोकांना बंदी करण्यात आली होती. याचा निषेध म्हणून शिखांनी जैतोकडे आपले जथे पाठविण्यास आरंभ केला. पोलीस लोक ह्या जथ्यांना झोडपून काढीत, अटक करीत व दूर जंगलात नेऊन सोडीत ... हा जथा पाहण्यास मला निमंत्रण आले होते. मी, ए. टी. गिडवानी व मद्रासचे के. संतानम् मिळून गेलो. संस्थानात गेल्यावर आम्हांलाही अटक करण्यात

आली; व एका पोलीस कोठडीत नेण्यात आले.

सर्व दिवसभर आम्ही कोठडीतच होतो. संध्याकाळीं आम्हांला पायी स्टेशन-वर नेण्यात आले. मला व श्री. संतानम् यांस जोडून हातकड्या घालण्यात आल्या होत्या. त्यांचे डावे मनगट माझ्या उजव्या मनगटाशी जखडले होते. व बेड्यांना जोडलेली साखळीं धरून पोलीस आमच्या पुढे चाललेला होता. गिडवानींनाही हातकड्यांनी व साखळीने बांधून मागून आणण्यात येत होते' जैतोच्या रस्त्यातून निघालेली आमची ही मिरवणूक पाहून मला साखळीला बांधलेल्या कुत्र्याची आठवण झाली. प्रथम आम्ही थोडेसे चिडलो पण नंतर परिस्थितीतील विनोदाची गोडी आम्हांला उमगून आली व एकंदरीत तो अनुभव मोठा मजेदार वाटला. पण रात्री मात्र मजा वाटली नाही. अर्धी रात्र खच्चून भरलेल्या तिसऱ्या वर्गाच्या डब्यात व अर्धी नाभा शहराच्या कोठडीत गेली. दुसऱ्या दिवशी दुपारी नाभाच्या तुरुंगात आम्हांला डांबीपर्यंत ह्या जोड हातकड्या व अवजड साखळी आमच्याबरोबर होती. दुसऱ्याचे सहकार्य असल्याशिवाय कोणालाच हालचाल करता येत नसे. हा अनुभव पुन्हा मिळावा अशी काही इच्छा होत नाही.

नाभाच्या तुरुंगात आम्हां तिघांना अत्यंत कोंदट व गलिच्छ अशी खोली देण्यात आली होती. ती लहान तर होतीच, पण शिवाय तिला ओलही होती. छप्पर आमचा हात लागेल इतके ठेंगणे होते! रात्री जमिनीवर निजलो की, मी चाळवून उठत असे व पाहावे तो एखादी घूस अथवा उंदीर माझ्या तोंडावरून गेलेला असायचा! ...

काही दिवस खटला चालून आम्हांला शिक्षा देण्यात आली पण ती अमलात न आणताच सोडून देण्यात आले!

## आम्ही आरंभशूर आहोत!

१९२७ सालच्या अखेरीस मी युरोपातून परत आलो. ह्या वर्षी कॉंग्रेसचे अधिवेशन मद्रासला भरणार होते आणि मला ह्या अधिवेशनाला हजर राहावयाचे होते. ...

ह्या अधिवेशनात मी पुन्हा एकवार कॉंग्रेसचा चिटणीस निवडला गेलो. त्याला वैयक्तिक कारणे होती. कॉंग्रेसचे त्या वर्षीचे अध्यक्ष डॉ. अन्सारी ह्यांचा

व माझा दाट स्नेह होता. शिवाय माझे बरेचसे ठराव पास झालेले असल्याकारणाने ते तडीला नेणेही अवश्य झाले होते ...

कॉंग्रेसची पर्वणी साधून नेहमी पुष्कळच इतर समारंभ उरकण्यात येत असतात. अशांपैकी एक समारंभ म्हणजे मद्रास येथे भरलेली लोकसत्ता-परिषद ( रिपब्लिकन कॉन्फरन्स ). तिचे अध्यक्षपद स्वीकारण्याची मला विनंती करण्यात आली. मी लोकसत्तावादी असल्यामुळे मला ही कल्पना ग्राह्य वाटली. पण ह्या परिषदेचे सूत्रचालक कोण ते मला ठाऊक नव्हते. एखाद्या उपटसुंभ संस्थेशी संबंध जोडण्याची माझी तयारी नव्हती. त्यामुळे अध्यक्ष व्हावे की नाही याबद्दल माझा निश्चय होईना. अखेरीस मी अध्यक्ष झालो. पण मला पश्चात्ताप करण्याची पाळी आली. पुष्कळ संस्थांप्रमाणे ही परिषदही उपजल्याबरोबर मेली! आपले लोक नवी नवी कामे सुरू करण्याच्या कामात अतिशय उतावळेपणा दाखवितात; पण नंतर सुरू केलेल्या कामांकडे दुर्लक्ष करून त्यांना गंगेत सोडून देतात, ही वृत्ती मोठी विलक्षण आहे. आम्ही आरंभशूर आहोत, आमच्यांत चिकाटी नाही, हा जो आरोप आम्हांवर करण्यात येतो, त्यात बराच तथ्यांश आहे.

## लाठीचा प्रसाद

सायमन कमिशनच्या वेळची गोष्ट. कमिशनवर बहिष्कार घालावयाचे ठरले होते. मी त्यासाठी लखनौला गेलो होतो.

वाहतुकीला अडथळा येतो ह्या सबबीवर मिरवणुकींना बंदी करण्यात आली होती. ह्या बाबतीत तक्रारीला जागा राहू नये म्हणून आम्ही सोळा सोळांचे गट करून सभेच्या जागी आडरस्त्याने, पृथक्पणे जावयाचे ठरविले. कायद्या-प्रमाणे पाहिले तर हुकूम मोडण्याचाच हा एक प्रकार होता. कारण सोळा इसम एक निशाण घेऊन निघाले म्हणजे ती मिरवणूक झाली. एका गटाचा मी नायक होतो. पुष्कळ अंतर टाकून माझे सहकारी गोविंद वल्लभ पंत यांच्या नेतृत्वाखाली दुसरा एक गट येत होता. आम्ही सुमारे २०० यार्ड चालून गेलो. रस्त्यावर एकही माणूस दिसत नव्हता. इतक्यात पाठीमागून घोड्यांच्या टापांचा आवाज ऐकू आला. आम्ही वळून पाहिले तो ३०-३५ स्वार-शिपायांची टोळी मोठ्या वेगाने आमच्याकडे चाल करून येताना दिसली.

थोड्याच वेळात ते आमच्यापाशी येऊन भिडले. त्यांच्या हल्ल्यामुळे आमच्या गटाची पांगापांग झाली. नंतर आमच्या स्वयंसेवकांना मोठमोठ्या दंडुक्यांनी व लाठ्यांनी झोडपून काढण्यास घोडेस्वारांनी सुरुवात केली. तो मार चुकवण्यासाठी स्वयंसेवक स्वाभाविकपणे रस्त्याच्या कडेला सरकले. काही जण तर बाजूच्या लहान दुकानांतूनही शिरले. त्यांचा पाठलाग करून त्यांना मार देण्यात आला.

घोडेस्वारांचा हल्ला आपल्यावर येत आहे असे पाहताच स्वतःचे रक्षण करण्याची सहज प्रेरणा माझ्याही मनात जागृत झाली. हल्ला पाहून धीर सुटला. परंतु दुसऱ्या कोणत्या तरी सहज प्रेरणेने मला त्या विचारापासून परावृत्त करून तेथेच थांबविले असावे. अशा मनस्थितीत पहिल्या हल्ल्याला तर मी तोंड दिले. ... इतक्यात मी मागे वळून पाहिले. तो एक घोडेस्वार आपली लांब काठी परजीत माझ्याकडे दौडत येताना दिसला. 'चालू दे तुझे काम' असे मी त्याला म्हणालो आणि माझे डोके जरा बाजूला वळविले. सहज प्रेरणेनेच डोके व तोंड बचावण्यासाठी मी हा प्रयत्न केला. त्याने माझ्या पाठीवर दोन सणसणीत रट्टे लगावले. मला भोवळ आली. व माझे सर्व अंग थरथरू लागले. आश्चर्याची व समाधनाची गोष्ट ही की, मी त्याही स्थितीत तसाच उभा राहिलो होतो ... पंत तुकडीसह आम्हांला येऊन मिळले. त्यांनाही मार बसला होता.

दुसरे दिवशी अगदी सकाळीं आम्ही मिरवणूक घेऊन स्टेशनवर जाण्याची तयारी करीत होतो. इतर कशानेही झाली नसती इतकी जागृती लखनौमध्ये आदल्या दिवशीच्या प्रसंगाने झाली होती...हजारो माणसे चारचारच्या रांगा धरून चालली होती. आम्ही ह्या मुख्य मिरवणुकीत होतो...सरकारी पायदळ व घोडदळ यांची मैदानावर गर्दी झाली होती...घोडदळाच्या किंवा स्वार शिपायांच्या दोन तीन लांबलचक रांगा आमच्या बाजूला वेगाने येत होत्या. लोकांना तुडवीत घोडदळांच्या रांगा गेल्या. कांहींना हालचालदेखील करता येत नव्हती व काही दुःखाने कळवळत होते ! सर्व मैदानाचा देखावा एखाद्या रणक्षेत्रासारखा दिसू लागला...घोडदळाची लाट आमच्या अंगावर आली व त्यांच्या पहिल्या रांगेची जवळ जवळ दौडती धडक आमच्या मिरवणुकीच्या पुढच्या भागी असणाऱ्या लोकांवर येऊन आदळली. आम्ही

जागा सोडली नाही. आम्ही हटत नाहीसे पाहिल्यावर शेवटच्या क्षणाला घोड्यांचे लगाम खेचण्यात आले. त्यामुळे घोडे मागच्या पायांवर उभे होऊन त्यांचे पुढचे पाय आमच्या डोक्यांवर अंतराळी थयथयू लागले. नंतर मारपिटीला सुरुवात झाली. लाठीचे व दंडुक्याचे तडाखे उडू लागले...इतक्यात मला कुणीतरी अलगद उचलून लांब नेले...आवेशाचा क्षण निघून गेल्यावर सर्व शरीरात ठणका सुरू होऊन अतिशय ग्लानी आल्याप्रमाणे वाटू लागले. सर्व अंगभर मुका मार बसला होता व वळ उठले होते !

## भक्तिभावाचा उत्कर्ष

ऐन तारुण्यात वयाच्या ४० व्या वर्षी १९२९ सालच्या डिसेंबरच्या अखेरीस लाहोर येथे भरलेल्या अखिल भारतीय कॉंग्रेसचे अध्यक्षपद पंडित जवाहरलाल नेहरू यांना लाभलेले होते. देशाच्या संपूर्ण स्वातंत्र्याचा ठराव त्यांनीच पास करून घेतला. ह्या प्रसंगाच्या आठवणीत पंडितजी लिहितात :—

" लाहोर कॉंग्रेसचे चित्र माझ्या स्मृतिपटावर अगदी स्पष्ट व भडक रंगात रंगविले गेले आहे. ही गोष्ट स्वाभाविकच होय. कारण तेथे अग्रपूजेचा मान मला मिळालेला होता व अधिवेशनाच्या केंद्रस्थानी माझी स्थापना झालेली होती ... लाहोरच्या जनतेने माझे जे भरगच्च स्वागत केले, ते विसरणेच शक्य नाही. स्वागताचा थाट मोठा व त्यातील जिव्हाळा गाढ होता... अध्यक्षस्थानी माझी योजना झाली ही मातब्बरी क्षुल्लक नव्हे. माझे मन भरारू लागले. जणू काय ते माझा पार्थिव देह सोडून विहरत होते ! तथापि माझ्या ह्या मानसिक प्रतिक्रियांची किंमत विशेष नव्हती. फार मोठे प्रश्न उपस्थित झालेले होते. सर्व वातावरण गंभीर व आतुर होऊन गेलेले होते ... युद्धाच्या फेरी झडू लागायच्या होत्या. सर्व देश त्यामुळे हादरणार असून लाखो लोकांच्या जीवनावर आमच्या निर्णयाचा ठसा उमटणार होता. ...

" स्वातंत्र्याची व स्वातंत्र्य युद्धाची प्रगती व्हावी म्हणून संकल्पित कार्याच्या ठरावाला जवळ जवळ एकमताने पाठिंबा मिळाला. हजारो लोकांपैकी पंधरावीस लोकांनी विरुद्ध मत दिले. योगायोग असा की जुने वर्ष संपून नव्या वर्षाचे पाऊल उंबरठ्यावर असताना म्हणजे ३१ डिसेंबर रोजी रात्री बरोबर १२ च्या ठोक्याला हा मुख्य ठराव मंजूर करण्यात आला. कॉंग्रेसने

सरकारला दिलेली एक वर्षाची मुदत संपली न संपली तोच नवा निर्णय ठरला व लढ्याची सिद्धता सुरू झाली. चाके फिरू लागली. पण सुरुवात कोठे व कशी करावी ह्याची अटकळ अद्यापि आलेली नव्हती...

"शेकडो यात्रेकरू आमच्या घराकडे येत. आमचे घर भारद्वाजतीर्थाच्या जवळच होते........ काँग्रेसचे जय शब्द त्यांच्या चांगले परिचयाचे झाले होते; त्यांच्या योगाने आमचे सारे घर दणाणून जाई. सकाळपासून मी पाच पंचवीस माणसांच्या एका एका गटाला चार शब्द सांगत असे. पण अशा प्रकारे एकसारखे बोलत राहणे शक्तीबाहेरचे काम झाल्यामुळे मी त्यांचे स्वागत फक्त नमस्काराने करू लागलो. यालाही काही मर्यादा होतीच. तीही लवकरच संपली. तेव्हा मी बाहेर तोंड दाखविण्यासही टाळू लागलो! पण माझा बेत निष्फळ झाला. जयशब्द अधिकच उच्च स्वरात गर्जू लागले. घराच्या व्हरांड्यातून व दारेखिडक्यांतून लोक डोकावू लागले. काम, वाचन, फार काय जेवणसुद्धा अशक्य होण्याची वेळ आली. त्यामुळे मनाला संकोच तर वाटेच, पण चीडही येई. पण पिढ्यान्पिढ्या दारिद्र्य व कष्ट सोशीत आलेले ते लोक! किती स्नेहनिर्भर दृष्टीने ते पाहत असत! केवळ सहानुभूती व बंधुभाव त्यांना हवासा वाटतो. तेवढे दाम पटले की बस्स! कृतज्ञतेचे व प्रेमाचे माप भरभरून ते आपल्या दारी ओतण्यास तयार असतात. प्रेमाचा व भक्तिभावाचा हा उत्कर्ष पाहिला की मन अवनम्र झाल्याशिवाय राहत नसे."

## लोकांकडून चाललेली पूजाअर्चा!

लाहोर काँग्रेसचे अध्यक्षपद भूषवून पंडित जवाहरलाल नेहरू परतल्यावर घडलेला प्रसंग:—

आमच्या एक निकट स्नेहातल्या बाई त्या वेळी आमच्या घरीच राहावयास आल्या होत्या. पाच पाच मिनिटांनी मला बाहेर जाऊन, आलेल्या लोकांशी चार शब्द बोलावे लागत असल्यामुळे त्या बाईशी धड बोलायलाही मला सापडेना. माझी तारांबळ पाहून त्यांना मौज वाटली. माझ्या लोकप्रियतेचे त्यांना कौतुकही वाटले असावे. त्यांनी सरळ प्रश्न टाकला, "लोकांकडून ही पूजाअर्चा चाललेली आहे, ती तुम्हांला कशी काय वाटते? मनाला मोठा अभिमान

मराठी ग्रंथ संग्रहालय ठाणे. स्थळप्रत.
अनुक्रम ...३८६३७ दि:
क्रमांक ...९२२५ नों दि...



वाटत असेल, नाही ?" मी जरा घुटमळलो. तेव्हा त्यांना वाटले, की आपण अगदी रोकडा प्रश्न टाकल्यामुळे मी संकोचलो असेन. म्हणून त्यांनी असला प्रश्न विचारल्याबद्दल दिलगिरी प्रदर्शित केली. संकोच वगैरे मला मुळीच वाटला नव्हता. प्रश्नाचे उत्तर मला सुचेना. माझे विचार पांगले व मी स्वतःच्या भावनांचे व प्रतिक्रियांचे परीक्षण करू लागलो. त्यांचे स्वरूप फार संमिश्र होते.

एकाएकी असामान्य लोकप्रियता माझ्या वाट्याला आली होती हे खरे. बुद्धिजीवी वर्ग माझे कौतुक करीत होता. आणि तरुण स्त्रीपुरुष तर मला विभूतीप्रमाणे मान देत असत. त्यांच्या डोळ्यांना अदभुतरम्य कथांची प्रभा माझ्याभोवती पसरलेली दिसे. माझे विरोधकही माझ्यासंबंधी चांगलेच बोलत व कर्तृत्वाची व तळमळीची वाण माझ्या ठिकाणी नाही अशी कबुली ते उदार मनाने देत...तथापि आपल्या ठिकाणी असणाऱ्या कर्तृत्वशक्तीत असामान्य असे काही नाही, आपल्यात अनेक दोष आहेत, हेही मी चांगले ओळखून होतो. थोडासा आत्मपरीक्षण करण्याचा अभ्यास असल्यामुळे मला माझा तोल सांभाळता आला व कित्येक गोष्टींकडे निरासक्त दृष्टीने पाहणे शक्य झाले.

## मनुष्यस्वभावाचा एक नमुना

१९३१ साली दिल्ली करार झाला त्या वेळची आठवण :—

त्या वेळी दिल्ली येथे पंचमेळ लोक जमलेले होते. त्यात परदेशी बातमीदारही –विशेषतः अमेरिकन–आलेले होते. आमच्या मौनामुळे ते जरा डोक्यात राख घालीत. गांधी–अर्विन संभाषणाबद्दलची माहिती तुमच्यापेक्षा नव्या दिल्लीच्या सेक्रेटरीएटमधूनच आम्हांला जास्त मिळते असे ते म्हणत आणि ते खरेही होते. महात्माजींचे ग्रह त्या वेळी उच्चीचे असल्यामुळे बडे बडे पदवीवालेही त्यांना लवून सलाम करू लागले होते. ज्या लोकांनी गांधीजी व कॉंग्रेस ह्यांचा विटाळ मानला व त्यांना शिव्यांची लाखोली वाहिली, ते लोक आता दिलजमाई करण्यासाठी लगबग करीत असलेले पाहून नवल वाटे ! कॉंग्रेसची कमान चढती दिसत होती, तेव्हा भविष्यकाळी ती तशीच राहणार नाही कशावरून ? एकंदरीत कॉंग्रेसशी व तिच्या पुढाऱ्यांशी गोडीगुलाबीने वागावे हीच नीती

फायद्याची ठरेल अशी कल्पना होती. एका वर्षानंतर त्यांच्या धोरणात आणखी एकवार बदल होऊन ते काँग्रेस व तिचे कार्यक्रम यांच्याबद्दल तिरस्कार व्यक्त करू लागले व तिचा आपला काही संबंध नाही असे दाखविण्याची अहमहमिका त्यांच्यात सुरू झाली !

नवीन जमान्यात आपल्याला कदाचित मानाचे स्थान मिळणार नाही अशी थोडी धास्ती मनात उत्पन्न होऊन जातिनिष्ठ पुढारीसुद्धा गांधीजीकडे येऊन आपण पुढाकार घ्याल तर तडजोड होण्याला अडचण पडणार नाही अशी आश्वासने देऊ लागले.

गांधीजी व आम्ही डॉ. अन्सारी ह्यांच्या घरी उतरलो होतो. तेथे उच्च नीच सर्व तऱ्हेच्या लोकांची अखंड रांग लागून राहिलेली असे. फुरसत सापडली की त्यांच्याकडे पाहात बसणे बोधप्रद व मोठे मनोरंजक होते. गेली काही वर्षे आमचा संबंध शहरांतल्या व खेडोपाडींच्या साळ्यामाळ्यांशी व तुरुंगातील दरिद्री कैद्यांशीच फक्त येत असे. गांधीजींकडे जे लक्ष्मीपुत्र येत होते, त्यांनी मनुष्यस्वभावाचा एक निराळाच नमुना आम्हांला दाखवून दिला. जिकडे शक्ती व यश दिसेल, तिकडे वळून हसऱ्या चेहऱ्याने स्वागत करावे, अशा मोठ्या लवचिक मनुष्यस्वभावाचा तो नमुना होता !

## दहशतवादी मुलांची भेट

१९३१ च्या नोव्हेंबरमध्ये मी कलकत्त्याला काही दिवस राहिलो होतो. तेथील माझा कार्यक्रम भरगच्च होता. व्यक्तींना व निरनिराळ्या गटांना मी खाजगी रीतीने भेटलोच पण जाहीर व्याख्यानेही बरीच झाली. ह्या सर्व सभांतून दहशतवादासंबंधी मी चर्चा केली व तो किती चुकीचा व निष्फळ आहे आणि हिंदी स्वातंत्र्याला तो किती विघातक होईल हे पटवून देण्याचा मी प्रयत्न केला...

शेवटच्या दिवशी संध्याकाळी स्टेशनवर निघण्याच्या आधी काही वेळ दोन तरुण मुले मला भेटण्यासाठी आली. त्यांची वये वीस एकवीस वर्षांची असतील नसतील. त्यांचे चेहरे फिकट व भावनापूर्ण आणि डोळे फार पाणीदार दिसत होते. त्यांची नावे मला माहीत नसली, तरी त्यांचे काय काम असावे हे मी ताबडतोब ओळखले. दहशतवादाविरुद्ध मी मतप्रचार केला म्हणून

ते माझ्यावर अतिशय संतापले होते. तरुणांच्या मनांवर तुमच्या भाषणाचा अतिशय परिणाम होत आहे, तुमची ही लुडबूड आम्हांला खपणार नाही असे त्यांनी मला बजावले. आमच्यांत थोडी चकमक उडाली आणि माझी निघण्याची वेळ झालेली असल्यामुळे उत्तर प्रत्युत्तर फार घाईने करावे लागले. मला वाटते दोन्ही बाजूंचा आवाज व संतापाचा पारा चढला असावा. त्यांना लागतील असे काही शब्दही माझ्या तोंडून निघून गेले. ' तुमचा हा अनिष्ट उद्योग असाच चालू राहिला, तर इतरांप्रमाणेच तुमचीही वाट लावल्यावाचून आम्ही राहणार नाही ' असा इषारा त्यांनी मला निघताना देऊन ठेवला.

कलकत्ता स्टेशनवरून गाडी हलली व मी अंथरुणावर जाऊन पडलो. पण किती वेळ तरी त्या मुलांचे संतापाने लाल झालेले ते चेहरे माझ्या डोळ्यांपुढून हलेनात. त्यांच्या डोळ्यांत तेजाची व उत्साहाची चमक होती. त्यांना योग्य मार्गदर्शक भेटला असता तर किती उत्कृष्ट कामगिरी त्यांनी बजावली असती ! मी इतक्या घाईघाईने व डाफरून त्यांच्याशी बोललो ह्याबद्दल मला पश्चात्ताप झाला आणि त्यांच्याशी बराच वेळ बोलण्याची संधी मिळाली असती तर फार बरे झाले असते, असे मला वाटू लागले. हिंदुस्तानच्या स्वातंत्र्यासाठी व सेवेसाठी जरा निराळ्या मार्गाने आपले तेजस्वी जीवन समर्पण करा असा उपदेश करून मला कदाचित त्यांची खात्रीही पटविता आली असती...ती मुले मला पुन्हा कोठे दिसली नाहीत. त्यांचे काय झाले असावे कुणास ठाऊक ?

## घरावरील जप्ती !

१९३२ सालची गोष्ट —

प्रातीवरील कर मी भरला नाही, म्हणून आमचे राहाते घर आनंदभवन, सरकार जप्त करणार अशीही वदंता होती. दिल्ली समेटानंतर करवसुलीच्या अधिकाऱ्याबरोबर बोलणे होऊन मी आकारलेल्या रकमेपैकी एक हप्ता भरला देखील. पण इतक्यात वटहुकुमांचे राज्य सुरू झाले. आता कर द्यावयाचा नाही असा मी निश्चय केला. खंड व सारा देऊ नका असे शेतकऱ्यांना सांगून स्वतः मात्र कर भरावयाचा हा कारभार लबाडीचा किंबहुना नीतिबाह्य आहे, असे माझे मन मला सांगे. सरकार आमच्या घराचा कब्जा

घेईल अशी माझी अपेक्षा होती. माझ्या आईला घराबाहेर पडावे लागणार; जी पुस्तके, जे कागदपत्र, जे जिन्नस-पान्नस आमच्या भावनांशी निगडित झाल्यामुळे आम्हांला प्रिय वाटू लागले होते, त्या सर्वांना परक्यांचे हात लागतील व ते कदाचित गहाळही होतील; आणि आमच्या घरावर फडफडणारे राष्ट्रीय निशाण खाली ओढण्यात येऊन तेथे युनियन जॅक चढविण्यात येईल, हे विचार मनात आले की जप्तीची कल्पना असह्य वाटत असे. मग त्याच वेळीं घर जाणार ही कल्पना आकर्षकही वाटत असे. मग भणंग बनलेल्या शेतकऱ्यांशी मी अधिक एकरूप होईन व त्यामुळे शेतकऱ्यांना अधिक हुरूप चढेल असे मला वाटले. चळवळीच्या दृष्टीने घर जप्त व्हावे ही गोष्ट निःसंशय फायद्याची होती. आईच्याबद्दल मनात विचार आला म्हणा किंवा उगीच आगीत तेल कशाला ओता अशी सुबुद्धी सुचल्यामुळे म्हणा, सरकारने आमच्या घराला हात लावला नाही. नंतर बऱ्याच महिन्यांनी माझे काही रेल्वेशेअर्स तेवढे जप्त करण्यात आले. माझी एक व माझ्या मेहुण्याची एक अशा दोन मोटारी पूर्वी लिलावाने विकण्यात आल्याच होत्या!

## इंग्रज अधिकाऱ्याचे सौजन्य

१९३२ साली झालेल्या शिक्षेबाबतची आठवण:—

बरेलीच्या तुरुंगातून माझी व गोविंद वल्लभ पंत यांची डेहराडून जेलकडे रवानगी झाली. लोकांची गर्दी वगैरे टाळण्याकरिता आम्हांला बरेली येथे गाडीत न बसवता ५० मैलांवरील आड स्टेशनावर नेण्यात आले. रात्रीच्या वेळी आम्हांस गुप्तपणे मोटारीतून स्टेशनवर पोचते करण्यात आले. पुष्कळ महिन्यांच्या एकांतवासानंतर रात्रीच्या थंड वेळी ती मोटारीतील सहल फारच आल्हादकारक वाटली.

बरेली तुरुंगातून निघताना घडलेल्या एका लहानशा प्रसंगाची आठवण अद्यापि ताजी राहिली आहे. बरेलीचे पोलीस सुपरिटेंडेंट त्या वेळी तेथे हजर होते. ते जातीने इंग्रज होते. मी मोटारीत बसत असता त्यांनी माझ्या हाती एक भेंडोळे दिले आणि "जुनी सचित्र जर्मन मासिके आहेत. तुम्ही जर्मन शिकता असे कळल्यावरून ही मी तुमच्यासाठी आणली आहेत." असे त्यांनी सांगितले. ह्यापूर्वी त्यांची व माझी भेट कधीही झालेली नव्हती व

त्यानंतरही ते मला कधी भेटलेले नाहीत. त्यांचे नावसुद्धा मला माहीत नाही. पण हे स्वयंस्फूर्त सौजन्य व मित्रभाव पाहून मला त्यांच्याबद्दल फार कृतज्ञता वाटू लागली ...

सुदैवाने माझे देशबांधव व इंग्रज लोक हे दोघेही मला सौजन्याने वागवीत आले आहेत. माझे जेलर व मला कैद करून इकडून तिकडे नेताना माझ्या-बरोबर येणारे पोलीस या सर्वांनीच माझ्याशी गोडीगुलाबीचे वर्तन ठेवलेले आहे .. माझ्या देशबांधवांनी मला चांगले वागवावे ह्यात आश्चर्य नाही. कारण मी थोडीशी लोकप्रियता व प्रसिद्धी संपादन केलेली आहे. इंग्रज मनुष्यसुद्धा दहाजणांसारखाच एक अकरावा माणूस असे न मानता एक विशिष्ट व्यक्ती म्हणून वागवीत असतो. मी इंग्लंडमध्ये शिक्षण घेतले आहे व विशेषतः मी एका प्रख्यात इंग्रजी शाळेचा विद्यार्थी होतो, त्यामुळे त्यांना मजबद्दल आपलेपणा वाटत असावा.

## प्रकृतीबाबत

१९३३ च्या मध्याच्या सुमारास तुरुंगातून सुटण्याच्या वेताला व्यक्त केलेले विचार :—

प्रकृतीच्या बाबतीत मी मोठा दैववान होतो. कॉंग्रेसच्या धामधुमीमुळे खूप दगदग होई व आहारविहाराच्या बाबतीत अनियमितपणाही उत्पन्न होत असे. परंतु एकंदरीत माझी प्रकृति चांगली टिकून राहिली आहे. थोडीबहुत वडिलार्जित देणगी व थोडीबहुत स्वतः ठेवलेली दक्षता यांमुळे प्रकृती चांगली राहिली असावी. आजारपण, अशक्त प्रकृती आणि स्थूलपणा ह्या गोष्टी माणसाला शोभणाऱ्या नव्हेत असे मला वाटे. व्यायाम, भरपूर मोकळी हवा व साधे अन्न यांच्या साहाय्याने मी उपरोक्त आपत्तींपासून शरीराचा बचाव केला होता. माझा अनुभव असा आहे की, हिंदुस्थानातील मध्यम वर्गात आढळणारे बरेचसे रोग सदोष आहारापासून उत्पन्न झालेले असतात. जे अन्न खाण्यात येते ते फाजील पौष्टिक व वाजवीपेक्षा अधिक असते ( उधळमाधळ करण्याची ऐपत असणाऱ्यांनाच हे विधान लागू पडेल ). मुलांचे लाड करणाऱ्या आया, मुलांना गोड व चमचमीत पदार्थ अवश्य त्यापेक्षा अधिक खावयाला घालून त्यांना कायमचा अपचनाचा रोग जडवून ठेवतात. मुलाच्या अंगाभोवतीसुद्धा

जरुरीहून अधिक कपडे लपेटण्यात येतात. हिंदुस्थानात आलेल्या इंग्रजांना देखील फाजील आहाराची सवय लागली आहे. तथापि गेल्या पिढीपेक्षा त्यांच्यांत थोडीशी सुधारणा झालेली दिसते.

अन्नाचे प्रयोग करण्याच्या भानडीत मी कधी फारसे लक्ष घातलेले नाही. आधाशीपणा व मिष्टान्न ही टाळण्याचा तेवढा मी प्रयत्न करीत असतो ... मांसाशन माझ्या प्रकृतीला मानवते. पण माझ्या मनात त्याबद्दल किळस उत्पन्न झाली असून मांसाशनात एक प्रकारचा रानवटपणा आहे असे आता मला वाटू लागले आहे.

## आंतरजातीय विवाहाचा प्रसार

१९३३ सालची गोष्ट.

आईला ( लखनौला ) रुग्णालयात पडून राहण्याचा कंटाळा आला होता, म्हणून तिला परत अलाहाबादेस न्यावे असे आम्ही ठरविले. माझी बहीण कृष्णा हिचा वाङ्निश्चय नुकताच झाला होता, हेही अलाहाबादेस जाण्याचे एक कारण होतेच. इच्छा अशी की माझी तुरुंगात रवानगी होण्याच्या आधी शक्यतो लवकर विवाह उरकून घ्यावा. कायदेभंग अद्यापि सुरू असल्यामुळे मला केव्हा उचलण्यात येईल त्याचा मुळीच नेम नव्हता.

अलाहाबाद मुक्कामी ऑक्टोबरच्या तिसऱ्या आठवड्यात विवाहाचा दिवस निश्चित केला. विवाह रजिस्टर पद्धतीने करावयाचा ठरला म्हणून मला आनंद झाला. पण खरे म्हणजे आम्हांला दुसरा मार्गच मोकळा नव्हता. कारण वधू ब्राह्मण आणि वर अब्राह्मण. आंतरजातीय विवाहाचा प्रसार व्हावा असे माझे मत आहे. पण त्याबाबतीत मतप्रसार होवो अथवा न होवो, सर्व धर्मांच्या लोकांना लागू पडणारा असा एखादा अनुज्ञापक कायदा असणे मात्र जरुरीचे वाटते. त्या कायद्यान्वये विवाह करणारांना आम्ही कोणताही धर्म मानीत नाही असा प्रतिज्ञालेख लिहून देण्याचेही कारण पडू नये.

माझ्या बहिणीच्या विवाहाचा जरा देखील गाजावाजा करण्यात आला नाही- समारंभाचा बेत अगदी साधा ठेवण्यात आला होता. हिंदुस्तानातील विवाहातून दिसून येणारा गाजावाजा मला मुळीच आवडत नाही. शिवाय आई आजारी, बाहेर सत्याग्रहाचे वातावरण आणि अनेक स्नेहीसोबती तुरुंगात, अशा स्थितीत

भपका करणे अप्रशस्त ठरले असते.

## जनतेसाठी करावयाचे लेखन

माझ्या बहिणीच्या विवाहानंतर माझे स्नेही शिवप्रसाद गुप्त यांना भेटण्यासाठी मी बनारसला गेलो. लखनौ तुरुंगात झालेल्या पक्षघाताच्या विकारातून ते अद्यापि साफ बरे झाले नव्हते. बनारस येथे असताना एका हिंदी वाङ्मय मंडळातर्फे मला मानपत्र अर्पण करण्यात आले. त्या वेळी त्या मंडळाच्या सभासदांशी मोठी मनोरंजक अशी चर्चा करावयास मला मिळाली. हिंदीमध्ये नित्य आढळून येणारी क्लिष्ट व अलंकारिक भाषा हाच माझ्या टीकेचा विषय होता. त्यातल्या पुष्कळ बिकट संस्कृत शब्दांमुळे ती कृत्रिम आणि जुनाट अशी दिसते. निवडक लोकांना उद्देशून लिहिण्यात येणारी ही अलंकारप्रचुर व दरबारी भाषा लिहिण्याचे सोडून जनतेला समजेल अशा भाषेत व जनतेसाठी लेखन करण्याचा हिंदी साहित्यिकांनी बुद्धिपुरःसर प्रयत्न करावा असे मी सुचविले. जनतेशी संबंध आला म्हणजे भाषेत नवीन चैतन्य व नवीन तळमळ दिसून येऊ लागेल आणि जनतेत उसळणाऱ्या उत्साहाचे खुद्द लेखकही अंशभागी होऊन त्यांना अधिक नेटाने काम करता येईल. पाश्चात्त्य विचार व वाङ्मय यांच्याकडे लक्ष पुरविल्यास हिंदी साहित्यिकांचा बराच फायदा होईल. त्यासाठी युरोपीय भाषांतील विदग्ध वाङ्मयाची व आधुनिक वाङ्मयाची भाषांतरे हिंदीमध्ये होणे आवश्यक आहे वगैरे सूचना मी सदस्यांपुढे मांडल्या; आणि या बाबतीत बंगाली, गुजराथी व मराठी भाषा अधिक प्रगतीपर आहेत व अलीकडच्या काळात हिंदीपेक्षा बंगालीमध्ये अधिक स्वतंत्र वाङ्मयरचना झालेली आहे, असेही मत मी व्यक्त केले.

## धरणीकंपाचा अनुभव

१९३४ सालच्या १५ जानेवारीचा काळ. दुपारची वेळ. आमच्या घराच्या व्हरांड्यात उभा राहून मी काही शेतकऱ्यांबरोबर बोलत होतो. वार्षिक माघ मेळ्याला प्रारंभ झाला होता. त्यामुळे आमच्या घरी लोकांची रांग लागून राहिली होती. एकाएकी माझे पाय लटपटू लागले आणि तोल सावरता सावरता नाकी नऊ आले. जवळच्या एका खांबाला मी घट्ट धरून राहिलो. दरवाजे

दणादण आपटू लागले. जवळच्या स्वराज्यभवनावरील कौले ढसरत होती त्यांचा गडगडाटासारखा आवाज होऊ लागला. धरणीकंपाचा काहीच अनुभव नसल्याने प्रथम हा काय प्रकार आहे तेच समजेना. पण लौकरच सर्व प्रकार लक्षात आला. हा नवा अनुभव मला मोठा मजेशीर वाटला. शेतकऱ्यांना उद्देशून चाललेले माझे भाषण मी सुरूच ठेवले; आणि त्यांना धरणीकंपाची माहिती सांगू लागलो. ‘ इमारतीच्या बाहेर धूम ठोक ’ असे माझी वृद्ध आत्या मला ओरडून सांगत होती. पण ती कल्पनाच मला वेडेपणाची वाटली. धरणीकंपाची मला फारशी भीती वाटत नव्हती, आणि काहीही झाले तरी अंथरुणाला खिळलेल्या आमच्या आईला आणि वर सामानाची बांधाबांध करीत असलेल्या माझ्या पत्नीला तसेच सोडून मी दूर जाणे शक्यच नव्हते. बराच वेळ धक्के बसत होते. मग ते थांबले. थोडा वेळ तो एक चर्चेचाच विषय होऊन राहिला होता. नंतर कोणालाच त्याची आठवण राहिली नाही. बिहारमधील लक्षावधी लोकांना ती तीन मिनिटे कशी गेली असतील, याची आम्हांस त्या वेळी दाद ना खबर !

## वैवाहिक जीवनाची अठरा वर्षे !

१९३४ साली लिहिलेली आठवण: —

वैवाहिक जीवनाची अठरा वर्षे ! पण त्यांतील कितीतरी वर्षे मी तुरुंगात काढली; आणि कितीतरी वर्षे कमलाने रुग्णालयांत काढली ! याही खेपेला मी तुरुंगात खितपत पडलो होतो आणि कमला अंथरुणाला खिळून पडलेली होती. एक दोन दिवसच काय ती मला मोकळीक मिळणार. ती प्रकृतीची नीट काळजी घेत नाही. मला तिचा थोडासा रागही आला. परंतु तिला तरी दोष कसा द्यायचा ? शरीराचा दुबळेपणा आणि निष्क्रियता यांच्यामुळे स्वातंत्र्याच्या लढ्यात आपणाला योग्य तो भाग घेता येत नाही, म्हणून तिच्या कर्तव्यपरायण मनाची तडफड चालली होती. परंतु शरीर कमकुवत असल्यामुळे तिला कामही धड करता येईना आणि औषधोपचाराकडेही धड मन लागेना. अशा अवस्थेत अंतरंगातील आकांक्षांच्या धगीने तिचे शरीर कोळपून गेलेले होते.

कमला अगदी निःशक्त व दुबळी होऊन पडली होती. पूर्वीच्या कमलेची ही जणू काही छायाच आपण पाहतो आहो असे वाटे. तिचे शरीर व्याधीबरोबर

क्षीणपणाने झगडत होते. ती कदाचित् मला सोडून जाईल असा असह्य विचार माझ्या मनाला एकसारखा भेडसावू लागला. आमच्या विवाहाला अठरा-साडेअठरा वर्षे झाली होती. आमचा विवाह झाला तो दिवस आणि त्यानंतरच्या काळातील अनेक प्रसंग मला आठवले. विवाहाच्या वेळी मी २६ वर्षांचा होतो व कमला अवघी १७ वर्षांची मुग्ध अशी बाला होती. आमच्या दोघांच्या वयांत बरेच अंतर होते; परंतु आमच्या दृष्टिकोनातील अंतर त्याही पेक्षा अधिक होते. तिच्यापेक्षा माझी मानसिक वाढ कितीतरी अधिक झालेली होती. परंतु जगाबद्दलच्या ज्ञानाचा टेंभा मी बाह्यत्कारी कितीही मिरवत असलो, तरी अद्यापि मी अजाणच होतो. ह्या नाजूक व भावनामय मुलीचे मन एखाद्या सुकुमार फुलाप्रमाणे पाकळीपाकळीने उमलत आहे, फार स्नेहानें व दक्षतेने त्याची निगा राखली पाहिजे हे माझ्या लक्षात आले नाही. आम्ही परस्पराकडे आकर्षित होत होतो आणि आमचा जीवनक्रमही व्यवस्थित चाललेला होता; परंतु दोघांच्या मनाची पार्श्वभूमी समान नसल्यामुळे मनाची गुंफण बेमालूमपणे होत नसे. त्यामुळे कधीकधी खटके उडत. बारीकसारीक गोष्टीवरून रुसणी फुगणी होत. पण ही पोरसवदा भांडणे फार काळ टिकत नसत. तेव्हाच समेट घडून येई. आमचे दोघांचेही स्वभाव तिखट होते. दोघांचीही अंतःकरणे हळवी होती आणि आमच्या प्रतिष्ठेच्या कल्पनाही बालिश होत्या. असे असूनही आमच्यातील स्नेह गाढ होत चालला. आमच्यातील मानसिक असमाधान नष्ट होण्याला मात्र बराच अवधी लागला. विवाह झाल्यानंतर एकवीस महिन्यांनी आमची एकुलती एक मुलगी इंदिरा हिचा जन्म झाला.

आमचा विवाह व्हायला आणि राजकारणाला नवी कलाटणी मिळावयाला एकच गाठ पडली. राजकारणामध्ये मी गर्क होऊन गेलो होतो. ते होमरूलचे दिवस होते. त्यानंतर लवकरच पंजाबमध्ये लष्करी कायदा जारी करण्यात आला. नंतर असहकारितेची लाट उठली; आणि अशा प्रकारे सार्वजनिक धूमश्चक्रीत मी अधिकाधिक गुरफटला गेलो. या चळवळीमध्ये मी इतका गुंतून गेलो होतो की, ज्या काळात कमलेला माझ्या पूर्ण सहकार्याची आवश्यकता होती. त्या काळात नेमकी तसा हेतू नसताही माझ्याकडून तिची उपेक्षा झाली. एकटीच ती मागे पडली. माझे तिच्यावर प्रेम कायम होते. नव्हे, वाढत होते. आपल्या

सौजन्यानिशी ती मला साहाय्य करण्यास सदैव तयार आहे, ही कल्पना मनात आली की मनाला किती तरी समाधान वाटत असे. तिच्यामुळे मला सामर्थ्य प्राप्त झाले. परंतु तिच्या मनाला मात्र यातना होत असाव्यात, आपली हेळसांड होत आहे असे तिला वाटले असावे. असल्या मामुली उपचारापेक्षा, असल्या अर्धवट उपेक्षेपेक्षा उघड उघड अवहेलना तिला जास्त पसंत पडली असती.

आणि नंतर तिच्या आजाराला व माझ्या दीर्घकालीन शिक्षांना सुरुवात झाली. त्या मुदतीत फक्त तुरुंगांतच काय ती आमची भेट व्हायची !

## पेचप्रसंग

१९३४ साल. नैनी तुरुंगातील दिवस. पत्नी सौ. कमलादेवी यांचे आजारपण.

होता होता सप्टेंबर महिना संपला. हे सप्टेंबरचे तीस दिवस म्हणजे माझ्या अनुभवातले वाईटातले वाईट दिवस. अनेक मध्यस्थांमार्फत मला सूचना करण्यात आल्या की, शिक्षेच्या उरलेल्या दिवसांत राजकारणापासून अलिप्त राहीन असे नुसते शब्दाने कळविले, तरी कमलेच्या शुश्रूषेसाठी माझी सुटका करण्यात येईल. त्या वेळी माझ्या डोक्यात राजकारणाच्या विचारांना फारच थोडा थारा होता. आणि अकरा दिवसांत बाहेर चाललेल्या राजकारणाचा चिखल पाहून तर मला त्याची शिसारीच आलेली होती. पण हमी द्यावयाची आणि माझ्या प्रतिज्ञेशी, सहकाऱ्यांशी व खुद्द स्वतःशी बेइमान व्हावयाचे ! काहीही झाले तरी ती अट मान्य करणे अशक्य होते. अट कबूल केली असती तर मी ज्या गोष्टी पवित्र मानल्या त्यांच्या आणि माझ्या तात्त्विक जीवनाच्या मुळावरच कुऱ्हाड घातल्यासारखे झाले असते. कमलाची प्रकृति दिवसेंदिवस क्षीण होत चालली आहे, मी तिच्याजवळ राहिलो तर कदाचित मृत्यूच्या पाशातून ती सुटेल असेही मला सांगण्यात आले. तिच्या जीवनापेक्षाही माझ्या अहंकाराची आणि प्रतिष्ठेची मातब्बरी मला अधिक वाटावी काय ? यासंबंधात मला कोणी प्रश्न विचारला असता तर माझ्या मनाला दुःसह पेच पडला असता. पण तसा प्रश्न उपस्थित झाला नाही. मी अट मान्य केली तर कमलेलाच ते पसंत पडणार नाही हे मला ठाऊक होते. मी अट वगैरे मान्य केली असती तर मात्र तिच्या मनाला धक्का बसला असता.

ऑक्टोबरच्या सुरुवातील मला पुन्हा भेटण्यासासाठी नेण्यात आले. तापाने फणफणून ती सुंद होऊन पडली होती. मी तिच्या जवळ बसून राहावे म्हणून तिचे मन तळमळत होते. पण मी जावयास निघालो तेव्हा मोठ्या धैर्याने स्मित करून तिने मला जरा वाकण्यास खुणावले. मी वाकल्यावर ती हळूच म्हणाली, ‘ सरकारला आश्वासन देण्याविषयी बोलणी चालतात ती खरी का ? तसे काही करू नका ! ’

मराठा ग्रंथ संग्रहालय, ठाणे. स्थळप्रत

# २

# बहिणीने घडविलेले

## मानसिक झगडा

सौ. कृष्णा हाथीसिंग पंडितजींच्या भगिनी यांच्या आठवणी :—

१९२० मध्ये गांधीजींनी सत्याग्रहाची चळवळ सुरू केली आणि त्या चळवळीमुळे माझेच नव्हे तर कुटुंबातील सर्वांचेच जीवन बदलले ...

दररोज काही तरी नवीन घडत होते. आणि माझे ते ठरीव साचाचे नि कंटाळवाणे जीवन बदलू लागले. क्षणाक्षणाला माझ्या जीवनात फरक होऊ लागला. प्रत्येक दिवस निराळा. रोज काही तरी नवीन. दुसऱ्या क्षणाला काय होईल याची कल्पनाही नसे. जीवनात चैतन्य आले. गांधीजींना मिळण्याची जवाहरची इच्छा होती. वडिलांची अद्यापि तयारी नव्हती. उडी घेण्यापूर्वी सर्व साधकबाधक गोष्टींचा ते विचार करीत होते. परंतु जवाहरच्या मनाची केव्हाच तयारी झाली होती. सत्याग्रह चळवळीची शपथही त्याने घेतली. असे करण्यापूर्वी त्याला मानसिक झगडा करावा लागला, नाही असे नाही. गांधीजींच्या नेतृत्वाखाली सत्याग्रह करण्यावाचून स्वराज्यप्राप्तीचा दुसरा मार्ग नाही असे त्याला वाटले. परंतु बापूंना जाऊन मिळण्यापूर्वी वडिलांची पूर्ण संमती मिळविणे सोपे काम नव्हते. गांधीजींचे विचार वडिलांनी एकदम स्वीकारले नाहीत. होणाऱ्या सत्याग्रही आंदोलनाचा त्यांनी बऱ्याच सहानुभूतीने विचार केला होता. त्यांनी पाठिंबा दिला असला तरी ही चळवळ त्यांना मनातून फारशी आवडत नव्हती. तुरुंगात जाण्यात विशेष काही आहे असे त्यांना त्या वेळी वाटत नव्हते; आणि जवाहरने तुरुंगात जावे ही कल्पना त्यांना आवडली नाही. तुरुंगाची यात्रा अद्यापि सुरू झाली नव्हती. वडिलांचे जवाहरवर अपार प्रेम आणि आपल्या लाडक्या पुत्राला तुरुंगात जायला लागावे, त्याला हालअपेष्टा भोगायला लागाव्यात, याचे त्यांना साहजिकच दुःख वाटे.

वडिलांच्या आणि जवाहरच्या दोघांच्या मनात कित्येक दिवस झगडा चालला होता. दोघांच्या चर्चा तासन् तास होत. कधी शब्दाशब्दी होई, रागाने बोलणी होत; दोघे परस्परांची खात्री पटविण्याची पराकाष्ठा करीत-किती तरी दिवस-रात्री अशा गेल्या. दोघांच्या मनाला क्लेश होत होते. दोघांच्या हृदयाला वेदना होत होत्या. बापूंच्या पाठोपाठ जाण्याचा जवाहरचा निश्चय पाहून वडील दुःखीकष्टी होत. ते जमिनीवर झोपून बघत. ही गोष्ट आम्हांला पुढे कळली. आपल्या मुलाला उद्या तुरुंगात फरशीवर निजावे लागेल. जमिनीच्या साध्या फरशीवर निजणे म्हणजे काय याचा अनुभव वत्सल वडील घेत होते. घरातील सगळ्यांनाच ते दिवस मोठ्या दुःखाचे गेले. विशेषतः आई नि कमला यांचा जीव तर खालीवर होत होता...

परंतु पंजाबातील घडामोडींनी, जालियनवाला बागेतील त्या शोकद घटनेने वडील बदलले. जवाहरच्या विचारसरणीकडे ते बरेचसे आले....जवाहरबरोबर उडी घ्यायची, गांधीजींचे नेतृत्व स्वीकारायचे, असा त्यांनी निर्णय घेतला.

## सुखासीन जीवनाचा राग

मॉन्टाना येथे राहात असतानाच जवाहर नि मी मधून मधून पॅरिसला जात असू. बेल्जियम, जर्मनी नि इंग्लंड या देशांतही कधी कधी जात असू. इंग्लंड मला मुळीच आवडले नाही. परंतु फ्रान्सवर माझे प्रेम जडले, विशेषतः पॅरिसवर. कधी आम्ही सभा-संमेलनासाठी म्हणून जात असू तर कधी मजेखातर. प्रथम प्रथम जवाहर एकटाच जात असे. पुढे एकदा तो म्हणाला, "तू माझ्या उपयोगी पडणार असशील, माझी सेक्रेटरीण म्हणून काम करणार असशील, तर तुलाही मी बरोबर नेत जाईन." भावाबरोबर जायला मिळणार या विचाराने हृदय आनंदाने फुलले. परंतु चिटणिसाचे काम कसे जमणार? कारण जवाहरला संतुष्ट करणे मोठे कठीण काम होते. त्याला चोख काम हवे असे. बावळटपणा त्याला सहन होत नसे. काम नीट झाले नाही तर तो संतापत असे; परंतु भावाबरोबर जाण्याचे मोठे आकर्षण होते. मी त्याची अट मान्य केली. लगेच तडक जाऊन जवाहरजवळचा टाईपरायटर मी मागून घेतला. त्याच्यावर काम शिकू लागले. जवाहरचे मला चिटणीस व्हायचे होते. मी त्याची तालीम घेऊ लागले. तयारी करू लागले.

यापुढे जवाहर बरोबर मी बहुतेक साऱ्या सफरी करीत होते. ते एक शिक्षणच मला मिळत होते. परंतु माझी कल्पना होती तेवढी गंमत नि मौज मात्र लाभली नाहीत. जवाहर माझी कधी गय करीत नसे. माणसाने खूप काम करावे असे त्याला वाटे; आणि मला कामाची मुळीच सवय नाही, असे त्याचे म्हणणे. तो एकदा मला म्हणाला, " फारच सुखात नि ऐषआरामात तू वाढलीस. असले सुखासीन जीवन व्यक्तित्वाचा विकास करीत नाही. थोडे श्रम करीत जा. काम करीत जा. तुझी बघ मग कशी सुधारणा होईल ती. " आणि मला कबूल केले पाहिजे, की काम करू लागल्यापासून मी पुष्कळच सुधारले.

## लाहोरची राष्ट्रीय सभा

१९२९ सालची ती लाहोरची राष्ट्रीय सभा ! जवाहर अध्यक्ष होता. राष्ट्रीय सभेच्या इतिहासात ती गोष्ट अपूर्व होती. पिता अध्यक्षपद सोडून ते पुत्राच्या स्वाधीन करीत आहे, असे दृश्य हिंदी राष्ट्रीय सभेच्या इतिहासातच अपूर्व होते असे नाही, तर जगातील इतर देशातील राष्ट्रीय सभेसारख्या संस्थांच्या इतिहासातही अशी गोष्ट कधी घडली नसेल. वडिलांना तर त्या वेळीं कृतार्थ वाटले असेल ! केवढा धन्य तो क्षण ! वडिलांनी मोठ्या अभिमानाने नि आनंदाने जवाहरच्या हाती सूत्रे दिली. जवाहर त्यांच्या घरच्या इस्टेटीचाच वारस होता असे नव्हे, तर त्यांच्या राजकीय गादीचाही तो वारस होता. राष्ट्रीय सभेचे अध्यक्षपद मिळणे याहून परमोच्च मान या देशात दुसरा कोणता आहे ? ते पद वडिलांना मिळाले होते. त्यांनी ते पुत्राच्या स्वाधीन केले.

लाहोरची राष्ट्रीय सभा अनेक दृष्टीने अपूर्व झाली. ते ऐतिहासिक अधिवेशन होते. डिसेंबर महिन्यातील तो प्रातःकाळ होता. कडाक्याची थंडी पडलेली होती. परंतु थंडीला न जुमानता हजारो लोक रावी नदीच्या तीरावर जमले होते नि संपूर्ण स्वातंत्र्याची शपथ घेत होते. त्या ठरावाने आपल्या देशाच्या इतिहासात नूतन मंगल प्रभात उगवली. स्त्रिया, पुरुष, मुले, थंडी होती तरी हजारोंनी आली. तेथे निर्मळ आकाशाच्या खाली हजारो माणसे उभी राहिली. गंभीरपणे, गंभीर भावनेने स्वातंत्र्याच्या प्रतिज्ञेचा त्यांनी उच्चार केला. जवाहर प्रतिज्ञा वाचीत होता, हजारो श्रोते मागून उच्चार करीत होते.

## प्रतापी पित्याची आपण मुले

वडिलांच्या मृत्यूनंतर जवाहरला दिल्लीला जाणे भाग होते. तेथे गांधीच्या जवळ चर्चा करायची होती. व्हाईसरॉय लॉर्ड अर्विन नि गांधीजी यांच्या मुलाखती होत होत्या. घरच्या पुष्कळ बाबतीत जवाहरने पाहणे जरूर होते. परंतु त्याच्या गैरहजेरीत ते सारे तसेच ठेवण्यात आले. दिल्लीत जरी तो महत्त्वाच्या कामात गढलेला होता, तरी आपल्या लहानशा कुटुंबाचे आपणच आता मुख्य ही गोष्ट तो विसरला नाही. त्या वेळेस तो जवळ असण्याची आम्हांला सर्वांनाच आवश्यकता होती. विशेषतः आईला त्याची अधिक जरुरी होती. कारण ती अगदी हताश होऊन गेली होती. कसे तरी दिवस जात होते. अजून तो घरी येऊ शकत नव्हता. त्याने मला लिहिले,

" येथे मी लोंबकळत पडलो आहे. किती दिवस येथे राहावे लागणार समजत नाही. कुटुंबातील मंडळींच्या सहाय्याने घरगुती कामांची नीट व्यवस्था लावण्यासाठी एक आठवडा तरी निवांत वेळ मिळेल, अशी मी आशा करीत होतो. इतके दिवस वडिलांच्या शिरावर सारा बोजा होता. आपण मोकळीं होतो. पुढे येणाऱ्या अडचणींची त्यांना आधीच कल्पना असे. त्यांचे दूरदर्शी शहाणपण, आपल्याबद्दलची त्यांची प्रेमळ चिंता यांमुळे आपण सुखी होतो, निश्चित होतो. जीवनातील कठोर वस्तुस्थिति जेव्हा समोर येई, तेव्हा वडील आहेत ह्या विचारानेच धीर येई. किती त्यांचे आपणावर प्रेम ? त्या प्रेमाचे पांघरूण आपणांवर होते. इतरांना ज्या चिंता नि काळज्यांना तोंड द्यावे लागते, त्या आपणांस कधीच अनुभवाव्या लागल्या नाहीत. परंतु आता त्यांच्याशिवायच आपणांस राहणे भाग आहे. जसजसा एकेक दिवस जात आहे, तसतसा त्यांचा अभाव अधिकच तीव्रतेने जाणवत आहे. मला अगदी एकाकी वाटू लागते. परंतु किती झाले तरी आपण आपल्या प्रतापी पित्याची मुले आहोत. त्यांच्या सामर्थ्याचा आणि धैर्याचा काही अंश आपल्यांतही आहे, कितीही संकटे आपल्या मार्गात येवोत, कसोटीचे प्रसंग येवोत, त्यांतून आपण पार पडू, अशा निर्धाराने नि निश्चयाने त्यांना आपण तोंड देऊ."

## सारा मूर्खपणा आहे !

जेव्हा जवाहर राजाविषयी माझ्याजवळ बोलला, तेव्हा जरा विशेष रीतीने

तो बोलला. त्याच्या डोळ्यांत जरा हास्य होते. डोळे मिचकावीत तो मला म्हणाला, " तुझ्या मनात लग्नाचे विचार चालले आहेत असे ऐकले. होय ना ? चांगले आहे. परंतु हा तरुण कोण ? थोडा प्रकाश तर पाडशील ? थोडी माहिती देशील मला ? " मी गोंधळले. परंतु म्हटले, " हो, न द्यायला काय झाले ? " त्याने पहिला प्रश्न केला, " राजा काय करतो ? " मी सांगितले की, " तो बॅरिस्टर आहे. नुकताच त्याने धंदा सुरू केला आहे. " नंतर जवाहरने विचारले की, " राजाच्या घरी कोण कोण मंडळी आहेत ? " मी सांगितले की, " मला काहीच माहिती नाही. " त्याने पुन्हा विचारले, " त्याला भाऊ, बहिणी किती ? " मी नकारच दिला. जवाहर संतापू लागला, तो चिडणार असे दिसू लागले. मीही कापू लागले. हे साधे प्रश्न आपण राजाला कसे विचारले नाहीत असे मनात येऊन मी स्वतःलाच शिव्याशाप दिले. जवाहरने पुन्हा प्रश्नांची सरबत्ती सुरू केली. " ऑक्सफर्ड येथे तो कोणत्या कॉलेजात होता ? तेथे तो आणखी काय काय करी ? " असे दहावीस प्रश्न विचारण्यात आले. परंतु एकाही प्रश्नाचे उत्तर मी देऊ शकत नव्हते. मला काही माहितीच नव्हती. शेवटी जवाहरने विचारले, " तू राजाला ' राजा ' म्हणून का संबोधितेस ? जी. पी. अशी सही तो करतो. जी. पी. म्हणजे काय ? " राजाने जी. पी. म्हणजे काय ते सांगितले होते. परंतु मला काहीच आठवेना. भीतभीत मी जवाहरला म्हटले, " मला काही आठवत नाही. " चिडून जवाहर म्हणाला, " सारा मूर्खपणा आहे. " नंतर तो खोलीतून निघून गेला. खोलीत मी एकटीच होते. फजित होऊन दुःखी अशी तेथे बसले होते....

पुढे जवाहर राजाला भेटला, त्याला आईस भेटविले व १९३३ च्या ऑक्टोबरच्या २० व्या तारखेला माझा विवाह झाला.

## भावाची इच्छा

लग्न झाल्यावर काही महिन्यांनी जवाहरचे मला एक पत्र आले होते. त्या पत्राने एकमेकांशी जुळते कसे घ्यावे हे मला शिकविले. त्याने लिहिले होते,

" वैवाहिक जीवनाचा नवीन अनुभव घेताना तुला जीवनाकडे निराळ्या दृष्टिकोनातून पाहावे लागेल आणि असे करून शहाणपण मिळवावे लागेल. तुरुंगातील अनुभवाचा फायदा ज्यांना मिळाला आहे, ते एक गोष्ट तरी नक्की

शिकले असतील; सहनशीलतेची, उतावळे न होण्याची किंमत त्यांना समजून आली असेल आणि या अनुभवाने जर ते शहाणे झाले असतील, तर परिस्थितीशी जुळवून घेण्याचा गुणही ते शिकले असतील. हा गुण अंगी असणे म्हणजे मोठी गोष्ट होय. लौकरच तुझी घडी नीट बसेल अशी मला आशा आहे. तू माझी लहान बहीण, तू सदैव चांगल्या सुखात असावेस, हीच तुझ्या भावाची इच्छा. ''

## एकमेकांचा निरोप घेण्याचा क्षण

१९३४ पासून पुढे कमलाची प्रकृती झपाट्याने बिघडत चालली ... शेवटी कमलाने स्वित्झर्लंडला जावे असा डॉक्टरांनी सल्ला दिला ...

युरोपात जायचा दिवस आला. आल्मोरा जेलमधून कमलाला निरोप द्यायला जवाहर आला होता. त्याला परवानगी देण्यात आली होती. त्या हृदयद्रावक दिवशी त्याच्या मनात कोणते विचार येत असतील बरे? मला सांगता येणे शक्य नाही. परंतु त्या वेळेस त्याच्या तोंडाकडे पाहून हृदय दुभंग होई, शतचूर्ण होई. सारे दुःख त्या त्याच्या दोन डोळ्यांत जणू येऊन उभे होते. कठोर मुद्रा धारण करून आपले दुःख लपविण्याचा तो प्रयत्न करीत होता. परंतु तो प्रयत्न व्यर्थ होता. एकमेकांचा निरोप घेण्याचा तो क्षण आला. दोघांनी मुखावर वीरहास्य ठेवून निरोप घेतला आणि मोटारीत बसून ती डोंगर उतरून स्टेशनकडे चालली. तेथून आगगाडीत बसून ती मुंबईला जाणार होती. जवाहरची मोटारही वाट पाहात होती. डोळ्यात अश्रू तसेच ठेवून, ते न सांडता त्याने आईचा नि माझा निरोप घेतला. आईने त्याला जवळ घेतला आणि त्याने मला जवळ घेतले. आमच्याकडे पाठ फिरवून तो चालला. मोटार-कडे गेला. परंतु त्याच्या चालण्यातील ती तेजस्विता दिसत नव्हती. जणू स्प्रिंग तुटली. त्याच्या चालण्यातील तो नित्य उत्साह, ती विद्युल्लता अकस्मात् नाहीशी झाली असे दिसले. काही घटकांपूर्वी तो होता त्याहून कितीतरी पटीने तो वृद्ध झाल्याप्रमाणे वाटला. आणि गळून गेल्यासारखा दिसला. पुढे काही महिन्यांनी जवाहरची सुटका करण्यात आली. कमला अत्यवस्थ होती. विमा-नाने तो युरोपला गेला. स्वित्झर्लंडमधील लॉसने शहराच्या एका उपनगरात १९३६ सालच्या २८ फेब्रुवारीला कमला देवाघरी गेली. तिच्याजवळ जवाहर

नि इंदिरा होती.

## जवाहरचा आमच्याकडील मुक्काम

वर्षांतून दोन वेळा जवाहर मुंबईला येत असे. आमच्याकडे राहात असे. तो जवळ असावा असे वाटे. परंतु शेकडो कार्यक्रम आखलेले असायचे. त्यांत तो मग्न असायचा. त्याच्याजवळ बोलायला बसायला फारसे मिळत नसे. तो आमच्याकडे असला म्हणजे आमच्या लहानशा घरातील शांत असे रोजचे व्यवहार पार बदलून जात. उजाडले नाही तोच पाहुणे येऊ लागत. आणि मध्यरात्रीपर्यंत हे सत्र सुरू असे. शेकडोंची येजा सुरू असायची. कोणी आधी ठरवून येत, तर कोणी दर्शनार्थ येत. टेलिफोन सारखा वाजत असायचा. दारातील घंटेला विश्रांती नसायची. आणि या दोहोंमध्ये माझा सारा वेळ जायचा. कधी दारात जावे लागे, तर लगेच फोनवर धावावे लागे. जेवणाची ठरीव वेळ नसे. एकान्त नसे. दुपारी जेवायला किती येतील, रात्री किती येणार, याचा अंदाज नसे. मला स्वयंपाकघर लवचिक ठेवावे लागे. आयत्या वेळेस दहा वीस पाहुणे आले, तरी त्यांनाही लगेच वाढता येईल अशी तयारी ठेवावी लागे.

जीवन म्हणजे धावपळ असे. नुसती दम घ्यायला, श्वास घ्यायला फुरसत नसे. जेवायच्या वेळेस तेवढा जवाहर दिसायचा. क्वचित् एखादे वेळेस तो जेव्हा आमच्या वाट्याला येई, तेव्हा किती आनंद आम्ही लुटीत असू. वेळ पटकन जायचा. तो गंमतीच्या गोष्टी सांगे. आठवणी, आख्यायिका सांगे, हसे, हसवी. खूप बोलायचा. कधी चर्चा चाले. आमच्या घरगुती गोष्टींचाही ऊहापोह होई. कधी सायंकाळी जर तो घरी असला, तर तो इंग्रजी कविता म्हणे व वाचून दाखवी. कविता म्हणत असताना किंवा वाचून दाखवीत असताना तो आपणास तन्मय करीत असे. ते ऐकणे म्हणजे परम आल्हाद असतो. जवाहर फारच सुंदर रीतीने कविता म्हणतो व वाचतो.

## आदर्श वडीलभाऊ

जवाहर हा आदर्श वडीलभाऊ आहे. माझ्या बहिणीपेक्षा आणि माझ्या-पेक्षा तो वयाने इतका मोठा असूनही त्याने कधीही आमच्यासाठी कायदे

केलेले नाहीत. असेच वागले पाहिजे, तसेच केले पाहिजे, असे इतर वडील-भावांप्रमाणे त्याने कधी केले नाही. आम्ही केलेले कधी जर त्याला पसंत पडले नाही, तर तो सौम्यपणाने, शहाणपणाने, नीट धोरणाने आमच्याशी त्याबाबतीत बोले, चर्चा करी; आणि आम्ही चुकलो आहोत हे तो आम्हांस दाखवी; मग आपणच चुकलो हे आम्हांसही दिसे. त्याचे म्हणणे समजा, आम्हांला पटले नाही, तरीही जरी त्याला दुखावल्यासारखे मनात वाटले, तरीही तो ते दाखवीत नसे आणि स्वतःची मते आमच्यावर लादीत नसे. स्वरूपाचा नि माझा तो वंदनीय असा बडा भाईच केवळ आहे असे नव्हे, तर तो आमचा महान मित्र आहे, प्रेमळ सखा आहे. आम्हांला तो अति अमोल वाटतो. त्याचे आमच्यावर किती प्रेम, कशी समजून घेण्याची बुद्धी! ज्याप्रमाणे वडील आधार वाटत, त्याप्रमाणेच आज जवाहर वाटतो. आम्ही कधी संसारातील चिंतांनी, नानाप्रकारच्या प्रश्नांनी जिकिरीस आलो, तर आम्हांला जवाहरच धीर देतो. तो सामर्थ्याचा मेरू आहे. आमचा आधारस्तंभ आहे. या खांबाला आम्ही टेकतो नि निर्धास्त वाटते. तो उपदेश करीत बसत नाही, तर ज्या ज्या वेळेस मदतीची, मार्ग-दर्शनाची आवश्यकता असते, त्या त्या वेळेस साहाय्यार्थ पुढे येतो. उपहासाची किंवा उपालंभाची भीति न वाटता आम्ही आमची सारी हृद्गते त्याच्याजवळ ओकतो. तो अति विश्वासार्ह आहे. स्वतः मानवी असल्यामुळे तो दुसऱ्याचा दुबळेपणा समजू शकतो.

## गणिताची शिकवणी!

वडिलांच्याप्रमाणे जवाहरही शीघ्रकोपी आहे. मी चौदा वर्षांची होते तेव्हा जवाहर मला गणित शिकवू लागला. तोच आपण होऊन म्हणाला, "मी शिकवीत जाईन." गणित म्हणजे मला अगम्य वस्तू. माझे डोके उठायचे त्या गणिताने. जवाहर आता शिकविणार म्हणून मी नाचू लागले नाही. परंतु त्याने आता शिकवितो म्हटलेच, तर नाही कसे म्हणायचे? सुटायला मार्ग नव्हता. त्या काळात जवाहरला जरा मी भीत असे. तो माझ्यावर संतापलेला पाहायची मला फारशी इच्छा नव्हती. आमचे अध्ययन, अध्यापन सुरू झाले. पहिले काही धडे फारच चांगले वाटले. जवाहर किती छान सांगतो, कसे छान शिकवितो

असे वाटले. ज्या विषयाचा मी मनापासून तिटकारा करीत असे, तोच विषय अति आनंदाचा वाटू लागला. एक तासच जवाहर शिकवी. परंतु तो तास केव्हा येतो असे मला होई. जवाहरची भीती कमी वाटू लागली. मलाही जरा आत्मविश्वास वाटू लागला. तोच काहीतरी बिनसले. एके दिवशी माझे लक्षच लागेना. मला त्या दिवशी कसेसेच वाटत होते. माझी एकाग्रता होईना. काही लक्षांत राहीना, आठवेना, सुचेना. यामुळे जवाहर चिडला. (त्याचा तरी काय दोष? मी त्याला दोष देत नाही.) संतापू लागला. त्याचे ते खवळलेले नारसिंहरूप पाहून माझ्या डोक्यात थोडेफार होते नव्हते, तेही पळाले! मी केवळ मुकी बनले. कशाचेच उत्तर मला देता येईना. तो काही वाक्ये ओरडला आणि मी घाबरून गेले. माझी अक्कलच गुंग झाली. बुद्धी जणू मेली. मला मेल्या-सारखे वाटले. मी स्तंभित झाले. अवाक् झाले. मी जायला निघाले,...मी माझ्या डोळ्यांतले पाणी अडवीत होते... माझे अश्रू बघून क्षणात त्याचा राग गेला. त्याला वाईट वाटले. पश्चाताप झाला. मला जवळ घेऊन त्याने 'चुकलो' म्हटले, क्षमा मागितली ...... परंतु ह्या प्रसंगानंतर मी त्याच्याजवळ धडे घ्यायला गेले नाही!

## वहिणीस भेट

"एकदा असे झाले की हिंदी पंचांगाप्रमाणे ऑक्टोबर १९, १९३० ला माझा वाढदिवस येत होता. अटक होताच तो दिवस जवाहरला आठवला. त्या दिवशीच त्याला अटक झाली होती. काही दिवसांनी नंतर त्याने मला पत्रात लिहिले:–

"नुकतेच माझ्या असे ध्यानात आले की, १४४ व्या कलमाखाली माझ्यावर पकडवॉरंट काढणाऱ्या ब्रिटिश सरकारने १९ ऑक्टोबरला मला पकडून एक मोठा अपराध केलेला आहे. कारण एक महत्त्वाची गोष्ट त्या दिवशी करायची मी विसरून गेलो. त्या दिवशी तुझा वाढदिवस होता. एका सुंदर कलात्मक वस्तूची भेट त्या दिवशी मी तुला देणार होतो. माझ्या आवडत्या लाडक्या बहिणीसाठी मनात योजनाही होती. परंतु मनातले सारे मनातच राहिले. ते प्रत्यक्षात आले नाही. माझ्या हातून ही मोठीच चूक झाली नि आता चुटपुट लागली आहे. चुकचुक करीत आहे. परंतु झालेली

चूक दुरुस्त करायला मी धावलो आहे; हे बघ आता एक काम कर. एखाद्या पुस्तक विक्रेत्याकडे जा आणि काही सुंदरशी पुस्तके निवडून घे. कोणती पुस्तके घेशील ? काही प्राचीन काळातील ज्ञानभांडाराची घे; काही मध्य-युगातील श्रद्धेची घे; काही अर्वाचीन संशयवादावरची घे; आणि भविष्यकालीन नवयुगाची घे. घे अशी सारी पुस्तके. त्यांचे पैसेही दे आणि आपल्या भावाची लाडक्या बहिणीला उशीरा का होईना, परंतु आलेली प्रेमाची भेट समज. तुझा भाऊ जरा विसरभोळा आहे. परंतु आपल्या लहान बहिणीची त्याला नेहमी आठवण येत असते. आणि विकत आणलेली ती निवडक पुस्तके वाच. जे वाचशील त्यातून एक जादूचे शहर निर्माण कर. नाना स्वप्ने तेथे असतील. किल्ले असतील. उद्याने असतील. फुलांच्या बागा, खळखळ वाहणारे झरे तेथे असतील. तेथे सुख नि सौंदर्य असतील. जी दुःखे, जे शाप या पृथ्वीला, दुःखी जगाला सोसावे लागत आहेत, त्यांना त्या तुझ्या कल्पनानगरीत मुळींच येऊ देऊ नकोस. जीवन म्हणजे मग सुखमय असा चिरप्रयत्न; हे जादूचे शहर बांधण्यासाठी अविरत उद्योग नि साहस; जीवन म्हणजे सभोवतालची सारी क्षुद्रता नि कुरूपता, सारे दैन्य घालवून देण्यासाठी चाललेली महान साधना असे वाटेल. ”

# ३

# इतरांनी घडविलेले

## काळाच्या पाशातून सुटका

१९१० सालची गोष्ट. एक २१ वर्षांचा भारतीय युवक आणि त्याचा इंग्रज मित्र नार्वे देशात आपले सुटीचे दिवस घालवीत होते. एक दिवस त्यांनी डोंगराळ मुलूख तुडवून खूप रपेट केली आणि घामाघूम होऊन ते आपल्या मुक्कामाला पोहोचले. झक्कपैकी आंघोळ करण्याची त्यांची इच्छा होती. पण ते ज्या छोटेखानी खाणावळीत उतरले होते, त्या खाणावळीत पाणीच्च मिळेना. त्यांना शेजारच्या ओढ्यावर जाऊन आंघोळ करण्याचा सल्ला देण्यात आला. त्याप्रमाणे ते त्या ओढ्यावर गेले. तो ओढा जवळच्या एका हिम नदीतून निघून गर्जना करीत खाली धावत होता. पाणी फार नव्हते. तो भारतीय युवक सरळ पाण्यात शिरला. त्या थंड पाण्याने त्याचे शरीर बधीर करून टाकले. हातापायावर त्याचा ताबा राहिला नाही. पाण्याच्या ओघाबरोबर तो वाहू लागला. हा ओढा दोन तीनशे यार्डांनंतर एका प्रचंड कड्यावरून खाली कोसळत होता. तो युवक वेगाने त्या दिशेने चालला होता. त्याच्या बरोबर असलेला त्याचा इंग्रज मित्र कसाबसा बाहेर पडला होता. त्याच्या लक्षात सारा प्रकार येताच काठाकाठाने धावत येऊन त्याने आपल्या त्या भारतीय मित्राची तंगडी मोठ्या शर्तीने पकडली व त्याला खेचून बाहेर काढले. काळाच्या पाशातून मोठ्या शिताफीने तो भारतीय युवक बाहेर पडला. कोण होता तो भारतीय युवक ? त्या युवकाचे नाव होते जवाहरलाल नेहरू.

## बूट पॉलिश

इंग्लंडमध्ये हॅरो येथील विद्यालयात पंडित जवाहरलाल विद्यार्थी म्हणून शिक्षण घेत असताना घडलेली एक गंमतीची गोष्ट :—

जवाहरलालजींचे वडील पंडित मोतीलाल नेहरू हे एकदा इंग्लंडला गेले

होते, आणि आपल्या चिरंजीवाला भेटायला म्हणून ते हॅरोला गेले होते. सकाळची वेळ होती; आणि जवाहरलाल हे आपल्या बुटांना पॉलिश करीत बसलेले होते.

ते पाहून मोतीलालजींना बरे वाटले नाही. मोतीलाल नेहरू हे अलाहाबाद एथील फार मोठे वकील होते व त्यांनी खूप संपत्ती मिळवून ठेवलेली होती. बूट पॉलिश करीत असलेल्या जवाहरलालना ते म्हणाले, " हे काम तू का करीत बसला आहेस ? नोकराकडून करून घेता येत नाही का ? " जवाहरलालनी त्यावर उत्तर केले, " जे काम मला करता येते त्यासाठी नोकर कशाला हवा ? "

परंतु ह्या उत्तराने मोतीलालजींना समाधान वाटले नाही. जवाहरलालजींच्या लक्षात ते आले.

दुपारी जेवणाच्या वेळी बालक जवाहरलालने आपल्या वर्गशिक्षकाला ही गोष्ट सांगितली व " माझ्या बुटांना पॉलिश करण्यासाठी एक नोकर हवा " म्हणूनही सांगितले.

जवाहरलालचे हे म्हणणे त्याच्या वर्गशिक्षकाने ऐकून घेतले. पण ते त्याला आवडले नाही. असली लहान सहान कामे मुलांनी करणे हे त्यांच्या स्वावलंबनाचे निदर्शक आहे असे ते मानीत होते. त्यांनी अशी इच्छा दर्शविल्याबद्दल जवाहरलाल यांना शिक्षा सांगितली. ते म्हणाले, " तुझ्या वार्डातील सर्व विद्यार्थ्यांच्या बुटांना एक आठवडाभर पॉलिश करण्याची मी तुला शिक्षा देतो. "

जवाहरलालना शिस्त म्हणून ही शिक्षा भोगणे भाग पडले. हे काम ते करीत असताना मोतीलालजी पुन्हा त्यांच्याकडे आले होते. आपल्या पुत्रापुढे बुटांचा ढीग पाहून त्यांना फार आश्चर्य वाटले.

जवाहरलालने घडलेली सारी हकीकत आपल्या वडिलांना सांगितली. तेव्हा मोतीलालजींना आपली चूक समजून आली !

## देशासाठी प्राणही अर्पण करावे

पुण्याचे श्री. काशिनाथ त्र्यंबक भिडे यांनी ' विशाल सह्याद्री 'च्या १४ नोव्हेंबर १९६४ च्या अंकात पंडित जवाहरलाल नेहरू यांच्यासंबंधाची एक

आठवण दिली आहे:—

१९३२-३३ चा सुमार असावा. पंडितजी जेव्हा जेव्हा मुंबईस येत असत, तेव्हा तेव्हा ते मलबार हिलवरील जमशेट नौरोज या बंगल्यात राहात असत मला त्यांचे हाताखाली काम करण्याचा योग आला. त्या वेळी पंडितजी नुकतेच सुटून आले होते. माझे काम म्हणजे त्यांचे फोन घेणे, काही पत्रे लिहिणे, कोणाच्या गाठीभेटी घेणे हे असे. माझे खोलीत फोन असल्यामुळे ते माझे खोलीत येत असत. आतून काही खाण्याचे पदार्थ माझे खोलीत आले होते, परंतु त्याकडे कामामुळे माझे लक्ष गेले नाही. पंडितजी जेव्हा फोन घेण्यास आले तेव्हा त्यांचे लक्ष त्या पदार्थांकडे गेले. मला ते म्हणाले, "आपण हे पदार्थ का खाल्ले नाहीत?" मी म्हणालो, "कामामुळे लक्ष गेले नाही." लगेच ते म्हणाले, "खाते जाना और काम भी करना."

पंडितजींनी मला एकदा त्यांचे खोलीत बोलावले होते. त्या वेळेस त्यांनी मला जो उपदेश केला, तो मी कधी विसरणार नाही. त्यांनी सांगितले, "काँग्रेस के लिये बहुत काम करना और देशके लिये अपना प्राण भी अर्पण करना चाहिये."

## लोकांसाठीच मी हे सांगतो आहे.

पंडित जवाहरलाल नेहरू यांच्या दौऱ्यासंबंधी श्री. मनोहर शंकर जावडेकर यांनी 'महाराष्ट्र एस्. टी. समाचार'च्या जून १९६४ अंकात काही माहिती दिली आहे. त्यातील जरूर तेवढा भाग पुढे घेतला आहे.

तो दिवस १२ एप्रिल १९३७ चा होता. निवडणुकीचा मोसम होता तो. पंडितजींचा महाराष्ट्रभर तुफानी दौरा सुरू होता. त्यांना विसावा मिळत नव्हता. पंडितजी तहान-भुकेची पर्वा करीत नव्हते. रोज कमीत कमी आठदहा सभांतून त्यांना व्याख्याने द्यावी लागत होती. रोजचा चार पाचशे मैलांचा प्रवास त्यांना करावा लागत होता. ते दिवस रणरणत्या उन्हाचे होते.

बारामती, जि. पुणे येथे पंडितजी दिनांक १२ एप्रिल १९३७ रोजी दुपारी दोन वाजता येणार होते ... पंडितजींची मिरवणूक, मानपत्र समर्पण व चहापान असा कार्यक्रम बारामती नागरिकांतर्फे आम्ही आखला होता...

ते बारामतीस आल्यावर पंडितजींना प्रणाम करून मी त्यांना बारामती-करांतर्फे हार घातला.... काही औपचारिक प्रश्नोत्तरानंतर मी त्यांना बारामतीस

ठेवलेल्या कार्यक्रमाची पत्रिका दाखविली. तेव्हा पंडितजी म्हणाले, ‘ मिरवणूक, चहापानाचा कार्यक्रम रद्द करा. माझी ओळख व आभार फक्त एका ओळीतच मानले पाहिजेत. लोकांच्या इच्छेला मान देण्यासाठी मानपत्र स्वीकारीन. परंतु ते वाचून दाखविण्यात वेळ घालवावयाचा नाही. नुसते द्यावयाचे. ’

पंडितजींच्या ह्या सांगण्यावर मी म्हटले की, ‘ पंडितजी, आपण सांगितल्या-प्रमाणे केल्यास लोक नाराज होतील. ’ त्यावर ते म्हणाले, “ लोकांसाठीच मी हे सांगतो आहे. लोकांना माझे विचार ऐकण्यास भरपूर वेळ मिळाला पाहिजे. माझी मिरवणूक, माझ्यासाठी मानपत्र, चहापान या गोष्टींत घालविण्यासाठी माझ्याजवळ वेळ नाही. हाच सर्व वेळ माझे विचार लोकांना समजावून सांगण्यास मला मिळाला, तर मला जो आनंद होईल, समाधान लाभेल, ते माझ्या मिरवणुकीने, मानपत्राने, माझ्या स्तुतिपर भाषणाने व, चहापानाने मला मुळींच लाभणार नाही. तेव्हा कृपया सर्व औपचारिक गोष्टी टाळा व मला जनतेशी बोलण्यास भरपूर वेळ द्या. ”

त्याप्रमाणेच घडले हे सांगावयास नकोच.

## विशाल अंतःकरण

बारामतीच्या वर्णनातील आणखी थोडा भाग—

सोलापूर जिल्ह्यातील कुर्डुवाडी व टेंभुर्णी येथील सभा आटोपून पंडितजी बारामतीस येणार होते. त्यांची येण्याची वेळ दुपारी २ वाजता ठरलेली होती. पण त्यांना तेथे यायला ३॥ वाजले. सभेच्या जागी अथांग जनसागर पसर-लेला होता. खेड्यापाड्यातून पंडितजींच्या दर्शनासाठी आलेले हजारो लोक उन्हातान्हात ताटकळत उभे होते.

पंडितजींची गाडी सभास्थानाच्या दरवाजात आली. पंडितजी लोकांना नमस्कार करीत गाडीतून बाहेर आले ते एकदम गर्दीत घुसले ! त्यांच्यासाठी ठेवलेला खास मार्ग फुकट गेला ! पंडितजी रागाने ओरडले, “ तासचे तास हजारो लोक माझ्यासाठी उन्हात उभे असताना मी त्यांच्यामध्ये न मिसळता एखाद्या राजासारखा राजरस्त्याने जाऊ ? ही मोठी लाजिरवाणी गोष्ट आहे. ” सेवादल प्रमुख डॉ. हर्डीकर, पोलीस, कार्यकर्ते सर्व जण पंडितजींच्या या अनपेक्षित

वागण्याने आश्चर्यचकित झाले! गर्दीतून पंडितजींना व्यासपीठावर न्यावे लागले! व्यासपीठावर ते पोचल्यावर त्यांना त्रास झाल्याबद्दल आम्ही दिलगिरी व्यक्त केली. त्यावर पंडितजी हसून म्हणाले, "मी हजारो लोकांना उन्हात उभे राहण्याची शिक्षा केली. मला १॥ तास उशीर झाला. त्यांची चूक नसून तो माझा अपराध आहे. अर्थात् माझ्या अपराबद्दल मला शासन करण्याचा जनतेला हक्क आहे!"

केवढे विशाल अंतःकरण हे! केवढी जनतेबद्दल आपुलकी! पुढे त्यांनी सांगितल्याप्रमाणे सर्व कार्यक्रम पार पाडला व ते पुण्याच्या वाटेला लागले.

## म. गांधींचे वारस

सप्टेंबर १९३९ मध्ये दुसरे महायुद्ध सुरू झाले तेव्हा पंडित जवाहरलाल नेहरू रंगूनमध्ये ब्रह्मदेशात होते. युद्ध सुरू झाल्याबरोबर ते घाईघाईने तडक वर्धा येथे आले. ते येण्यापूर्वी दोन दिवस काँग्रेस वर्किंग कमिटीची तातडीची बैठक बोलावण्यात आलेली होती. महायुद्धासंबंधी काँग्रेसच्या वतीने एक निवेदन प्रसिद्ध करावयाचे होते. पंडित नेहरू वर्ध्याला पोचताच सर्वांकडून झालेल्या चर्चेचा वृत्तान्त त्यांना समजला. म. गांधींनी त्यांना दुसऱ्या दिवसाच्या चर्चेसाठी निवेदनाचा मसुदा तयार करण्यास सांगितले. ता. १४ सप्टेंबर रोजी जे निवेदन काँग्रेसच्या वतीने म्हणून प्रसिद्ध झाले, त्याचा मसुदा पंडित नेहरूंनी एका रात्रीत तयार केला होता. म. गांधींनी या निवेदनाचे फार कौतुक केले. या युद्धकालातच वर्धा येथे भरलेल्या अखिल भारतीय काँग्रेस कमिटीच्या बैठकीत म. गांधी म्हणाले, "पंडित नेहरू हे माझे वारस आहेत. तेच माझे काम पुढे चालवितील. त्यांचा व माझा अनेक वेळा मतभेद होतो, पण माझ्या मागे ते माझी भाषा बोलतील. त्यांच्या निस्पृह सत्य-निष्ठेमुळे व गुणसमुच्चयामुळे मी त्यांचा 'बंदिवान' झालो आहे."

कोणत्याही राजकीय संघटनेमध्ये असा निस्सीम सौहार्द विश्वास व गाढ स्नेह वरिष्ठ नेत्यांमध्ये क्वचितच दिसून येतो. म. गांधी व पंडित नेहरू यांच्यामध्ये गाढ स्नेहादर होता. गुरुशिष्य, सेनानी व दुय्यम मदतगार किंवा गाढ विश्वास असलेले सहकारी असे अत्यंत जिव्हाळ्याचे नाते या दोन वीर पुरुषांमध्ये निर्माण झालेले होते.

## लगेच राग मावळला

मनाच्या विरुद्ध काही घडले म्हणजे पंडित नेहरू लगेच रागाला येत. त्यांची लहर केव्हा बिघडेल काही सांगता येत नसे. प्रवासात असताना भरगच्च कार्यक्रम असले आणि त्यांना ताण पडला म्हणजे असे घडत असे. पण सवईने अनेक लोकांना हे माहीत झालेले होते. त्यांची छायाचित्रे घेणारांना तर ते चांगलेच परिचित झालेले होते. त्यामुळे त्यांच्याशी त्या वेळीं कसे वागावे हे त्यांना समजलेले होते. अशाच एका दौऱ्याच्या वेळीं नेहरू रागावलेले होते. पण त्यांच्याबरोबर असलेला छायाचित्रकार मोठा चतुर होता. तो सरळ त्यांच्यापाशी गेला व त्याने गुलाबाचे एक ताजे फूल त्यांच्या कोटावर खोवले! लगेच त्यांचा राग मावळला व त्यांच्या चेहऱ्यावर हास्य झळकू लागले. छायाचित्रकाराने त्या क्षणी त्यांचा फोटो घेतला.

* * *

१९४७ सालची गोष्ट. स्वातंत्र्य मिळाल्यानंतरची घटना. एका ठिकाणी मोठी सभा भरली होती. अध्यक्ष बाबू पुरुषोत्तमदास टंडन हे होते. लोक प्रक्षुब्ध होऊन घोषणा देऊ लागले व सभेत गोंधळ माजला. हे सर्व पाहून पंडितजींचा संताप अनावर झाला. आपल्या हातातील छडी परजित त्या प्रक्षुब्ध मानवसागरात उडी घेण्याची त्यांनी तयारी केली. व्यासपीठावरून त्यांनी खरोखरच उडी घेतली तर काय होईल, याची कल्पना येऊन त्यांच्यापुढेच असलेल्या एका शरीरसंरक्षक अधिकाऱ्याने त्यांना विळखा घालून घट्ट पकडून ठेवले. संतापलेल्या नेहरूंनी त्याच्या त्या मगरमिठीतून निसटण्याचा प्रयत्न करून पाहिला पण जमेना तेव्हा ते शांत झाले. लगेच त्यांचा राग मावळला व ते हसत हसत त्याला म्हणाले, ' अच्छा, बाबा, तू जिंकलेस ! '

## आपणाला तुरुंगात डांबले पाहिजे !

भारताला स्वातंत्र्य मिळाल्यावर प्रथमच जेव्हा ते अमेरिकेस गेले होते तेव्हाची गोष्ट. पंडितची स्वतः साहित्यिक होते आणि त्याना वाचनाचा दांडगा नाद होता. अमेरिकेनील तुफानी दौऱ्यातही सवड काढून त्यानी न्यूयॉर्क एथील एका पुस्तकाच्या दुकानाला भेट दिली.

पंडितजी येणार आहेत याची सूचना त्या दुकानाच्या मालकाला आगाऊ दिलेली होती. त्यामुळे त्या दृष्टीने सर्व ठाकठीक होते. त्या दुकानाच्या मालकिणीने दरवाजावरच पंडितजींचे स्वागत आदरपूर्वक केले. आणि स्वतः त्यांच्याबरोबर राहून सारे दुकान व ग्रंथभांडार दाखविले. हे दाखवीत असतानाच अचानकपणे त्या मालकीणबाई पंडिजींना म्हणाल्या, " आपणाला ताबडतोब तुरुंगात डांबले पाहिजे."

मालकिणीचे हे बोलणे ऐकून सारे लोक आश्चर्यचकित झाले. पंडितजींना तर आश्चर्य वाटलेच, पण त्यांच्याबरोबर आलेल्या अमेरिकन सरकारी अधिकाऱ्यांच्या रागाचा पारा कोठच्या कोठे चढून गेला ! हा पंडितजींचा उघड उघड अपमान आहे असे त्यांना वाटल्यावाचून राहिले नाही. ती मालकीण पंडिजींना काही सांगत होती, तेव्हा पंडितजी म्हणाले, " आपणाला काय म्हणायचे आहे मला समजले नाही."

तेव्हा त्या बाईने खुलासा केला, " आपल्या ग्रंथांना बेसुमार मागणी येत आहे. आपण खरोखरच फार सुंदर लिहीत असता. पण भारताचे पंतप्रधानपद स्वीकारल्यापासून आपण लेखन सोडले आहे, आणि त्यामुळे कोट्यवधी वाचक आपल्या एका आवडत्या लेखकाला गमावून बसले आहेत. म्हणून मी म्हणते, की, आपणाला ताबडतोब तुरुंगात डांबले पाहिजे."

यावर पंडितजी मनापासून हसले. कारण त्यांचे सारे लेखन तुरुंगात डांबल्यानंतरच घडलेले होते !

## मित्राशी सलगी !

१९४९ सालची गोष्ट आहे. गव्हर्नर जनरल राजगोपालाचारी यांनी प्रांतिक गव्हर्नरांचे संमेलन भरविलेले होते. त्या वेळीं आसामला गव्हर्नर असलेले श्री. श्रीप्रकाश हेही या संमेलनास आले होते. एके दिवशी त्यांना पंडित नेहरूंना भेटण्यासाठी आज्ञा झाली. आसाममधील डोंगरी लोकांच्या संबंधात विचार-विनियम करावयाचा होता. त्या आज्ञेप्रमाणे आपले सल्लागार श्री. रुस्तुमजी व इतर बरोबर असलेले लोक यांना घेऊन ते पंतप्रधानांचे निवासस्थानी गेले. पंडितजी आपल्या कार्यालयातून अद्यापि आलेले नव्हते. मोठ्या दालनात बसून सर्वजण त्यांची वाट पाहत होते. थोड्याच वेळात पंडितजी तेथे आले.

त्यांच्या सन्मानार्थ सर्वजण उठून उभे राहिले. पंडितजी सर्वांना नमस्कार करीत व प्रत्येकाबरोबर एकदोन शब्द बोलत श्री. श्रीप्रकाश यांच्याजवळ आले. त्याबरोबर त्यांनी त्यांना खाली बसायला सांगितले. आणि 'तुम्ही बसत का नाही ?' असे त्यांना म्हणाले. परंतु आलेल्या इतर लोकांच्याप्रमाणे श्री. श्रीप्रकाशही उभेच राहिले. ते पाहून पंडितजींनी त्यांच्या पोटात एक ठोसा लगावला आणि 'बसा म्हटले ना ?' म्हणाले. श्रीप्रकाशना तो ठोसा चांगलाच लागला आणि ते खाली पडले. पण लगेच पंडितजींनी त्यांना उठवले. श्री. रुस्तुमजी व त्यांच्या बरोबरीचे लोक यांना त्या दोघा मित्रांतील ही सलगी पाहून आश्चर्य वाटल्यावाचून राहिले नाही.

## लोकशाही मूल्यांवर नितांत प्रेम

सध्याचे कॉंग्रेस पक्षाचे खासदार पण एके काळचे विरुद्ध पक्षातील खासदार श्री. शंकरराव मोरे यांनी पंडित जवाहरलाल नेहरू यांच्यासंबंधीच्या काही आठवणी दिल्या आहेत, त्यांपैकी एक अशी :—

पहिल्या पार्लमेंटचे पहिले सेशन १४ मे १९५२ ला सुरू झाले. कॉंग्रेसने अध्यक्ष पदासाठी श्री. मावळंकर यांचे नाव सुचविले होते व विरोधी पक्षाने त्यांना प्रतिस्पर्धी म्हणून माझे नाव सुचविले होते. पहिल्या दिवशी अध्यक्षपदाची निवड हा कार्यक्रमपत्रिकेवर महत्त्वाचा विषय होता. कॉंग्रेसचे बहुमत असल्यामुळे माझ्यासारख्याने यशाची अपेक्षा करणे मूर्खपणाचेच ठरले असते व तशी अपेक्षाही मी करीत नव्हतो. पहिल्याच फेरीत श्री. मावळंकर हे निवडून आले व त्यानंतर त्यांच्या अभिनंदनाची बरसात सुरू झाली. पंडितजींनी पहिले भाषण केले. त्यानंतर विरोधी उमेदवार या नात्याने मला भाषण करावे लागले. श्यामाप्रसाद मुकर्जी आपल्या धिप्पाड देहाने माझ्या जवळ बसून मला उत्तेजन देत होते. माझे ते पहिले भाषण अत्यंत खवचट व कॉंग्रेसला ओरबाडे काढणारे झाले. त्यातील उपहासामुळे कॉंग्रेसचे लोकही माझ्यावर खूष झाले. पंडितजी पण माझ्यावर खूष झाले.

त्यानंतर त्यांना भेटण्याचे मला कारण पडले तर ते मला आदराने वागवीत...पंडितजींवर टीका केली तर पंडितजी रागावत नसत किंवा

अतिशयोक्ति करून बोलावयाचे झाल्यास असे म्हणता येईल, की पंडितजींवर टीका करणे हाच त्यांचा आदर मिळविण्याचा एकमेव मार्ग होता. हिरेन मुखर्जी पंडितजींचे टीकाकारच. त्यांना त्याचप्रमाणे रेणु चक्रवर्ती यांना किंवा विरोधकांपैकी प्रत्येक टीकाकाराला ते आदराने वागवीत. त्यामुळे टीकाकारांना उत्तेजन मिळत असे. विरोधकांचे या टीकेमुळे पंडितजींच्या लोकशाही मूल्यांवर आघात झाला नाही. उलट, त्यांची लोकशाही अधिक बाळसेदार व तेजस्वी बनली. काँग्रेसवर टीका करताना आपण काहीतरी चूक करीत आहोत असे कोणत्याही विरोधकाला त्यांनी वाटू दिले नाही. लोकशाही मूल्यांवर त्यांचे नितांत प्रेम होते.

## एक गोड आठवण

महाराष्ट्रातील एक खासदार श्री. हनुमंत गणेश वैष्णव यांनी दिलेली आठवण —

१९५४ सालची गोष्ट. पंडित जवाहरलाल नेहरू यांच्या वाढदिवसाचा तो दिवस होता. नेहमीप्रमाणे लोकसभेच्या सर्व सदस्यांना त्यांच्या दिल्लीतील 'त्रिमूर्ति' निवासस्थानाच्या मागील उद्यानात गार्डनपार्टी होती. वेळ सायंकाळी साडेसहाची दिली होती....मी व माझे स्नेही, नांदेड विभागातून निवडून आलेले खासदार श्री. शंकरराव टेळकीकर यांनी कार्यक्रमास अगदी वेळेवर उपस्थित राहण्याचे ठरविले. निमंत्रण सपत्निक असल्याने आम्ही आमच्या मंडळींसह थोडे लवकरच म्हणजे सहा वाजताच तेथे जाऊन पोचलो व बागेत इकडे तिकडे फिरत राहिलो.

उद्यानात गार्डनपार्टीची तयारी चालू होती. दुसऱ्या मजल्यावर श्रीमती इंदिरा गांधी स्वतः कर्मचाऱ्यांना सर्व सूचना देत होत्या. पंडितजीही तेथेच होते व श्रीमती इंदिरा गांधीशी बोलत होते. त्यांनी दुसऱ्या मजल्यावरून आम्हांस पाहिले व कार्यक्रमास अजून अर्धा तास अवकाश होता तरी आम्हांस पाहून ते खाली उतरले आणि आमचेकडे आले. मराठवाडा विभागाचे आम्ही एम्. पी. असल्याचे सांगताच ते म्हणाले, 'लोकसभा सदस्यांनी स्वतः मिनिस्टर्सना परिचय करून देणे योग्य नाही. त्यांना व्यक्तिशः ओळखणे हे मंत्र्याचे कर्तव्य आहे.' आमच्या मंडळींच्या सकच्छ नेसलेल्या पातळाकडे बघून ते हसत

म्हणाले, ‘ अर्थात तुम्ही महाराष्ट्रीय एम्. पी. आहात ही गोष्ट उघड आहे.’

नंतर त्यांच्या आवडत्या माकडाकडे बघून ते उद्‌गारले, ‘ हे माकड पूर्वी फार उनाड होते, पण आता ते इतके सभ्य झाले आहे, की बऱ्याचशा सभ्य माणसांना ते स्वतःच्या वागणुकीत मागे टाकील ! ’ नंतर त्यांनी आम्हांस त्यांना भेटीदाखल मिळालेल्या मोलवान वस्तू दाखविल्या. त्यात मुंबईच्या व्यापाऱ्यांनी नुकताच दिलेला तीन सिंहांचा सोन्याचा अशोकस्तंभही दाखविला. सुमारे १०००–१२०० तोळ्यांचा तो अशोकस्तंभ अत्यंत अप्रतिम वाटला. पण पंडितजी म्हणाले, ‘ लोकांचे सोन्याबद्दलचे जे वेड आहे, त्याचे प्रस्तुत सुवर्णस्तंभ हे प्रतीक आहे. ’ सुवर्णस्तंभाचा स्वीकार न करता भारताच्या विकास योजनेस तो दिला जाईल, असे तो देणाऱ्या व्यापाऱ्यांना सांगितल्याचेही ते बोलले.

नंतर ते माझ्या व श्री. टेळकीकरांच्या पत्नीकडे वळून म्हणाले, “ तुम्हां बायकांनाच सोन्याचे जास्त वेड असते. तुमच्या प्रत्येकीच्या अंगावर २०–२० तोळ्यांचे तरी दागिने असतील. दागिन्यांनी स्वतःला सुशोभित करणे हा रानटी माणसांचा प्रकार आहे. स्वतःचे मन सुसंस्कृत करणे हा मोठा अलंकार आहे. ” पंडितजींचे हे उद्‌गार ऐकून दोघीही खजील झाल्या. त्यानंतर पंडितजींनी उद्यानात स्वतः लावलेली आवडती फुलझाडे आम्हांस दाखविली. या सर्व गोष्टीत अर्ध्या तासाचा वेळ कसा निघून गेला हे कोणासही कळले नाही. साडेसाहा वाजता पाहुणेमंडळी येण्यास सुरुवात झाली व पंडितजी त्यांच्या स्वागतात मग्न झाले. पंडितजींच्या निकट सान्निध्याचा लाभ होऊन त्यांचे मनोगत कळण्याची दुर्मिळ संधी लवकर जाण्याच्या चुकीतून आम्हांला मिळाली, या बद्दल आम्हां सर्वांना धन्यता वाटली.

## क्रुश्चेव्हला उत्तर !

पंडित जवाहरलाल नेहरू यांचे राजकरणी चरित्र लिहिणाऱ्या मायकेल ब्रेशर यांनी सन १९५५ मधील एक प्रसंग वर्णन केलेला आहे :—

त्या सालच्या अखेरीस रशियाचे सूत्रधार श्री. बुल्गॅनिन व श्री. क्रुश्चेव्ह यांनी भारतास भेट दिलेली होती. या भेटीमध्ये एके दिवशी श्री. क्रुश्चेव्ह यांनी एक भयावह बातमी सांगून पंडितजींस अभिमानपूर्वक अभिवादन केले. ती बातमी होती रशियन शास्त्रज्ञांनी मोठ्या प्रमाणात विनाश घडविणारे नवे

अस्त्र नुकतेच शोधून काढले असल्याबद्दलची. क्रुश्चेव्हनी त्या अस्त्राबद्दलची माहिती मोठ्या ढंगदारपणे सांगितली.

पंडितजींनी ही बातमी नम्रपणे ऐकून घेतली व नंतर म्हटले, " हे पहा, दोन हजार वर्षांहून मागच्या काळात एका महान् योद्ध्याने आमच्या देशावर राज्य केले. त्याचे नाव होते सम्राट अशोक. एकामागून एक अनेक लढाया लढून त्याने देशभर सत्ता स्थापन केली होती. त्याचे सेनापती भराभर विजय संपादन करीत व प्रत्येक लढाईची हकीकत अशोकाच्या कानांवर घालताना हजारोंना ठार केल्याच्या व कित्येकांना गुलाम बनविल्याच्या कथा सांगत. या कत्तलीच्या कहाण्यांमुळेच पुढे अशोकाचे मन विद्ध झाले व त्याने बौद्ध धर्म स्वीकारला. एकदा एका लढाईनंतर नेहमीप्रमाणे त्याचा एक सेनापती विनाशाच्या, हत्याकांडाच्या व त्याच्यासारख्याच हलकल्लोळाच्या कथा सांगू लागला. त्याबरोबर अशोकाने त्यास एकदम थांबविले व पुढे सरसावून त्याच्या कंबरेची तरवार त्याने हिसकावली; आणि तिचे दोन तुकडे करून खड्या आवाजात त्याने म्हटले, ' हत्याकांड व अत्याचार पुरे झाले. इतःपर असला एकही प्रकार घडता कामा नये. या देशावर शांतीचेच साम्राज्य प्रस्थापित झाले पाहिजे. "

...पंडितजींची ही कथा श्री. क्रुश्चेव्ह यांनी लक्षपूर्वक ऐकली. तिच्यासंबंधी त्यांनी टीकेचा एक शब्दही उच्चारला नाही, असे सांगतात.

## शांततेचा महान उपासक

राष्ट्रसंघाच्या पंधराव्या अधिवेशनाला पंडित जवाहरलाल नेहरू हे अमेरिकेला गेलेले होते. त्या वेळचे वर्णन श्री. राजाराम माने यांनी केलेले १४ नोव्हेंबर १९६४ च्या ' विशाल सह्याद्री 'मध्ये प्रसिद्ध झालेले आहे. त्यातील एक दोन प्रसंग लक्षात घेण्यासारखे आहेत.

जागतिक राजकारणात पंडितजींचे स्थान किती मोठे होते याची कल्पना संयुक्त राष्ट्रसंघाच्या पंधराव्या आमसभेच्या बैठकीच्या वेळी आली. या बैठकीला जगातील बहुतेक सर्व राष्ट्रांचे राष्ट्रप्रमुख वा पंतप्रधान हजर होते. या बैठकीपुढे यजमान राष्ट्र म्हणून त्या वेळचे अमेरिकेचे अध्यक्ष जनरल आयसेन हॉवर यांनी भाषण केले.

ह्या अधिवेशनाला रशियाचे पंतप्रधान निकिता क्रुश्चेव्ह, इंग्लंडचे प्रधानमंत्री हॅरॉल्ड मॅक्मिलन, संयुक्त अरब प्रजासत्ताकाचे अध्यक्ष अब्देल गमाल नासर, युगोस्लाव्हियाचे अध्यक्ष मार्शल टिटो, इंडोनेशियाचे डॉ. सुकार्नो, क्यूबाचे फिडेल कॅस्ट्रो, ऑस्ट्रेलियाचे मेंझिस, घानाचे डॉ. नक्रुमा, कॅनडाचे डिफेनबेकर, जॉर्डनचे राजे, पोलंडचे गोमुल्का, हंगेरीचे कादर आणि असेच अनेक पंतप्रधान व परराष्ट्रमंत्री हजर होते.

अशा ह्या राष्ट्रधुरिणांमध्ये पंडितजी आपल्या महान व्यक्तित्वाने तळपत होते. सर्वांच्या आदराचे ते स्थान होते. जनतेबद्दल काय लिहावे ? जेथे जेथे पंडितजी गेले तेथे तेथे जनसागराला उधाण आले होते. शांततेचा महान उपासक म्हणून सर्वजण त्यांच्याकडे आदराने पाहत होते.

## आफ्रो आशियायी राष्ट्रांचे सर्वमान्य नेते

संयुक्त राष्ट्रसंघाच्या १५ व्या अधिवेशनामध्ये एका ठरावाचा विचार करण्यासाठी आफ्रो आशियायी राष्ट्रांची एक बैठक बोलावण्यात आलेली होती. ह्या बैठकीत ठरावाचा मसुदा मान्य करावयाचा होता. त्याचप्रमाणे तो ठराव कोणी मांडावयाचा ते ठरवावयाचे होते. ह्या अधिवेशनासाठी बरेच देशप्रमुख, पंतप्रधान, परराष्ट्रमंत्री हजर होते. म्हणून त्या वेळचे आफ्रो आशियायी गटाचे त्या महिन्याचे अध्यक्ष व आताचे सरचिटणीस श्री. यू थांट यांच्यापुढे मोठा नाजूक प्रश्न उभा राहिला. त्या दिवशीच्या बैठकीला कधी नव्हते एवढे अध्यक्ष हजर राहिले. ती बैठक यूनोच्या इमारतीतील सर्वात मोठ्या समितीदालनात भरली होती. सर्व पंतप्रधान जवळ जवळ एका रांगेतच बसले होते. अध्यक्षांची जागा खाली होती. यू थांट यांनी अगोदरच विचारविनियम करून ठरविले होते की, पंडितजींनी अध्यक्षस्थान स्वीकारावे. त्यांनी प्रास्ताविक भाषण केले नि पंडितजींचे नाव सुचविले. अध्यक्षपद स्वीकारण्यासाठी पंडितजी जेव्हा उठले, तेव्हा सर्वांनी त्यांचे उत्स्फूर्त स्वागत केले; आणि त्याहीपेक्षा जास्त टाळ्यांचा कडकडाट झाला तो पंडितजींनी ठराव समजावून सांगितल्यावर. तेथे जमलेल्या सर्व राष्ट्रप्रमुखांनी पंडिजींनीच आमसभेत हा ठराव मांडावा असे एकमताने ठरविले. त्याकरिता मतदान घेण्याची गरज नव्हती की अन्य मार्ग अनुसरण्याचा प्रश्न नव्हता. पंडितजी

आफ्रो आशियायी राष्ट्रांचे सर्वमान्य नेते होते. हे नेतृत्व त्यांनी आपल्या अंगच्या असामान्य कर्तृत्वाने, अजोड ज्ञानाने व कोणत्याही गोष्टीचा जागतिक दृष्टिकोनातून विचार करण्याच्या पद्धतीने मिळविलेले होते.

## व्यक्तित्वाचा अद्वितीय प्रभाव

प्रसिद्ध सिनेमानटी वैजयंतीमाला यांनी पंडित जवाहरलाल नेहरू यांच्यासंबंधी एक दोन आठवणी दिल्या आहेत. त्या म्हणतात,

पोप, बुल्गानिन, क्रुश्चेव्ह, ड्यूक ऑफ एडेनबरा तसेच महाराणी एलिझाबेथ इत्यादि मोठमोठ्या व्यक्तींची भेट घेण्याचे भाग्य मला लाभलेले आहे. परंतु पंडितजींच्या व्यक्तित्वाचा अद्वितीय प्रभाव माझ्यावर पडलेला होता. हृदयाला पराभूत करणारी ती एक जादू होती !

पंडितजींना मी तशी अनेक वेळा भेटलेली होते. पण प्रत्येक भेटीमध्ये काही तरी नवेपणाची जाणीव होत होती. एकदा पंडितजींनी मला लंचसाठी बोलावले होते. आणि तेथे त्यांनी लेडी माऊंटबॅटनशी माझा परिचय करून दिला होता. मी पंडितजींना आपली एक इच्छा बोलून दाखविली होती. त्यांच्यासमोर मला एकदा नृत्य करून दाखवायचे होते. पंडितजींनी माझे हे म्हणणे मान्य केले होते.…थोड्या दिवसांपूर्वी षण्मुखानंद हॉलमध्ये पंडितजीनी माझे नृत्य ‘ चण्डालिका ’ पाहिलेही होते.

आणखी एका प्रसंगाची आठवण होते. त्या वेळी अमेरिकेचे राष्ट्राध्यक्ष आयसेन हॉवर भारतामध्ये आलेले होते. भारतीय कलाकारांचा पंडितजींनी त्यांना परिचय करून दिलेला होता. १९५५ मध्ये एका फंडासाठी माझ्या नृत्याचा कार्यक्रम ठेवलेला होता व त्यानंतर पंडितजींनी मला आपल्याबरोबर खान्यासाठी नेलेले होते. टेबलावर जपानहून आलेले एक मोठे खरबूज ठेवलेले होते. पंडितजींनी स्वतः कापून त्याची फोड मला दिलेली होती.

आता अशा त्यांच्या अनेक आठवणी जाग्या होत आहेत आणि त्या त्यांच्या स्वतःच्या आठवणींत मिळून जात आहेत !

## सामान्यांचे कैवारी

पंडित जवाहरलाल नेहरू हे लोकांचे नेते होते. त्यांना लोकांच्याबद्दल अत्यंत

प्रेम वाटायचे. जनसागर पाहून त्यांचे मन उचंबळून यायचे. जनसंमर्दात ते स्वतःला विसरून जात. पंडितजी आणि जनता यांचे नाते केवळ नेता व अनुयायी एवढेच नव्हते, तर अगदी सामान्य माणसांशी मैत्री करण्यात, त्यांच्या सुख-दुःखात भागीदार होण्यात त्यांना आनंद वाटायचा. त्यांनी स्वतः बादशाही ऐश्वर्य भोगले होते, पण दरिद्रीनारायणाची सेवा करणाऱ्या थोर पुढाऱ्याच्या— महात्मा गांधीजींच्या—सहवासात आल्यापासून त्या बादशाही वैभवाचे महत्त्व त्यांना फारसे वाटत नसे.

होमरूल लीगच्या प्रचारासाठी हिंडताना आपल्या सहकाऱ्यांबरोबर बसून त्यांनी चणे कुरमुरे खाल्ले होते; आणि बिहारमधील त्या भीषण भूकंपाने पिडित झालेल्यांच्या मदतीस गेल्यावर स्वतः कुदळ फावडे घेऊनही त्यांनी काम केले होते. वाराणशी येथील पुरभय्या त्यांना दरमहा पाच रुपये साखर पाण्यासाठी पाठवीत असे. पंडितजी जेव्हा बनारसला जात तेव्हा त्या पुर-भय्याच्या मोडक्या तोडक्या घरात जाऊन पाच मिनिटे तरी घालवीत असत.

अमेरिकेला ते गेले असताना त्याना एकदा बोस्टन विमानतळावर पोच-विण्याची कामगिरी बटलर नावाच्या मोटरड्रायव्हरने पार पाडली. त्याबद्दल त्याला धन्यता वाटत होती. पंडितजींनी त्याचे मनोरथ ओळखून त्याचा फोटो आपल्यासमवेत काढून घेतला. शिकागोला त्या कुबेरनगरीतून वेळात वेळ काढून ते सुमारे साठ मैलांवरील शेतकऱ्यांच्या झोपडीत जाऊन आले होते.

## बांडुंगची आठवण

सन १९५५ साली बांडुंग येथे इंडोनेशियामध्ये एक तटस्थ राष्ट्रांची परिषद भरलेली होती. ह्या परिषदेला आशिया आणि आफ्रिका खंडांतल्या २४ राष्ट्रांचे प्रमुख जमलेले होते. दक्षिण अमेरिकेतील अनेक राष्ट्रांनी ह्या परिषदेला सहानुभूती दाखविलेली होती.

भारतातर्फे पंडित जवाहरलाल नेहरू हजर राहिलेले होते. जमलेल्या सर्व राष्ट्रप्रमुखांमध्ये ते वयाने व मानानेही मोठे असल्यामुळे चर्चेचा सारा भाग त्यांनीच उचललेला होता. भारत देश मोठा होताच पण त्याचा पुढारीही विशाल दृष्टिकोनामुळे असाच मोठा होता.

पंडित नेहरूंनी ह्या परिषदेत आपण शांततावादी का आहोत याचे उत्तम

१४४६१

दिग्दर्शन केले. त्यांनी जमलेल्या सर्व [illegible] राष्ट्र नेत्यांना विचारले की, " आपण येथे कशासाठी जमलो आहो ? तर आपण आपले देश स्वतंत्र केल्यानंतर आपणांपुढे अनेक प्रश्न निर्माण झाले आहेत, ते प्रश्न आपणांला सोडवावयाचे आहेत. आता आपली लढाई आहे ती दुसऱ्या राष्ट्राबरोबर नाही, तर आपणांला आता आपल्याच राष्ट्रातील दारिद्य, रोगराई, अज्ञान यांविरुद्ध लढावयाचे आहे. त्यासाठी शांतता पाहिजे. आज ही जागतिक शांतता धोक्यात येत आहे, तेव्हा हा धोका टाळण्याचा विचार करण्यासाठी आपण येथे जमलो आहो. आशिया आणि आफ्रिका खंडांतील नवीनच स्वतंत्र झालेल्या राष्ट्रांच्या पायांतल्या राजकीय, वसाहतवादी शृंखला आपण तोडल्या. तशाच आर्थिक परावलंबनाच्या साखळ्या आपणांला तोडावयाच्या आहेत. त्या आपण तोडूच. पण त्यासाठी आपणांला शांतता हवी." पंडित जवाहरलाल नेहरू असे म्हणाले, तेव्हा सर्वांनी टाळ्यांचा कडकडाट केला.

जगातील बड्या राष्ट्रांना सारे जग स्वतःच्या नजरेने पाहण्याची आणि मोजण्याची सवय लागलेली होती. ह्या गोष्टीचा उल्लेख करून पंडित नेहरू म्हणाले, " यूरोप अमेरिकेच्या राज्यकर्त्यांना अशी सवय लागलेली आहे की, त्यांचे जे प्रश्न असतील, त्यांच्या ज्या समस्या असतील, किंवा त्यांची इतरांबरोबर जी भांडणे असतील, ती जणू साऱ्या जगाचीच आहेत ! आणि म्हणून त्यांनी झेंडा उभारला की, इतर साऱ्या राष्ट्रांनी या अगर त्या गटात सामील झाले पाहिजे. मला हे समजत नाही की, त्यांचे दुसऱ्या कोणाबरोबर वैर असले म्हणून मी हे वैर का धरावे ? मला असे सांगावेसे वाटते, आम्ही जर मोठ्यांचे-मग ते अमेरिका किंवा रशिया यांचे कुणाचेही—आंधळे अनुयायी बनलो, तर ते आमच्या स्वातंत्र्याला, व्यक्तिजीवनाला आणि आत्मविश्वासाला धोका देणारे ठरेल. मी ती गोष्ट कधीच मानणार नाही."

पंडित नेहरूंचे हे शब्द आजही आशिया आफ्रिकेतल्या अनेक राष्ट्रप्रमुखांच्या कानांत निनादत आहेत.

## जर्मन लोकांचे प्रेम

जर्मनीमध्ये श्री. व्यं. न. कुलकर्णी म्हणून आपल्याकडील एक पत्रकार राहतात. जुलै १९५६ मध्ये पंडित जवाहरलाल नेहरू यांनी पश्चिम जर्मनीला भेट

दिली त्या वेळचे एक दोन प्रसंग श्री. कुलकर्णी यांनी वर्णिले आहेत.

" १९५६ च्या उन्हाळ्यात पंडित नेहरूंनी पश्चिम जर्मनीला भेट दिली त्या वेळीं तेथील जनतेने त्यांचं जे हार्दिक स्वागत केलं, त्याला जर्मनीत तरी तुलना नाही....

" ल्युबेक शहराजवळच्या एका अगदी लहानशा खेड्यात माझे एक वयस्क जर्मन मित्र राहतात. रुडोल्फ लोराय हे त्यांचं नाव. आपल्या गावात ते लहानसं 'सांस्कृतिक मंडळ' चालवितात... 'भारतात जाऊन नेहरूंचे दर्शन मी एकदा घेणारच घेणार! त्यासाठी मी पैसे देखील साठवतो आहे!' असं मला ते नेहमी सांगत.

" पंडित नेहरू हांबुर्गला येणार असल्याची बातमी कळताच ते माझ्या तेथील बिऱ्हाडी आले नि म्हणाले, 'तुला माहित आहे पंडित ... आता माझं वय झालंय. भारतभेटीचं माझं स्वप्न या जन्मात साकार होईल न होईल. पंडित नेहरूंना अगदी जवळून पाहण्याची माझी इच्छा हांबुर्गमध्येच पुरी करणं आता तुझ्या हाती आहे. मी काही पत्रकार नव्हे की हांबुर्गच्या राजदरबारी माझं कसलं वजनही ...!'

" खटपट करून लोराय यांच्या नावाची निमंत्रणपत्रं मिळविली. तेही मजबरोबर नेहरूंच्या अनेक कार्यक्रमांत भाग घेऊ लागले. हांबुर्ग सरकारच्या मुख्यमंत्र्यांनी तेथील नगरभवनात पंडित नेहरूंना एक बडी मेजवानी दिली. मेजवानीनंतर पंडितजी एका ऐषारामी दिवाणखान्यात येऊन एका कोचावर आराम करीत बसले. शेजारच्या कोचावर इंदिरा गांधी होत्या. मला इंदिरा गांधींकडून जर्मन स्त्रियांकरिता खास असा एक शुभ-संदेश प्रसिद्धीसाठी हवा होता. तो घेण्याकरिता मी आत गेलो तो लोराय यांना बरोबर घेऊनच. तिथल्याच एका खुर्चीवर मी माझ्या जर्मन मित्राला बसवलं. इंदिराबाईजवळून संदेश लिहून घेतल्यावरही मी त्यांच्याशी पाचसात मिनिटे बोलत बसलो. हेतू हा की लोराय यांना पंडित नेहरूंचं दर्शन अगदी जवळून घ्यायचं दृष्टिसुख भरपूर लाभावं. नेहरू त्या कोचावर धूम्रपान करीत अगदी आरामशीर बसले होते. त्यांची त्या वेळची मुद्रा कमालीची शांत व प्रसन्न दिसत होती.

" थोड्या वेळानं मी लोरायसह तिथून उठलो व शेजारच्या हॉलमध्ये गेलो. लोरायनं उजव्या हातानं माझा खांदा पकडला... 'पंडित, जन्मभर मी तुझे

हे उपकार विसरणार नाही!' लोरायनं डाव्या हातानं हातरुमाल डोळ्याला लावला. आनंदाश्रू त्याला आवरता आवरेनात.

"दुसऱ्या दिवशी मला लोराय म्हणाले, 'इतक्या निरपेक्ष प्रेमानं नि सोज्वळ आदरानं आमच्या देशानं आतापर्यंत क्वचित्च कोणाचं स्वागत केलं असेल. आजचे आमचे धर्मगुरूदेखील मानवाला दुःखाच्या गर्तेत ढकलणारं राजकारण खेळतात नि नेहरूंसारखा राजकारणीपुरुष खरा धर्मप्रचार करतो. जर्मन माणसाच्या डोळ्यांत सहसा कधी कुणाला अश्रू दिसायचे नाहीत. आत्यंतिक दुःख किंवा पराकोटीचा आनंदच त्यांचं शिस्तबद्ध मन हेलावू शकतो. नेहरूंच्या दर्शनानं लाखो जर्मनांच्या डोळ्यांतून आनंदाश्रूंच्या धारा वाहविल्या. यातलं मर्म काय ते तू ओळख.'"

## थोर माणसं अशी उदार असतात

श्री. व्यं. न. कुलकर्णी यांनी पंडित जवाहरलाल नेहरू यांची आणखी एक आठवण दिलेली आहे.

"आपल्या देशातल्या किंवा परदेशातल्या कार्यक्रमाबाबत कमालीचा वक्तशीरपणा राखणं हे नेहरूंचं फार मोठं वैशिष्ट्य होतं. हांबुर्गमधल्या एका पत्रकार भेटीकरिता ते अगदी सेकंदबरहुकूम हजर राहिले. आम्ही पत्रकार मंडळी पाच मिनिटं अगोदरच आलो होतो. जर्मन सरकारनं नेहरूंच्या दिमतीस एक दुभाष्या दिलेला होता. कधी नव्हे ते तोच बापडा या वेळी पाच मिनिटं उशीरा आला. तोपर्यंत प्रश्नोत्तरांना सुरुवात झाली होती. बहुतेक पत्रकारांना इंग्रजी समजत होतंच, अवश्य तेव्हा आम्ही कुणीतरी भाषांतराचं काम करीत होतो.

"जर्मन दुभाष्या आला तेव्हा नेहरूंबरोबर असलेले बडे जर्मन अधिकारी डोळ्यांतून त्याच्यावर आग ओकत होते. जर्मन माणसं सरसहा वक्तशीर-पणाबद्दल जगप्रसिद्ध. हा बाविळटपणा एका सुशिक्षित जर्मनानं व तोही इतक्या थोर पाहुण्यासमोर करावा, याबद्दल सर्वच जर्मन नाराज होते. तो दुभाष्या तर शरमेनं अगदी थिजून गेला होता. त्यानं खेदपूर्वक पंडितजींची माफी मागितली. पंडितजींनी मात्र त्याच्याकडे एक कौतुकाचा, उत्तेजनाचा कटाक्ष टाकला. त्यांना म्हणायचं होतं, 'कोण चुकत नाही? जाऊ द्या हो!

" पत्रकार बैठक संपल्यावर नेहरूंनी त्या दुभाष्याची मुद्दाम वाहवा केली. आम्ही सर्वांनी ओळखलं की त्याच्या बाजूनं जर्मन अधिकाऱ्यांजवळ नेहरूंनी केलेली ती एक वजनदार रदबदली होती.

" खरी थोर माणसं अशी उदार असतात. एक जर्मन वृत्तपत्र संपादिका तिथंच मला म्हणाल्या. "

## मी आता जगद्गुरू झालो

पाठगाव पीठाचे क्षात्रजगद्गुरू श्री. सदाशीवराव बेनाडीकर पाटील यांनी दिनांक ३० नोव्हेंबर १९५७ रोजी प्रतापगडावर पंडित जवाहरलाल नेहरू यांच्या हस्ते श्री शिवाजी महाराजांच्या पुतळ्याचे उद्घाटन झाले, त्या वेळची एक आठवण सांगितलेली आहे :—

पंडित जवाहरलाल नेहरू हे प्रतापगडावर श्रीशिवछत्रपतींच्या पुतळ्याचे अनावरण करण्याकरिता आले, त्यावेळी तेथील भवानीचे मंदिरात नामदार यशवंतराव चव्हाण यांनी " शिवछत्रपतींचे गुरु श्री मौनी महाराज यांच्या धर्मपीठावर अधिष्ठित झालेली व्यक्ती " असे म्हणून माझी पंडित नेहरूंना ओळख करून दिली व या पीठाचा त्रोटक इतिहासही सांगितला.

प्रतापगडावरील सर्व कार्यक्रम आटोपून गडाच्या पायथ्याशी जमलेल्या लाखो लोकांपुढे व्याख्यान देण्याकरिता पंडित नेहरू हे प्रतापगडाच्या पायथ्याच्या पटांगणात आले, त्या वेळी तेथे जमलेल्या लोकांनी पंडित नेहरूंनी व्याख्यानाचे वेळी महाराष्ट्रीय फेटा बांधावा अशी त्यांना विनंती केली. त्यावेळी पंडित नेहरू म्हणाले, " मला स्वतःला फेटा बांधता येत नाही. श्री क्षात्रजगद्गुरू यांनी आपल्या डोक्यावर बांधलेला भगवा फेटा तसाच न मोडता माझ्या डोक्यावर ठेवला, तर महाराष्ट्रीय पद्धतीचा हा फेटा मी आनंदाने माझ्या डोक्यावर धारण करीन. " त्यांनी असे म्हटल्यावर मी माझ्या डोक्यावरील फेटा न मोडता पंडित नेहरूंच्या डोक्यावर ठेवला. त्या वेळी जनसमुदायाने प्रचंड टाळ्यांचा कडकडाट केला. हा टाळ्यांचा कडकडाट कमी झाल्यावर पंडित नेहरू विनोदाने म्हणाले, " मी आता जगद्गुरू झालो ! "

स्थळप्रत



## बगीचांची आवड

१९५८ सालातील गोष्ट आहे. श्री. काकासाहेब गाडगीळ यांची पंजाबचे राज्यपाल म्हणून नेमणूक झालेली होती. तेव्हा पंजाबात चंदीगड ह्या राजधानीचे ठिकाणी जाण्यापूर्वी काकासाहेब हे पंडित जवाहरलाल नेहरू यांना भेटण्यासाठी दिल्लीला गेलेले होते. भेट थोडा वेळ झाली. तेवढ्या वेळात पंजाबातील व देशातील राजकीय परिस्थितीवर त्यांच्यामध्ये बोलणे झाले.

काकासाहेब जेव्हा उठून जायला निघाले, तेव्हा काही आठवल्यासारखे करून पंडितजी त्यांना म्हणाले, " हे बघा, चंदीगडच्या राजभवनाचा बगीचा अत्यंत सुंदर आहे, पण तो याहीपेक्षा अधिक सुंदर कसा करता येईल इकडे लक्ष देता आले तर पहा. "

पंडितजींची बगीचांची आवड काकासाहेबांना माहीत होती. पण ह्या वेळीं हे बोलणे झाल्यामुळे काकासाहेब विनोदाने म्हणाले, " राज्यपालाच्या कर्तव्यात माळ्याचे कामाचाही समावेश होतो काय ? " त्यावर पंडितजी केवळ हसले ! पण पुढे काकासाहेबच म्हणाले ! " मला माळ्याचे काम येत नाही, तथापि आपली सूचना जरूर लक्षात ठेवीन आणि त्याप्रमाणे प्रयत्न करीन. "

त्यानंतर पंडितजी जेव्हा पंजाबात गेलेले होते, तेव्हा काकासाहेबांनी इतर कामे आटोपल्यावर त्यांना राजभवनाच्या बगीचामध्ये फिरवले; आणि आपण केलेल्या सुधारणा दाखविल्या. बगीचातील निरनिराळ्या रंगांची फुले व पाने आणि विविध लता पाहून पंडितजी खूष झाले आणि त्यांनी मोकळ्या मनाने काकासाहेबांना शाबासकी दिली.

## नेहरूभेटीने कल्याण

१२ जुलै १९६१ रोजी पुण्याला मोठा पूर येऊन पुणे शहराची मोठी वाताहत झाली. हजारो लोक घरादाराला मुकले. तीसएक लोक प्राणालाही मुकले.

ह्या पूरग्रस्तांची पाहणी करीत पंडित जवाहरलाल नेहरू पुण्याच्या नव्या पुलावरून पुढे गेले ( ता. २९-७-६१ ) या वेळीं केस पांढरेशुभ्र झालेला, सत्तरी ओलांडलेला एक वृद्ध गृहस्थ पुलाच्या कोपऱ्याजवळच पडलेल्या आपल्या घराच्या मातीच्या ढिगाऱ्यावर सचिंत नजरेने खालीवर पाहात

बसलेला होता. त्याला एकाने विचारले, " बाबा, नेहरू या बाजूने गेलेले बघितले का तुम्ही ? " त्यावर त्या म्हाताऱ्याने पुढील सूचक उद्गार काढले— " अरे, नेहरू म्हणजे भारताचा राजा आहे. या दैवी थोर पुरुषाने पुण्याला भेट दिली आणि पुरामुळे आपत्तीत सापडलेल्या लोकांबद्दल जी सहानुभूती दाखविली, त्यातच सर्व नुकसानीची भरपाई झाली. थोर पुरुषांच्या दृष्टीने देखील कल्याण होते म्हणतात. मग पंडितजींच्या भेटीने पूरग्रस्त पुणेकरांचे कल्याण होईल अशी माझी खात्री आहे. "

## दर्शनीय वस्तू

" ठरलेल्या वेळी एखाद्या सभेला किंवा कामाच्या कचेरीला जाता आले नाही तर पंडित जवाहरलाल नेहरू यांना वाईट वाटत असे. एकदा परराष्ट्रीय मंत्र्याच्या कचेरीत त्यांनी मला सकाळी ९ वाजता भेटायला बोलावले होते. परंतु ते स्वतः ४० मिनिटे उशीरा आले. आल्याबरोबर म्हणाले, ' माफ करा महाकवी, आता मी लाल किल्ला किंवा कुतुबमिनार यांच्याप्रमाणे दर्शनीय वस्तू झालो आहे. रोज शेकडो लोक झुंडीने भेटायला येत आहेत. आज नेहमी-पेक्षा थोडे जास्त लोक आले होते, त्यामुळे थोडा वेळ लागला. ' नंतर माझी भेट निवांतपणे झाली. "

हिंदीचे प्रसिद्ध कवी रामधारीसिंह ' दिनकर ' यांनी ' पंडितजीके संस्मरण ' मध्ये असे लिहिले आहे. या महाकवींनी आणखी लिहिले आहे, " पंडितजी कामानिमित्त सकाळी ८–८॥ वाजता तयार होत असत. माडीवरून खाली येताच त्यांना दोन प्रकारच्या लोकांना भेटावे लागत होते. एक अशा प्रकारचे लोक असत की, ज्यांनी आधी परवानगी काढलेलीही नसे आणि ते जिन्या-खालच्या हॉलमध्ये जमा झालेले असत; आणि दुसरे, जे निरनिराळ्या ठिकाणाहून येऊन रांगेने उभे राहिलेले किंवा बसलेले असत. यांचा सहज समाचार घेऊन पंडितजी कचेरीस जात, किंवा संसदेत हजर राहात. दुपारी जेवणानंतर ते तीन वाजायच्या आतच पुन्हा कामावर हजर होत. रात्रीचे जेवण ते आठ वाजता घेत व पुन्हा नऊ वाजता कामाला सुरुवात करीत. त्यांची झोपण्याची वेळ रात्री एक ते सकाळी सहापर्यंत असे.

## योगी पंडितजी

हिंदीचे महाकवी रामधारीसिंह ‘ दिनकर ’ यांनी पंडित जवाहरलाल नेहरू यांच्या संबंधीच्या आठवणी देताना आणखी लिहिले आहे, “ चीनच्या आक्रमणानंतर म्हणजे ऑक्टोबर १९६२ नंतर थोडे दिवसांनी–१४ डिसेंबर १९६२ रोजी–मी पंडितजींना भेटलो होतो. त्या दिवशी पंडितजींच्या पुष्कळ गोष्टींचा माझ्या मनावर प्रभाव पडला. सुरुवातीचा थोडा वेळ जाताच मी चीनशी झालेल्या ‘ पंचशील ’ कराराबाबत व चीनच्या आक्रमणाबाबतही बोललो. नंतर मी त्यांना विचारले, ‘ एक गोष्ट सांगा पंडितजी, चिनी आक्रमणानंतर आपणाला झोपही आली नाही अशा किती रात्री गेल्या ? ’

“ पंडितजी म्हणाले, ‘ तुम्हाला आश्चर्य वाटेल. मला झोप लागली नाही, अशी एकही रात्र गेलेली नाही. काळजी आपल्या ठिकाणावर आहे आणि झोपही आपल्या वेळेवर येते आहे. मी चांगला झोपून जातो. ’

“ माझ्या तोंडून मग अनायासे शब्द निघाले, ‘ तर मग आपण योगी आहात पंडितजी ! आपल्या काळात आम्ही जन्माला आलो आहो हे आमचे सौभाग्य आहे. ’

“ देशातील एक नामवंत श्रेष्ठ पुढारी त्या दिवशी पंडितजींना भेटले होते; आणि अमेरिका व ब्रिटन यांच्या पक्षात आपण सामील व्हावे व आपले रक्षण करून घ्यावे, असा सल्लाही त्यानी पंडितजींना दिला होता. त्यांचे ते म्हणणे ऐकून पंडितजी आश्चर्यचकित झाले आणि मग ते म्हणाले, ‘ त्या गृहस्थांनी हेही विचारले की, एवढ्या मोठ्या संकटामध्ये तुम्ही घाबरत कसे नाही ? ’ मी पंडितजींना विचारले, ‘ मग तुम्ही काय उत्तर दिले ? ’ तेव्हा ते म्हणाले, ‘ उत्तर काय द्यायचे ! मी म्हणालो, घाबरून काय होणार ? धैर्याने आणि विचाराने या संकटाला तोंड देण्याचा मी प्रयत्न करीत आहे. ” नंतर ते आणखी म्हणाले, “ आम्ही प्रत्येक संकटारला तोंड देऊ. चीन आणि पाकिस्तान मिळून आमच्यावर हल्ला करतील, तरी आम्ही त्यांच्याशी टक्कर देऊ. काही वेळा माघार घ्यावी लागली, तरी आम्ही लढाई सोडणार नाही. लढाईची साधने काय पाकिस्तानजवळही भरपूर आहेत. पण वेळच पडली तर लढाई-शिवाय मी काय करू शकणार आहे ? मी लढत राहीन. येणाऱ्या प्रत्येक

संकटाशी मुकाबला करीन, सोडणार नाही.' "

## मुलांच्या मेळाव्यात

काही वर्षांपूर्वी 'भारतीय बाल विकास समिती'ने धाडशी मुलांना बक्षिसे देण्याचा उपक्रम सुरू केलेला आहे. ही मुले भारतीय प्रजासत्ताक दिनाच्या समारंभात म्हणजे २६ जानेवारी रोजी होणाऱ्या समारंभातही सामील होत.

ह्या समारंभाच्या वेळी श्रीमती इंदिरा गांधी ह्या प्रधानमंत्र्यांच्या म्हणजे आपल्या वडिलांच्या – पंडित जवाहरलाल नेहरू यांच्या – निवासस्थानी ह्या मुलांना चहा देत असत. दिल्लीमधील इतर मुलेही या वेळी हजर राहात. ह्या वेळी मुलांचे रेडिओ कार्यक्रमही होत.

समितीने असे ठरविलेले होते की मुलांच्या ह्या संमेलनाचा पंडित नेहरूंना काही त्रास होणार नाही अशी खबरदारी घेतली जावी. ह्या दूरदूरच्या आलेल्या मुलांना पंतप्रधानांचे निवासस्थान, राष्ट्रपती राहतात ते ठिकाण, संसदभुवन (कायदेमंडळाचे कामकाज चालते, ते ठिकाण) आणि दिल्लीतील इतर महत्त्वाची ठिकाणे दाखविण्याचे कार्यही ही समिती करीत असे.

परंतु जवाहरलाल नेहरूंना त्रास द्यावयाचा नाही असे समितीने ठरवून काय उपयोग? मुले जमली म्हणजे न बोलावताच नेहरू एकाएकी तेथे येऊन दाखल होत. कितीही महत्त्वाची कामे असली तरी ती बाजूला ठेवून ते ह्या मुलांत येऊन मिसळत आणि त्यांच्यामध्ये रमून जात. बक्षीस मिळालेला प्रत्येकजण त्या वेळी पंडितजींच्या जवळ जाई व आपणांला कशाबद्दल बक्षीस मिळाले ते सांगत असे. पंडितजी मोठ्या उत्सुकतेने त्या मुलाचे म्हणणे ऐकून घेत. तरुण मुलांच्याबद्दल पंडित नेहरूंच्या मनात मोठ्या आशा असत. ह्या तरुणांना ते मूर्तिमंत साहस समजत. अशाच मुलांच्या हातून पुढे काहीतरी भरीव काम होईल असे त्यांना वाटे; व त्यासाठी त्या मुलांना शाबासकी देऊन ते परामर्ष घेत.

पंडितजी म्हणत की, माणसाला आपल्या ठिकाणी असलेल्या अजस्र शक्तीला गतिमान करावयाचे असेल तर त्याच्या ठिकाणी साहस व मोठी महत्त्वाकांक्षा असली पाहिजे आणि त्याने नेहमी उत्साहाने व हसतमुखाने आपले कर्तव्य करीत राहिले पहिजे.

ह्या मेळाव्यातील मुले पंडित जवाहरलाल नेहरू यांची भेट घेऊन जेव्हा परत

जात, तेव्हा ते आपल्या ठायी एक प्रकारची ज्योत पेटवून घेऊनच निघत असत.

### त्रिवेणी संगमात उडी !

अलाहाबाद ऊर्फ प्रयाग येथील गोष्ट. कुंभमेळ्याच्या वेळचा प्रसंग. ह्या मेळ्याच्या वेळी प्रयागला फार मोठी यात्रा भरत असते; आणि गंगा, यमुना व सरस्वती ह्या नद्यांच्या संगमावर स्नान करून पवित्र होण्यासाठी लोकांची झुंबड उडत असते.

स्वातंत्र्य मिळण्यापूर्वी इंग्रजांच्या राजवटीतील घडामोड आहे. एका कुंभमेळ्याच्या यात्रेच्या वेळी एका युरोपियन अधिकाऱ्याने हुकूम काढला की यंदा संगमावर कोणीही स्नान करता कामा नये. आणि तिकडे जाण्याच्या मार्गांवर सरकारने लक्कडकोट उभारला—लाकडी कंपौंड घातले.

त्या वेळी पंडित मदनमोहन मालवीय होते. त्यांना व इतर हिंदू पुढाऱ्यांना हा सरकारी हुकूम अन्यायाचा वाटला. म्हणून सत्याग्रह करून हा सरकारी हुकूम मोडण्याचे त्यांनी ठरविले. पंडित मालवीय यांच्या नेतृत्वाखाली सत्याग्रहाची तयारीही चालू झाली.

पंडित जवाहरलाल त्या वेळी अलाहाबादला होते. त्यांना ही वार्ता कळली. ते स्वतः संगमाकडे चालत गेले, लाठीधारी पोलिसांचा पाहरा तेथे होता. अफाट जनसमुदायही हताश होऊन उभा होता. नेहरूंनी तेथे जाताच अंगावरचे कपडे काढून ठेवून व सरकारी हुकूम मोडून, पोलिसांचे कडे तोडून वेलाशक संगमामध्ये उडी घेतली.

लोकांना आश्चर्य वाटले व आनंदही झाला. 'इन्किलाब झिंदाबाद,' 'नेहरू झिंदाबाद' अशा त्यांनी आरोळ्या ठोकल्या. पंडितजींना धन्यवाद दिले व जमलेल्या लोकांनीही नदीत उड्या घेतल्या !

### दरारा

पुण्याच्या केसरी पत्राचे एक बातमीदार व अखिल भारतीय पत्रकार परिषदेचे एके काळचे अध्यक्ष श्री. मा. वि. साने यांनी पंडित जवाहरलाल नेहरू यांच्यासंबंधीच्या काही आठवणी दिल्या आहेत ...

कॉंग्रेससंघटनेतील अंतर्गत कलहात पंडितजी कधीच लक्ष घालीत नसत,

तिच्या बैठकीत अशा भांडणाचे पडसाद उमटू लागले, म्हणजे ते खिन्न मनाने बाजूला होत. त्रिपुरी काँग्रेस अधिवेशन हा त्या संस्थेच्या आयुष्यातील एक अवघड प्रसंग होता. गांधीजींची इच्छा नसताना सुभाषबाबू पुन्हा काँग्रेसचे अध्यक्ष झाले होते आणि गांधीजींना तो पराभव झोंबला होता. त्यामुळे ते काँग्रेसच्या अधिवेशनाला न येता राजकोटला गेले आणि तिथे त्यांनी एका स्थानिक प्रश्नावर उपोषण सुरू केले. त्यांच्या अनुयायांनी 'सुभाषबाबूंनी गांधीजींच्या सल्ल्यानुसार आपली कार्यकारिणी निवडावी' असा ठराव मांडला व तो संमतही करून घेतला. विषयनियामक समितीत या ठरावावर रण माजले आणि प्रतिस्पर्धी गटांनी एकमेकांचे अक्षरशः वाभाडे काढले. सुभाषबाबू तापाने फणफणले होते, तरी देखील त्यांनी अध्यक्ष म्हणून समितीचे काम चालवले. समितीमधील वाग्युद्ध तासन् तास चालू होते. परंतु पंडितजी मात्र व्यास-पीठाच्या एका कोपऱ्यात खिन्न वदनाने ही यादवी पाहत बसले होते. विषय-नियामक समितीच्या कामाचा ताण सुभाषबाबूंना मानवला नाही. त्यांचा आजार अधिकच वाढला आणि ते खुल्या अधिवेशनाला येऊ शकले नाहीत. अधि-वेशनासाठी लाखाहून अधिक जनसंमर्द जमला होता. त्यात सभोवतीच्या किसा-नांचीच गर्दी होती. सुभाषबाबूंचे अध्यक्षीय भाषण त्यांचे थोरले बंधू शरच्चंद्र बोस वाचणार होते. इतक्यात दीडशे दोनशे बंगाली प्रतिनिधींनी गिल्ला सुरू केला व अधिवेशनाचे कामकाज एकाएकी थांबले. त्यांना काय खुपत होते हेही इतरांना समजेना. बऱ्याच कांग्रेस नेत्यांनी त्यांना शांत करण्याचा प्रयत्न केला, पण व्यर्थ! अशा गोंधळात अर्धापाऊण तास गेला व अधिवेशन बंद पडणार असे वाटू लागले. इतक्यात विजेच्या वेगाने पंडितजी व्यासपीठावर आले आणि त्यांनी या अविवेकी प्रतिनिधींची कठोर शब्दांत हजेरी घेतली. श्रोतृसमाजाने त्यांना साद दिली आणि जवाहरलालजींच्या प्रचंड जयजयकारात या प्रतिनिधींची गडबड ऐकूच येईनाशी झाली. शेवटी त्यांची चूक त्यांनाही उमजली आणि अधिवेशनाचे कामकाज पुढे चालू झाले. इजिप्तमधील वफ्द पक्षाचे प्रतिनिधीमंडळ त्रिपुरीला आले होते. पंडितजींचा हा दरारा व लोकप्रियता पाहून हे पाहुणे थक्क झाले व त्यांनी बातमीदारांना आपली ही भावना बोलूनही दाखविली.

## माझी सद्सद्विवेक बुद्धि निर्मल आहे

श्री. मा. वि. साने यांनी सांगितलेली आणखी एक आठवण :—

दरबारी सत्कारसमारंभाच्या वेळीं पंडितजी ढंगदारपणाने वागत. अशा प्रसंगी त्यांच्या चालण्याबोलण्यात नाजूक लयबद्धता दिसून येई. परदेशी वकील किंवा मुत्सद्दी समोर आला की, मान किंचित् पुढे वाकवून हस्तांदोलनासाठी ते इतक्या ऐटीने हात पुढे करीत आणि लाडिकपणे 'हॅलो' म्हणत की, त्यामुळे दुसरी व्यक्ती आपोआपच मोहीत होत असे. चीनचे महामंत्री श्री. चौ एन् लाय हे सात जन्माचे नाटकी ! परंतु त्यांच्या सहवासात देखील पंडितजींनी आपल्या व्यक्तिमत्त्वाची चमक अनेकदा दाखविली. पंडितजी पीकिंगला पोचले त्याच दिवशी सायंकाळी चौ एन् लाय यांनी मोठी 'कॉकटेल पार्टी' दिली. शँपेनसारखी उंची मद्ये त्या वेळीं मुक्तहस्ताने पुरविली जात होती. पण पंडितजींच्या हातात मात्र सरबताचा मोठा पेला होता. या प्रसंगी चौंनी एका प्रमुख चिनी तत्त्वज्ञाशी नेहरूंचा परिचय करून दिला. 'मला तत्त्वचिंतकाविषयी आदर आहे. पण हल्ली जगाच्या वर्तनाला आधारभूत असं तत्त्वच उरलेलं नाही' पंडितजी हसत हसत म्हणाले.

हा परस्पर परिचयाचा विधी तासन् तास चालू होता. तो संपल्यावर चौ एन् लाय पंडितजींना थोडे बाजूला घेऊन गेले. मॅडम सन्यत् सेनही तेथे होत्या. कोचावर बसता बसता चौ एन् लायनी विचारले, 'तुम्हांला थकल्यासारखं वाटतं का ?' 'छे, मुळींच नाही' असे लगेच पंडितजींनी उत्तर दिले. 'माझी झोपेची तक्रार नाही. प्रवासात मी विमानातही झोप घेतो.' असेही पंडितजींनी चौंना सांगितले. आणि एक क्षणभरच थांबून मिस्किलपणाने ते म्हणाले, 'माझी सद्सद्विवेक बुद्धि निर्मल आहे, त्यामुळे मला अशी झोप येते. चौ सुद्धा सर्व मंडळी मनमुराद हसली !

## काश्मिरी लाल गाल

पंडित जवाहरलाल नेहरू यांचे एक जिवालग स्नेही आणि त्यांच्या मंत्रीमंडळातील एक सभासद श्री. महावीर त्यागी यांनी पंडितजींच्या अनेक आठवणी सांगितल्या आहेत. त्यांतील काही मजेदार गोष्टी —

श्री. त्यागी म्हणतात, " मी संरक्षण खात्यासंबंधित मंत्री असताना, आम्ही सर्व कॉंग्रेस पक्षाचे लोक जवहारलालजींच्या निवासस्थानी होळी खेळण्यासाठी गेलो. होळीचा सण प्रेमाचा, मैत्रीचा, गुलाल उधळण्याचा दिवस. त्या दिवशी कुठलीही चूक, कसलाही अशिष्टपणा माफ केला जातो. सर्वजण पंडितजींच्या चेहऱ्यावर हिरवा, पिवळा, लाल रंग माखत त्यांना मिठी मारून भेटत होते. पन्तजी तिथे उभे होते. जेव्हा माझा क्रम आला तेव्हा मी पंडितजींच्या गालावर गुलाल चोपडण्याऐवजी त्यांना मिठी मारत त्यांच्या गालाचे दीर्घ चुंबन घेतले. पंतप्रधानांच्या गालाचे चुंबन घेणे म्हणजे काही लहान सहान गोष्ट नव्हती. सर्व मित्र थक्क होऊन पाहात राहिले. त्यांची लहानपणची संवय आपला रंगलेला चेहरा रुमालाने पुसत ते रागाने म्हणाले, ' हा काय मूर्खपणा ? सगळं तोंड उष्टं करून टाकलं ? '

" मी उत्तर दिले, ' माफ करा. काश्मिरी गालांचा संबंध हिंदुस्थानात असाच उपयोग केला जातो. '

" आज होळी आहे, असे ओरडत सर्वजण हसू लागले. असे होते ते काश्मिरी लाल गाल. रागाने ते लाल पडत होते. पण प्रेमाने जवळ येणाऱ्याला, चुंबन घेणाऱ्याला आपल्याजवळ बसवून घेत होते. "

## पेनची चोरी !

श्री. महावीर त्यागी यांनी सांगितलेली आणखी एक गोष्ट —

" एकदा पंडितजींच्या खिशातून मी एक पेन चोरले होते. त्याच पेनने मी आता लिहीत असतो. अलीकडे ते फार थकलेले होते, म्हणून कॉंग्रेसपक्षाची बैठक त्यांच्याच घरी बोलावलेली होती. त्यांचा चेहरा पाहून सर्वजण सुन्न होऊन बसले होते. त्या वेळी वाटले, आम्हांला असे स्तब्ध, शांत बसलेले पाहून त्यांचे मन अधिकच खचेल.

" बस, मी तसाच उठलो आणि त्यांच्या जवळच्या खुर्चीवर जाऊन बसलो. ते समोरच गालिच्यावर बसून आपल्या मित्रांचे उतरलेले चेहरे पाहत होते. मी खाली वाकून हात लांबविला व त्यांच्या खिशाला लावलेले सुंदर बॉलपेन काढून घेऊन माझ्या खिशाला ऐटीत लावून दिले.

ते हसत म्हणाले, ' हे काय ? '

" मी उत्तर दिले, ' हल्ली खिसे कापण्याचा अभ्यास करतो आहे. '

" ते म्हणाले, ' तुम्ही या कलेत यशस्वी होणार नाही. खिसा असा कापला पाहिजे की कुणाला कळता उपयोगी नाही. तुम्ही तर दरोडेखोरी करायलाच योग्य आहात. '

" तरी मी म्हणालो, ' कॉंग्रेस पक्षाचा तर ठराव असा आहे की आपण आराम करू नये. जोपर्यंत आपल्या हातात पेन असेल तोपर्यंत आपण आराम करणार नाही. '

" ते म्हणाले, ' बरे बाबा, भांडू नका, घ्या ते पेन. '

" मी ते पेन हातात घेऊन म्हणालो, ' आपण भारताचे पंतप्रधान आहात आणि आपल्याजवळ हे चार आणेवाले पेन? आपल्याला शोभत नाही ते. ' ( ते पेन जर्मनीचे ' विल्सन रजिस्टर्ड ' हे होते. ).

" त्यावर ते म्हणाले, ' कॉंग्रेसचे सभासद हे चार आणेवाले सभासद समजले जातात ना ? "

## ग्रीक तत्त्वज्ञाची गोष्ट

एका विद्वान प्राध्यापकाच्या व्याख्यानाच्या वेळी पंडित जवाहरलाल नेहरू यांना अध्यक्षपद भूषवावे लागले. व्याख्यात्यांनी कॉंग्रेसच्या एकूण कार्यक्रमावर उलटसुलट विधाने करून चर्चा केली; आणि शेवटी कॉंग्रेसचे सर्वच धोरण व्यवहारशून्य असून एकंदर गुंतागुंतीचे प्रश्न पाहून आपण भांबावून गेलो आहोत, असे सांगितले. व राजकारणी मंडळींनी थोडा व्यवहार बघावा, भ्रमिष्टासारखे काल्पनिक स्वप्नात रममाण होऊ नये, असा सल्ला दिला.

यावर अध्यक्ष म्हणून पंडित नेहरू बोलावयास उभे राहिले ते हसतच. त्यांनी मिस्किलपणाने हसत हसतच आपल्या भाषणास सुरुवात केली. ते म्हणाले, " आजच्या विद्वान वक्त्याचे भाषण ऐकत असताना मला एका जुन्या गोष्टीची आठवण झाली. ही गोष्ट एका ग्रीक तत्त्वज्ञान्यासंबंधाची आहे. हा तत्त्वज्ञानी नेहमी म्हणे की, ' आपण कोणती गोष्ट करावी ते माणसाला कधीच खात्रीने सांगता येण्यासारखे नाही. '

" आपले हे तत्त्वज्ञान तो आपल्या शिष्यांना पटवून देण्याचा प्रयत्न नेहमी करीत असे. पुढे एकदा एक मजेदार प्रसंग घडला. तो तत्त्वज्ञानी

एकदा कुठेतरी निघाला असताना चुकून एका खड्ड्यात पडला. खड्डा बराच खोल होता. हे तत्त्वज्ञानी अशा प्रकारे संकटात सापडले असताना त्यांचा एक पट्टशिष्य त्या खड्ड्याच्या बाजूने जात होता. तो त्या तत्त्वज्ञान्याचा पट्टशिष्यच असल्याने आपल्या गुरूचे तत्वज्ञान तो चांगले आचरणात आणीत असे. त्यामुळे गुरुजींच्या सुटकेसाठी धावत जाण्याऐवजी तो विचार करीत राहिला—'गुरुजींना खड्ड्यातून बाहेर काढणे हे चांगले की वाईट ?'

"अशा प्रकारचा विचार करता करता कसलाच निर्णय न घेता तो पट्टशिष्य त्या आपल्या गुरुजींना वर न काढता तसाच निघून गेला !

"आजचे आपले व्याख्याते त्या पट्टशिष्याचे पट्टशिष्य म्हणून चांगले शोभतील !"

## हजरजबाबी नेहरू

अखिल भारतीय कॉंग्रेस समितीच्या अधिवेशनातील एका प्रसंगी प्रांतिक विधिमंडळातील एका सभासदाने मोठ्या आढ्यतेने पंडित जवाहरलाल नेहरूंना म्हटले,

"पंडितजी, सभेचे एकंदर कामकाज प्रांतिक विधिमंडळाच्या पद्धतीप्रमाणे चाललेले नाही बरे का ?"

यावर नेहरू तात्काळ म्हणाले,

"का हो, आम्हांला प्रांतिक विधिमंडळाच्या पातळीवर ओढण्याचा तुमचा हा आग्रह का ?"

* * *

असेच एका वेळीं एका गृहस्थाशी पंडितजींचे बोलणे चालू असता पंडितजींना निरुत्तर करण्यासाठी तो गृहस्थ म्हणाला,

"पण साहेब, प्रत्येक प्रश्नाला दोन बाजू असतात ना ?"

लगेच पंडितजींनी उत्तर दिले,

"ते अगदी खरे हो, पण प्रत्येक वेळीं तुम्ही त्यांपैकी चुकीचीच बाजू घ्यावी, हे योग्य आहे काय ?"

## कुडत्याच्या झोळीतील भिक्षा

श्री. महावीर त्यागी यांनीच सांगितलेली आणखी एक आठवण मोठी मजेदार आहे. त्यागी म्हणतात,

" खिलाफतीच्या चळवळीच्या काळातील एक प्रसंग माझ्या चांगला आठवणीत राहिलेला आहे. त्या वेळी एकदा जवाहरलाल बिजनौरला आलेले होते. त्या काळात मी जिल्हा कॉंग्रेस कमिटीचा सभासद होतो. काही मंडळी बरोबर घेऊन कॉंग्रेसचे सभासद वाढविण्यासाठी व 'टिळक स्वराज्य फंड' जमा करण्यासाठी जवाहरलाल फिरत होते. बाजारपेठेतून ते चालले होते. अशा वेळी एका दुकानासमोर आल्याबरोबर त्यांनी आपल्या अंगावरील कुडत्याची झोळी पसरली व टिळक स्वराज्य फंडासाठी भिक्षा मागण्यास प्रारंभ केला ! लोकांनी भराभर रुपये आणि पैसे त्यांचे झोळीत टाकून त्यांचे पाया पडण्यास सुरुवात केली. 'मोतीलाल नेहरूंचा मुलगा आपल्या दुकानावर येऊन भीक मागतो आहे' हे दृश्यच लोकांना मोह पाडणारे झाले. लोक वेडे होऊन गेले आणि त्यांनी वाटेल तेवढे पैसे दिले.

" ह्याचप्रमाणे रायबरेली व प्रतापगड जिल्ह्यामधून जवाहरलाल धोतर नेसून व पायांत चपला घालून गावोगाव शेतकऱ्यांच्यामध्ये जागृती करण्यासाठी पायी फिरत होते, त्या दिवसांची आठवण झाली म्हणजे अंतःकरणाला धक्का बसल्याशिवाय राहत नाही. परमेश्वर तसली देशभक्ती व तसला सेवाभाव पुन्हा जागृत करो. "

## सही इंग्रजीत व तारीख उर्दूत

होळीचे दिवस होते. पंडित जवाहरलाल नेहरू होळीच्या दिवशी मुलांबरोबर खेळत असत. एकमेकांना गुलाल लावीत व मजा करीत. एकदा बागेत मुले जमली व आवडत्या 'चाचा'ची वाट पाहत बसली. ज्याच्या त्याच्या हातात गुलालाची पुडी होती. इतक्यात पंडितजींचा शरीररक्षक बाहेर आला व मुलांना म्हणाला, 'नीट उभे रहा, पंडितजी आता दोन चार मिनिटातच येतील.'

दोन मिनिटांच्या आतच पंडितजी गुलालाची एक मोठी पुडी घेऊन आले. त्यांना पाहताच मुलांमध्ये धांदल उडाली व ती जोराने त्यांच्याकडे जाऊ लागली.

आता मुलांच्या गर्दीत पंडितजी सापडणार या विचाराने पोलीस बेचैन झाले. ते झटपट पुढे गेले व त्यांनी सर्व मुलांना एका रांगेत उभे केले. एक मुलगी पंडित नेहरूंच्या कपाळावर गुलाल लावू लागली. तोच एक मुलगी मध्येच येऊन म्हणाली, "चाचाजी, या ऑटोग्राफ बुकात तुमची सिग्नेचर ( सही ) करा ना." पंडितजींने आपले पेन काढले व आपली 'सिग्नेचर' केली. मुलीने ती सही पाहिली व ती हसून म्हणाली, "तारीख घालायला विसरलात की!" पंडित नेहरू थोडे हसले व त्यांनी तारीख घातली. मुलीने ती पाहिली व ती म्हणाली,

"हे काय? सही इंग्रजीत केलीत व तारीख मात्र उर्दूत घातलीत. असे का?"

पंडितजींनी तिच्या गालावर हळूच एक टिचकी मारली व ते म्हणाले, "तू माझी सिग्नेचर मागितलीस. तो शब्द इंग्रजीत आहे म्हणून मी सही इंग्रजीत केली व तारीख शब्द उर्दू आहे म्हणून ती उर्दूत घातली!"

तेव्हा ती मुलगी व इतर लोक आणि पंडितजीही सर्वच मनापासून हसले.

**मानवतावादी नेहरू**

'धर्मातीत लोकशाही' हे शब्द सर्वत्र लोक वापरीत असतात. परंतु ही धर्मातीत लोकशाही पंडित जवाहरलाल नेहरू यांनी प्रत्यक्ष कृतीत उतरविली होती.

पंडित नेहरू पंतप्रधान असताना एकदा ते दिल्लीच्या रस्त्यावरून जात होते. जाता जाता त्यांना एक विलक्षण दृश्य दिसले. कोणी एक अत्याचारी माणूस दुसऱ्या एका निरपराधी माणसाला तरवारीने मारीत असलेला त्यांना दिसला. त्यांच्याबरोबर पोलीस होते. सुरक्षिततेसाठी असलेले दलही होते. मनात आणले असते तर ह्या लोकांना सांगून त्या अत्याचारी माणसाचा बंदोबस्त त्यांना करता आला असता. परंतु त्यांनी तसे केले नाही. ते सच्चे मानवतावादी होते. त्यांना राहवले नाही. त्यांनी स्वतः मोटारीतून खाली उडी मारली व वेगाने पळत जाऊन त्या अत्याचारी माणसाचा तो तरवारीचा हात पकडून ठेवला.

केवढे हे धाडस होते. एक प्रकारचे ते बलिदानच होते. त्या अत्याचारी माणसाने हात सोडवून घेऊन त्यांच्यावरच प्रहार केला असता तर?...

अंतःकरणात असलेल्या मानवतेच्या भावनेने प्रेरित होऊन त्यांनी हे धाडसाचे कृत्य केले होते !

## निरागस आणि खेळकर वृत्ती

पंडित जवाहरलाल नेहरू लहान मुलासारखेच निरागस आणि खेळकर वृत्तीचे होते. लहान मुलांच्या स्वभावातली सारी लक्षणे अगदी सत्तरी उलटून गेली तरी परवा परवापर्यंत नेहरूंच्या ठिकाणी शाबूत होती. लहान मुलासारखेच ते खोडकर व चेष्टेखोर होते.

काँग्रेसच्या बैठकीत व्यासपीठावर एक पुढारी झोपला असता, त्याच्या अंगावर लोड फेकून त्याला त्यांनी जागे केले, ही गोष्ट प्रसिद्धच आहे.

एकदा नेहरू भाषण करीत असताना त्यांच्या शेजारी बसलेल्या गुजराथच्या मुख्य मंत्र्यांना–जीवराज मेहतांना–प्रश्न विचारण्यासाठी म्हणून त्यांच्याकडे ते वळले, तेव्हा जीवराज झोपी गेलेले त्यांना आढळले. त्या वेळी नेहरू हसून म्हणाले, ' दमले आहेत बिचारे. झोपू द्या त्यांना !' त्यावर सभेत खूपच हशा पिकला व त्या आवाजाने जीवराजभाई खडबडून जागे झाले !

लहान मुलासरखेच ते संतापी आणि तापट होते. एखाद्या सभेत गर्दी फार झाली आणि खूप गोंधळ माजला, म्हणजे व्यासपीठावरून ताडकन उडी मारून नेहरू गर्दीत घुसत आणि गडबड करणाऱ्या लोकांना चापट्या व थपडा लगावून बाजूला सारीत. अशा वेळी त्यांच्या शरीररक्षक पोलिसांना त्यांना मिठी मारून उचलावे लागे व परत व्यासपीठावर आणून सोडावे लागे. तथापि त्यांचा हा राग लहान मुलाप्रमाणेच फार काळ टिकत नसे.

## धर्म आणि ज्योतिष

एकदा जैन लोकांनी दिल्लीला आपले एक संमेलन भरविले होते. त्यांचे लक्ष पंडितजीकडे गेले. त्यांना वाटले की, पंडितजींनी येऊन आपल्या संमेलनाचे उद्‌घाटन करावे. हे संमेलन धार्मिक होते. पंडितजींचा विशिष्ट एका धर्मावरच काय पण ईश्वरावरही विश्वास नव्हता ! त्यामुळे कोणत्याही एका विशिष्ट धर्माच्या कार्यक्रमात ते भाग घेत नसत. ह्या जैन मंडळींचे एक शिष्टमंडळ पंडितजींच्याकडे गेले. तेव्हा पंडिजींनी ह्या शिष्टमंडळास साफ नकार दिला; आणि ते म्हणाले,

" मी राजकारणी माणूस आहे. ज्या वेळी राजकारणाचा पोषाख चढवून धर्म माझ्याजवळ येईल, त्याच वेळी मी त्याचे स्वागत करीन."

* * *

दोन वर्षांपूर्वी जेव्हा 'अष्टग्रही' चालू होती, तेव्हा जगातील पुष्कळ लोक घाबरून गेले होते. गावोगाव अरिष्टनिवारणार्थ यज्ञयाग, होमहवन, देव-देवतांच्या पूजाअर्चा चालू होत्या. एका मोठ्या पुढाऱ्याने पंडित जवाहरलाल नेहरू यांना ह्या वेळी विमानाचा प्रवास करू नका म्हणून सल्ला दिला होता. पण पंडितजींचा ज्योतिषावर मुळीच विश्वास नसल्याने ते अगदी निर्भयपणे वागत होते. त्या वेळी ते म्हणाले, " आकाशातील ताऱ्यांचा किंवा ग्रहांचा आपण विचार करावा हे खरोखरच भित्रेपणाचे लक्षण आहे. समजा काही अरिष्ट आलेच, तर घाबरून जाऊन ते कसे दूर होणार? त्यापेक्षा धैर्याने त्याला तोंड देणे हाच शहाणपणा होईल."

## हे सारे विसरून जा

पूरग्रस्त पंजाबचा दौरा आटोपून एकदा पंडित जवाहरलाल नेहरू हे विमानाने राजधानीला–दिल्लीला परत येत होते. दिल्लीच्या पालम विमानतळावर विमान आल्यावर बराच काळपर्यंत वैमानिक नुसत्या चकरा मारीत होता. विमान खाली उतरीत नव्हता. पंडितजींच्या ते लक्षात आले.

पंडितजींनी वैमानिकाला असे करण्याचे कारण विचारले. तेव्हा तो म्हणाला, " खालून विमानतळावरून सूचना मिळाली आहे की, आपली गाडी अजून आलेली नाही, तेव्हा इतक्यात विमान खाली आणू नये."

हे ऐकून पंडितजी फार संतापले. रागाने त्यांचा चेहरा लालबुंद झाला आणि ओठ थरथर कापायला लागले. ते वैमानिकाला म्हणाले, " तुम्हांला काय वाटते मला पायाने चालता येत नाही? ताबडतोब विमान खाली उतर. मी चालत घरी जाईन."

वैमानिक बिचारा काय करणार? त्याने विमान खाली उतरले. विमानतळा-पासून पंडितजींचे निवासस्थान दहा मैल दूर होते. पंडितजी विमानातून उतरले तरी त्यांची गाडी आलेली नव्हती. म्हणून त्यांनी आपली आवडती काठी

हातात घेतली व ते पायी चालत निघाले. ह्या प्रकाराने विमानतळावर गडबड उडून गेली. अधिकारी लोक सगळे घाबरून गेले. दुसऱ्या गाडीतून जाण्याची त्यांनी पंडितजींना विनंती केली. पण पंडितजींनी ते ऐकले नाही.

पंडितजी चालायला लागल्यानंतर फर्लांग अर्धा फर्लांग गेले असतील नसतील तोच त्यांची गाडी समोरून आली. त्यांच्या खासगी चिटणिसाने उतरून त्यांना सलामी दिली. ड्रायव्हरने गाडीवर राष्ट्रीय निशाण चढविले. पंडितजी गाडीत बसले आणि त्यांनी ड्रायव्हरला गाडी सरळ विमानदल प्रमुख एअर मार्शल मुकर्जी यांचे बंगल्यावर नेण्यास सांगितले.

गाडी एअर मार्शल मुकर्जी यांचे बंगल्यावर गेली आणि थांबली. तेव्हा मुकर्जी वर्तमानपत्रे पाहात पडलेले होते. आणि त्यांच्या पत्नी शारदा मुकर्जी ह्या लेकरीचा बनियन विणत बसलेल्या होत्या. पंतप्रधान एकाएकी त्यांच्या बंगल्यात शिरलेले बघताच त्यांची धांदल उडून गेली. मुकर्जी साहेबांनी दरवाजावर जाऊन पंडितजींचे स्वागत केले, पण ते घाबरलेलेच होते ! पंडितजींनी त्यांच्या स्वागताचा स्वीकार केला, पण ते लगेच चढ्या आवाजात म्हणाले, " तुमचे वैमानिक योग्य रीतीने आपले कर्तव्य पाळीत नाहीत. आजचीच गोष्ट घ्या. माझी गाडी वेळेवर विमानतळावर आली नाही म्हणून मला हवेतच गिरक्या घेत राहायला लावले ! जणू काय मला चालता येतच नाही. " आणि नंतर त्यांनी घडलेली सारी हकीकत सांगितली.

" मी जरूर चौकशी करतो " मुकर्जी म्हणाले.

यानंतर बराच वेळ त्यांचे बोलणे चाललेले होते. शेवटी पंडितजी जेव्हा जायला निघाले तेव्हा त्यांनी मुकर्जींना सांगितले, " हे सारे विसरून जा. जणू काही घडलेच नाही समजा ! "

## शेवटचे आलिंगन

पं. जवाहरलाल आणि महाराष्ट्र राज्याचे माजी राज्यपाल श्री. श्रीप्रकाश यांची मैत्री फार जुनी होती. दोघे विद्यार्थी असल्यापासूनची त्यांची मैत्री. कोठेही समारंभात, अधिवेशनात, मोठ्या सभेत, घरात, गाठ पडली की दोघे एकमेकांना आलिंगन देऊन भेटत, हसत, विनोद करत ... जणू मित्र मित्र वयानं लहान होत. जगात आपण हास्यविनोद चेष्टा केलेली कशी दिसेल, आपण

येवढे मोठे हा विचार त्यांना कधीच शिवला नाही. जगालाही दोघांच्या या मैत्रीचे कौतुक वाटायचे.

पंडित नेहरू मे १९६४ मध्ये विश्रांतीसाठी डेहराडूनला गेले होते. मुक्काम मोठा नव्हता. दोन तीन दिवसांसाठीच तर ही डेहराडूनची भेट होती. डॉक्टरांनी संपूर्ण विसावा घ्या, दगदग करू नका असे निक्षून सांगितले होते. इंदिरा गांधीही त्यांना भरपूर विसावा मिळेल अशा तऱ्हेनेच डेहराडूनचे कार्यक्रम आखत होत्या... २९ मे रोजी डेहराडूनपासूनच काही मैलांवर राहत असलेल्या श्रीप्रकाशांची पंडित नेहरूंशी भेट ठरली होती. टेलिफोनवरून इंदिरा गांधींनी श्रीप्रकाशांना सांगितले, " आपणच इकडे भेटायला याल तर बरं ... डॉक्टरांनी संपूर्ण विश्रांतीचा सल्ला दिला आहे. " त्याप्रमाणे श्रीप्रकाश नेहरूंच्या निवासस्थानी गेले. मित्र मित्र भेटले. नेहरूंना वाकलेल्या स्थितीत पाहून श्रीप्रकाशांच्या डोळ्यांत अश्रू उभे राहिले. नेहरूंना थकलेले पाहून वाईट वाटल्याचे श्रीप्रकाश बोललेही ... पण मग बोलण्याच्या ओघात दुसरे विषय निघाले. तासभर गप्पा रंगल्या. श्रीप्रकाश परत निघाले आणि सर्वांना आश्चर्य वाटण्याजोगी गोष्ट म्हणजे नेहरूही त्यांच्या बरोबर निघाले. सर्वांचा विरोध मोडून श्रीप्रकाशांनी नवा बंगला बांधला होता तिथे नेहरू गेले रस्त्यातही गप्पा चालूच होत्या ..राज्यकारभाराविषयी...मित्र मित्र बंगल्यात आले. ' तुम्हांला त्रास होईल ' असे श्रीप्रकाश म्हणत असतानाही नेहरूंनी हिंडून बंगला पाहिला. बांधकाम थोडे उरले होते, त्यात काही दुरुस्त्या सुचवल्या. आणि पुनः दोघांनी एकत्र बसून वेगवेगळ्या विषयांवर साधारणपणे तासभर चर्चा केली. गप्पा मारल्या...नेहरूंचा हा सारा वेळ मोठ्या आनंदात गेला. नेहरू परत जायला निघाले. श्रीप्रकाश दारापर्यंत पोचवायला गेले. नेहमीप्रमाणे निरोप घेतानाही दोघांनी एकमेकांना आलिंगन दिले. या वेळी श्रीप्रकाशना एक गोष्ट फार जाणवली. नेहरूंनी श्रीप्रकाशांना मारलेली मिठी नेहमीपेक्षा कितीतरी घट्ट होती; आणि बराच वेळ नेहरूंनी त्यांना सोडले नाही !···हा प्रकार नेहमीपेक्षा वेगळा असल्यामुळे श्रीप्रकाश बावरले. त्यांना विचित्र वाटले सारे...नेहरूंची मोटार निघून गेली. श्रीप्रकाश बंगल्यात परतले आणि त्यानंतर तिसऱ्याच दिवशी दुपारी श्रीप्रकाशांना टेलिफोनवरून नेहरूंच्या निधनाची वार्ता कळली ... श्रीप्रकाशांना नेहरूंनी दिलेल्या त्या शेवटच्या

आलिंगनाचा अर्थ आता कळला !

## इतिहासाचे ओझरते दर्शन

पंडित जवाहरलाल नेहरू यांनी तुरुंगातून आपल्या कन्येला उद्देशून लिहिलेल्या पत्रांचे एक मोठे पुस्तक 'जागतिक इतिहासाचे ओझर तेदर्शन' या नावाने प्रसिद्ध झालेले आहे. ह्या अनेक पत्रांपैकी शेवटच्या पत्रातील काही भाग खाली दिलेला आहे.

" इंग्लंडमधील बेंजामिन डिझरायली या एकोणिसाव्या शतकातील मुत्सद्द्याने लिहिले आहे की, ' हद्दपार झालेली किंवा कैदेत सापडलेली इतर माणसे जग-लीच तर निराशेने करपून जातात, परंतु साहित्यिक मनुष्याला हा काळ आपल्या आयुष्यातील अत्यंत सुखावह असा वाटतो. ' त्याने हे विधान ह्यूगो ग्रोटियस यांच्याविषयी केलेले आहे. हा सतराव्या शतकातील एक विख्यात डच कायदे पंडित आणि तत्त्वज्ञानी होऊन गेला. त्याला जन्मठेपेची शिक्षा झालेली होती; परंतु दोन वर्षांत तो तुरुंगातून पळून गेला. तुरुंगातील ही दोन वर्षे त्याने तत्त्वज्ञानाच्या अभ्यासात व लेखन व्यवसायात घालविली. जगात असे विख्यात तुरुंगबहाद्दर पुष्कळ होऊन गेलेले आहेत. त्यांपैकी दोघांची नावे तर जगात बहुतेक प्रत्येकाला माहीत असतात. एक डॉन क्विक्झोटचा कर्ता सर व्हॅन्टीस हा स्पॅनिश गृहस्थ; आणि दुसरा पिलग्रिम्स प्रोग्रेसचा कर्ता जॉन बन्यन हा इंग्रज गृहस्थ.

'मी काही साहित्यिक मनुष्य नाही हं ! आणि मी जी काही थोडी बहूत वर्षे तुरुंगामध्ये काढली आहेत, ती मला तरी काही माझ्या आयुष्यातील अत्यंत सुखावह वाटलेली नाहीत. पण हे खरे की, लेखन आणि वाचन यांच्यामुळे मी माझी तुरुंगाची मुदत मोठ्या मजेने पसार केली आहे.

" पुष्कळ मागच्या काळी होऊन गेलेल्या व्यक्तीचे खरे स्वरूप जर समजून घ्यावयाचे असेल, तर त्याच्या भोवतालचे वातावरण व तो ज्या परिस्थितीत राहत होता ती परिस्थिती कशा प्रकारची होती, त्याच्या मनात कोणते विचार भरून गेलेले होते. या गोष्टी तुला समजून घ्याव्या लागतील. जुन्या काळातला माणूस घेऊन त्याला जर आपण आपल्या आजच्या वातावरणाच्या किंवा परिस्थितीच्या दृष्टीने आणि आमच्या विचारपरंपरेच्या दृष्टीने बरा किंवा वाईट

ठरवू लागलो, तर ते आपले करणे अगदीच वेडगळपणाचे होईल. ...

" भूतकाळाने आपल्यावर पुष्कळच उपकार केलेले आहेत. संस्कृती, साधनसंपत्ती, भौतिक शास्त्राची वाढ आणि सत्याच्या काही काही बाजूचे ज्ञान हे सगळे आज आपल्याला प्राप्त झालेले आहे, ती जवळच्या किंवा दूरच्या भूतकाळाकडून आपल्याला मिळालेली देणगीच आहे. परंतु केवळ भूतकाळावर दृष्टी ठेवून आपले कर्तव्य किंवा आपली जबाबदारी काही संपत नाही. भविष्य-काळाच्या बाबतीतही आपले काही कर्तव्य आहे. आणि भूतकाळासंबंधाच्या आपल्या कर्तव्यापेक्षा हे आपले भविष्य कळविषयक कर्तव्यच कितीतरी जास्त श्रेष्ठ आहे असे म्हटले पाहिजे. कारण भूतकाळ काय होऊन गेला, संपला. त्याच्यामध्ये आपल्याला आता काही कसलाही बदल करता येणार नाही. पण भविष्यकाळ हा अजून यावयाचा आहे, आणि म्हणून त्याला थोडाबहूत आपल्या हवा तसा आकार देण्याचा प्रयत्न करता येईल. ..

" इतिहासामधून आपल्याला पुष्कळच गोष्टी शिकावयाला सापडतात असे म्हटले जाते. त्याचप्रमाणे इतिहासाची पुनरावृत्ती केव्हाही होत नाही अशीही एक म्हण आहे.... इतिहासामधून आपल्याला आपल्यापुढे उपस्थित झालेल्या प्रश्नाबद्दल अगदी नेमके उत्तर सापडेल असे मात्र मुळीच नाही. म्हणूनच कार्ल मार्क्सने म्हटले आहे की, ' तुमच्या पुढे नवीन प्रश्न उभे करावयाचे एवढाच एक तुमच्या मूळच्या प्रश्नांना उत्तर देण्याचा मार्ग इतिहासाजवळ आहे, दुसरा नाही. '...

" तोच विचार समर्थनीय किंवा योग्य म्हणता येईल की, ज्याच्यापासून काहीतरी कार्य निर्माण होते. आपले मित्र रोमारोला हे म्हणतात, ' विचाराचा शेवट कार्यामध्ये होत असतो. ज्या विचाराचा प्रवाह कार्यापर्यंत जात नाही, तो विचार म्हणजे गर्भपातासारखा किंवा विश्वासघातासारखा होय. तेव्हा आम्ही विचाराचे बंदे आहो असे जर आपल्याला म्हणवून घ्यावयाचे असेल, तर मग आपल्याला कार्याचेही बंदे झाले पाहिजे ! '

" लोक कार्यात पडण्याचे का टाळतात तर त्यांना त्यांच्या होणाऱ्या परिणामाची भीती वाटत असते. कारण कार्य म्हटले की, त्यात धोका आणि संकट आलेच. संकट हे दुरून तर फारच भयंकर वाटते, पण जवळ जाऊन त्याच्याकडे निरखून पाहू लागलो, तर त्याचे काही एवढेसे आपल्याला वाटत नाही.

एवढेच नव्हे तर कित्येक प्रसंगी संकटासारखा गोड सोबती नाही. त्याच्यामुळे जीवनात आनंद वाटतो, त्याचा आस्वाद अधिक रुचकर होतो आणि जगण्यात विशेष मौज व उत्कटता वाटते. साधे सरळ जीवन हे पुष्कळदा अगदीच कंटाळवाणे वाटते. आपण ज्या गोष्टीचा उपभोग घेत असतो, त्यात नवीनपणा किंवा सरसता अशी आपल्याला काहीच वाटत नाही; आणि त्यामुळे त्यापासून आपल्याला आनंदही होत नाही."

## समाजवाद व भारतीय नियोजन

भारतीय नियोजन मंडळाचे पूर्वीचे सभासद श्री. श्रीमन् नारायण यांनी लिहिलेल्या 'सोशॅलिझम् इन इंडियन प्लॅनिंग' ह्या पुस्तकाला दिनांक २५ मे १९६४ रोजी पंडित जवाहरलाल नेहरूंनी डेहराडून येथे प्रस्तावना लिहिली आहे. अशा प्रकारचे त्यांचे हे लिखाण शेवटचेच होय. ह्या प्रस्तावनेत त्यांनी म्हटले आहे :—

देशाच्या आजवरच्या प्रगतीने भावी प्रगतीचा पाया घातला आहे व तोही लोकशाहीच्या भूमिकेवर. भावी प्रगती पूर्वीपेक्षा अधिक जलद गतीने होईल.

प्रगतीचे चित्र आपण समग्रपणे पाहिले पाहिजे; आणि ते पाहताना लोकशाही समाजवादाचे ध्येयही आपण आपल्या दृष्टीपुढे ठेविले पाहिजे.

समाजवाद, भारतीय नियोजन आणि भारताचा विकास याबाबत आस्था बाळगणाऱ्या सर्वांना मी ह्या छोट्या पुस्तकाची शिफारस करतो. मी काही हे सर्व पुस्तक वाचलेले नाही. तरीदेखील हे पुस्तक उपयुक्त आहे व आपल्या समस्यांचा व्यापकपणे विचार करण्यास सदर पुस्तक लोकांना मदत करील असे मला वाटते.

समाजवाद हा एक संदिग्ध शब्द बनला आहे व त्याला अनेक अर्थ चिकटले आहेत. महान तांत्रिक प्रगती होत असलेल्या चैतन्यपूर्ण आधुनिक जगात समाजवादाच्या कल्पनेतही बद्दल होत आहे ही गोष्ट स्पष्ट आहे. तरीदेखील त्यातील मूलभूत तत्त्वे कायमच आहेत.

आधुनिक तांत्रिक प्रगतीचा उपयोग करून शेतीच्या व औद्योगिक क्षेत्रांत आपण उत्पादन वाढविणे महत्त्वाचे आहे. परंतु ही गोष्ट करताना व्यक्तीची गुणवत्ता व धर्माची कल्पना हे आपले उद्दिष्ट असले पाहिजे, ही गोष्ट आपण

विसरता कामा नये.

आपण आपल्या तिसऱ्या पंचवार्षिक योजनेच्या मध्यास आहोत व आपले नियोजन मंडळ चौथ्या योजनेचा विचारही करू लागले आहे. पाचव्य योजनेच्या अखेरीस आपण अनेक दृष्टींनी स्वयंपूर्ण होऊ व आपली प्रगती बाहेरच्या मदतीवर फारशी अवलंबून राहणार नाही अशी आशा वाटते. जुन्या चाकोरीतून आपण कितपत बाहेर पडतो व उत्पादनाच्या आधुनिक पद्धतीचा स्वीकार कितपत करतो, यावर ही प्रगती अवलंबून आहे.

स्वातंत्र्यप्राप्तीनंतर आपली प्रगती फार मंदगतीने झाली आहे असे काही लोकांना वाटते. पण हे बरोबर आहे असे मला वाटत नाही.

या पुस्तकाचे काही वाचक पुस्तकातील सर्वच विधानांशी कदाचित सहमत होणार नाहीत. पण त्यात विशेष काही नाही. आपण समग्रपणे प्रगतीचे हे चित्र लोकशाही समाजवादाचे ध्येय डोळ्यांपुढे ठेवून पाहिले पाहिजे.

## चांगल्या गोष्टींचा विसर पडू देऊ नये.

मुले वरवर पाहता अनेक दृष्टींनी वेगवेगळी वाटतात. त्यांच्या भाषा, त्यांचे पोषाख निरनिराळेअसतात; आणि तरीही त्यांच्यांत एक प्रकारचे साम्य असते ती एकत्र आली तर खेळतील अथवा भांडतीलही पण त्यांचे भांडण हासुद्धा एक खेळच असतो. एकमेकांच्या वेगळेपणाची त्यांना जाणीव नसते. जात, धर्म, दर्जा यांचा विचारही त्यांच्या मनाला शिवत नाही.

ह्या दृष्टीने पाहिले असता ती त्यांच्या आईवडिलांपेक्षा समंजस ठरतात. मुले जसजशी वाढत जातात, तसतसे त्यांचे नैसर्गिक गुण नाहीसे होतात; आणि मोठ्या माणसांच्या शिकवणुकीचा व वर्तणुकीचा त्यांच्यावर परिणाम होत जातो. माणुसकी, दयाबुद्धी यांचा त्यांना विसर पडतो आणि आपले जीवन संपन्न करण्याचेही ती विसरून जातात.

मुलांनी नव्या गोष्टी जरूर शिकाव्या पण या चांगल्या गोष्टींचा विसर पडू देऊ नये.

## काम जास्तीत जास्त करावे

आपल्यावर युद्धाचे प्रत्यक्ष आणि अप्रत्यक्ष, प्रचंड ओझे पडणार आहे.

हेच वेगळ्या शब्दांत मी सांगेन की, आपल्यावर योजनेचे ओझे पडणार आहे. अर्थात कोणताही देश किती ओझे सहन करू शकेल, याला मर्यादा आहे. परंतु ही मर्यादा काय आहे, हे अखेरीस आणीबाणीच्या परिस्थितीवर अवलंबून असते. युद्धाच्या काळात उत्पन्न वाढावायचे किंवा जास्त पैसा खर्च करावयाचा, या गोष्टीचा कोणताही देश जितका विचार करतो, तितका काही तो एरव्ही शांततेच्या काळात करीत नाही. परंतु जेव्हा युद्ध उद्भवते, तेव्ह या मर्यादा लवचिक स्वरूपाच्या होतात आणि त्या तशा झाल्याही पाहिजेत. कारण, तो राष्ट्राच्या जीवनमरणाचा प्रश्न असतो. म्हणूनच जास्तीत जास्त काम करणे हा आपला दृष्टिकोण असला पाहिजे.

## कसोटीची वेळ आली आहे.

आज आपल्यापैकी प्रत्येकाच्या कसोटीची वेळ आली आहे. देश मजबूत करण्यासाठी प्रत्येकाला मेहनत करावी लागेल आणि उत्पादन वाढवावे लागेल. शेते, कारखाने, गिरण्या या सर्वांचे उत्पादन वाढवायचा आपल्याला नेटाने प्रयत्न करावा लागेल. आपण आपल्या निश्चयावर अढळ असले पाहिजे. देशाची इंचन् इंच भूमी लढविण्यासाठी आपली अंतःकरणे खंबीर केली पाहिजेत. आपल्या प्रतिष्ठेवरील घाला कोणतेही राष्ट्र सहन करणार नाही. आपले राष्ट्र स्वतंत्र आहे. आणि त्याचे रक्षण करण्याचा आपला दृढ निर्धार आहे. आपण सुखासीन झालो होतो. कदाचित ही वृत्ती झटकून टाकण्यासाठीच आपल्याला आव्हान मिळाले असेल.

## इतिहास म्हणजे काय ?

काही व्यक्तींच्या कृत्यांची नोंद म्हणजे खरा इतिहास नव्हे. जे मानवी समाज राष्ट्र तयार करतात, जीवनातल्या सुखसोई निर्माण करतात व सहस्र मार्गांनी ज्यांची एकमेकावर क्रिया प्रतिक्रिया होते, त्यांचा विचार इतिहासाने केला पाहिजे. निसर्ग आणि त्याच्या शक्ती यांच्याविरुद्ध, जंगले व जंगली श्वापदे यांना तोंड देऊन आणि स्वतःच्यापैकी जे कोणी आपणांस पददलित करीत आहेत, स्वार्थासाठी पिळीत आहेत, त्यांच्याविरुद्ध जाऊन माणसांनी जो झगडा केला, त्याची कथा म्हणजेच इतिहास होय. इतिहास म्हणजे

माणसाने जीवनासाठी केलेली झुंज होय... माणसाचा विकास व प्रगती याविषयीची अपरंपार शक्यता इतिहासावरून आपल्याल कळून येते.

## मार्क्स वाद

मार्क्सवाद म्हणजे काय? मानवी जीवन व आकांक्षा, इतिहास, राजकारण आणि अर्थशास्त्र या सर्वांचा सुसंगत अर्थ लावण्याचे ते एक शास्त्र आहे. ती एक सिद्धांतपद्धती आहे. पण त्याबरोर तीमध्ये कार्यास आवाहनही आहे. भूत, वर्तमान, भविष्य यांना जवळ जवळ दैववादाच्या सारख्या काही तार्किक शिस्तीत बसविण्याचा हा एक प्रयत्न आहे. पण जीवन हे इतके तार्किक आणि कडक नियमांनी बद्ध आहे हे, सयुक्तिक वाटत नाही. म्हणूनच या शास्त्राबद्दल पुष्कळांना शंका आहे.

मार्क्सवादाचा सर्वात मोठा अनुयायी लेनिन होता. त्याने हे तत्त्वज्ञान नुसते सांगितले नाही तर ते आचरणात आणले होते. असे असून त्याने इषारा दिला आहे की, मार्क्सवादाला ठोकळेबाज सिद्धांताचे स्वरूप देऊ नका.... तो म्हणतो, मार्क्सवाद संपूर्ण अथवा अजिंक्य आहे असे आपण मानता कामा नये ... विशेषतः रशियन समाजवाद्यांनी मार्क्सवादाचा स्वतंत्र अभ्यास केला पाहिजे. कारण हे तत्त्वज्ञान फक्त स्थूल तत्त्वे शिकविते; परंतु ही तत्त्वे इंग्लंड पेक्षा फ्रान्समध्ये निराळ्या पद्धतीने, फ्रान्सपेक्षा जर्मनीमध्ये निराळ्या पद्धतीने आणि जर्मनीपेक्षा रशियात निराळ्या पद्धतीने अंमलात आणावयाची असतात.

## संस्कृतीचा मूलाधार

संस्कृतीत ज्या अनेक गोष्टींचा अंतर्भाव होतो, त्यात स्वतःवर संयम आणि दुसऱ्याविषयी सहानुभूती या दोन मुख्य होत. माणसात आत्मनिग्रह आणि सहिष्णुता नसेल, तर त्यास असंस्कृत म्हणावयास हरकत नाही.

माणसाच्या संस्कृतीची मुळे त्याच्या राष्ट्रीय प्रतिभेत खोल गेलेली असली पाहिजेत. संस्कृतीला त्या भूमीचा वास आला पाहिजे आणि तिने आपल्या इतिहासापासून स्फूर्ती घेतली पाहिजे.

आजची संस्कृती ही काही एका राष्ट्राची अथवा एका मानव वंशाची निर्मिती अथवा मिरासदारी नाही. सर्व राष्ट्रांनी तिच्या बांधणीस हातभार

ग्रंथालय ...३६९३८ दि: ...१९७७

लावलेला आहे, आणि मग आपल्या विशिष्ट गरजांस अनुसरून तिच्यात फेरबदल करून घेतले आहेत. हिंदुस्थानाजवळ जगाला देण्यासारखा संदेश असेल – तसा तो आहे असे मला निश्चित वाटते – तर इतर राष्ट्रांच्या संदेशातून त्याला घेण्यासारखे व शिकण्यासारखेही पुष्कळ आहे.

## भारत कसा पाहिजे?

कशा तऱ्हेचा भारतवर्ष आम्हांला पाहिजे? कशा तऱ्हेचे जग व्हावे असे आम्ही इच्छितो? ... आपल्या राष्ट्रीय उद्दिष्टाबद्दल आपणांला स्पष्ट कल्पना असली पाहिजे. आम्हांला शक्तिमान व लोकसत्ताक भारत निर्माण करावयाचा आहे. ह्या भारतात प्रत्येक नागरिकाला प्रगती आणि सेवा यांविषयी समान संधी मिळेल; पैसा व प्रतिष्ठा यांविषयीची आजची विषमता नष्ट होईल आणि आपल्या शक्ती नवनिर्मितीच्या व सहकारी कार्याला लागतील. अशा भारतात जातीयवाद, अलगपणा, अस्पृश्यता, एकारलेपणा, पूर्वग्रह आणि पिळवणूक यांना स्थान राहणार नाही. धर्मस्वातंत्र्य जरूर राहील, पण धर्माला राष्ट्राच्या राजकीय व आर्थिक गोष्टीत ढवळाढवळ करू दिली जाणार नाही.

## माझे सद्भाग्य

माझ्या सद्भाग्याचे मला आश्चर्य वाटते. स्वातंत्र्ययुद्धात हिंदभूमीची सेवा करणे हाच पुरेसा मान आहे. महात्मा गांधींसारख्या पुढाऱ्याच्या नेतृत्वाखाली ती करावयास मिळणे हे तर महद्भाग्य. आपल्या देशासाठी क्लेश सोसावे लागले याहून सुदैव कोणते? आपले वैभवशाली स्वप्न मूर्तस्वरूपात येणे किंवा आपल्या कार्यात देहार्पण करावे, लागणे एवढेच काय ते ह्या सुदैवाहून उजवे असे म्हणता येईल.

## आमचे सामर्थ्य

सर्व जगाला माहीत आहे की, आमच्या लोकांची सदिच्छा व पाठिंबा हेच आमचे सामर्थ्य आहे. जबरदस्ती व जुलूम ही जुनी शस्त्रे आम्ही वापरीत नाही प्रेम आणि आत्मयज्ञ यांचे नवे शस्त्र आमच्या महान नेत्याने आमच्या हाती

दिले आहे. आम्ही स्वतः क्लेश भोगू आणि त्यायोगे आमच्या प्रतिस्पर्ध्यांचा हृदयपालट करू.

महात्मा गांधींच्या शिकवणीचा भारतावर परिणाम झाला असेल, लहानसा मानवसंघ जरी त्या तत्त्वाला चिकटून राहील, तरी असहकारिता शाश्वत राहील; आणि आपण ही तत्त्वे जाणायला नालायक ठरलो व त्यांचे आचरण करणे आपणांस अशक्य झाले, तरी मागाहून येणारी पिढी हे महान शस्त्र यशस्वी रीतीने वापरू शकेल; आणि जगाला दाखवून देईल की, युद्ध नष्ट करण्याचा व स्वातंत्र्य मिळविण्याचा हा एकच परिणामकारक मार्ग आहे.

## गांधीयुग

गांधीजींचे आगमन हे आपणांला नव्या सामर्थ्यशाली वायुलहरीप्रमाणे वाटले. आपण जरा मोकळेपणाने श्वास घेऊ लागलो. गांधींनी अंधारात घुसलेल्या प्रकाशकिरणाप्रमाणे आपल्या डोळ्यांवरील तमःपटल नष्ट केले. या झंझावाताने पुष्कळच गोष्टींत उलटापालट झाली. विशेष म्हणजे माणसांच्या मनातील विचारचक्रे बदलली.

गांधी वरच्या श्रेणीतून खाली उतरले नव्हते. लक्षावधी बहुजन समाजातून ते वर आल्यासारखे वाटत. ते ह्या लोकांची भाषा बोलत आणि त्यांच्याकडे आणि त्यांच्या दुर्दशेकडे लक्ष जावे असे मुद्दाम करीत. ‘ किसान मजूर यांच्या पिळवणुकीवर जगणारांनी त्यांच्या मानगुटीवरून दूर व्हावे, दुःख व दारिद्र्य निर्माण करणारी व समाजरचना टाकून द्यावी ’ असा गांधीजींनी आदेश दिला.

राजकीय स्वातंत्र्य या कल्पनेला नवा आशय व नवे स्वरूप प्राप्त झाले. त्यांनी सांगितलेल्यांपैकी कित्येक गोष्टी अंशतः स्वीकारल्या गेल्या आणि कित्येक तर पूर्ण धिःकारल्या गेल्या, पण हे सर्व दुय्यम महत्त्वाचे होते. सत्य आणि निर्भयता ही त्यांच्या शिकवणुकीची मुख्य सूत्रे होती; आणि या सूत्रांना त्यांनी कृतीची जोड दिली. त्याबरोबरच बहुजन समाजाचे हित त्यानी सदैव डोळ्यांपुढे ठेविले. आपल्या प्राचीन ग्रंथांत सांगितल्याप्रमाणे राष्ट्राला काय किंवा माणसाला काय ‘ अभय ’ ही सर्वांत मोठी देणगी आहे. हे अभय म्हणजे केवळ शारीरिक धैर्य नव्हे, तर मनात भीतीचा पूर्ण अभाव. आपल्या इतिहासाच्या अरुणोदयकाळी जनक व याज्ञवल्क्य यांनी सांगितले की, लोकांना

निर्भय बनविणे हे लोकनेत्यांचे काम होय. पण भारतात ब्रिटिश अमलाखाली लोकांची मुख्य भावना म्हणजे भीती हीच होती. लष्कर, पोलीस, हेरखाते यांचे भय; अधिकाऱ्यांचे भय; जुलमी कायद्यांचे व तुरुंगाचे भय; सावकाराचे भय; नेहमी उंबरठ्याशी येऊन ठेपलेल्या उपासमारीचे व बेकारीचे भय या सर्वस्पर्शी भयांविरुद्ध गांधींनी निश्चयी व गंभीर आवाजात पुकारा केला— 'भिऊ नका'... आणि संपूर्णतया नाही तरी आश्चर्य वाटावे एवढ्या प्रमाणात लोकांच्या मनातले भयपटल नष्ट झाले. भय हे असत्याचे सहकारी असते. त्यामुळे निर्भयपणा येताच त्याच्या मागोमाग सत्यही आले.

* * *

## जातीयवादाने नुकसान

भारतात काश्मीरला नेहमीच विशेष महत्त्वाचे स्थान लाभलेले आहे. भारताचा नकाशा पाहिल्यानंतर तुम्हांला असे वाटेल की, काश्मीर हा जणू काय भारताच्या डोक्यावरचा मुकुटच आहे. ते काहीही असो, काश्मीरचे खरे महत्त्व या गोष्टीमुळे आहे की, तेथील जनतेने मुस्लीमचा द्विराष्ट्रवाद कधीही मान्य केलेला नाही. जातीयवादामुळे केवळ काश्मीरचेच नव्हे तर संपूर्ण भारताचे नुकसान होईल. जातीयवाद हे मागासलेपणाचे लक्षण आहे. आधुनिक युगाशी तो पूर्णपणे विसंगत आहे. आपापल्या धर्माप्रमाणे आचरण करण्याचा लोकांना पूर्ण हक्क आहे; परंतु राजकारणात धर्म आणणे आणि देशाचे तुकडे पाडणे, म्हणजे युरोपमध्ये ३००–४०० वर्षांपूर्वी जे घडले ते करणे होय.

## स्वातंत्र्यास धोका

ज्यामुळे संपूर्ण देशाची नव्याने घडण होईल आणि त्यात नव्याने निश्चयी वृत्ती निर्माण होईल, असा अनुभव मिळण्याची आज गरज आहे असे मला वाटते. स्वातंत्र्याचे रक्षण करून ते कायम राखण्यासाठी आपल्याला किंमत चुकती करायला पाहिजे. आपण जे स्वातंत्र्य मिळविले आहे, त्याला आता धोका नाही असे समजू नका. स्वातंत्र्य मिळवायला जसे कष्ट पडले, तसेच ते कायम राखायलासुद्धा पडतील आणि ते सोसण्याची तयारी पाहिजे. आपल्या

हातून थोडा जरी निष्काळजीपणा झाला, तरी आपल्या स्वातंत्र्याला त्यामुळे धोका निर्माण होईल. आपल्या इतिहासात असे बरेच वेळा घडलेले आहे.

* * *

१९२९ मध्ये रावी नदीच्या तीरावर काँग्रेसचे जे ऐतिहासिक अधिवेशन झाले, त्यामध्ये भाषण करताना पंडित नेहरूंनी असे स्पष्ट सांगितले होते की,

" मी असे स्पष्टपणे जाहीर करू इच्छितो की मी समाजवादी व लोकसत्ताकाचा भोक्ता आहे. अमीर उमराव व राजे यांचे युग आता समाप्त झाले आहे. तसेच सत्तासंपत्तीचे केंद्रीकरण करणारी उत्पादनपद्धती व समाजव्यवस्था आमूलाग्र बदलली पाहिजे, असे मी मानतो. "

* * *

१९३७ साली नियोजन मंडळाची प्रथम स्थापना झाली तेव्हा ते म्हणाले,

" विज्ञान व यच्चयावत् तंत्रविद्येची कास धरल्याशिवाय गत्यंतर नाही. औद्योगीकरण हाच दारिद्र्यनिवारणाचा परिणामकारक मार्ग आहे. लोखंड, पोलाद, मोठमोठे कारखाने व वीज येथे तयार होईल व आपला देश स्वावलंबी बनेल असा प्रयत्न आपण नेटाने केला पाहिजे.

* * *

आत्मचरित्रातील एक उतारा :—

" हे सत्य आहे की समाजवादाने आपल्यापुढे मांडलेले मोठमोठे बदल नुसते काही कायदे करून ताबडतोब घडवून आणता येणार नाहीत. पण काही मूलभूत कायदे पाया भरण्यासाठी हवेच आहेत. मुख्य अडथळे नष्ट केले पाहिजेत. मुख्य ध्येय म्हणजे सांप्रतचे दारिद्र्य नष्ट करून भावी कालात सुबत्ता संस्थापित करावयाची आहे हे आहे. "

* * *

## पंडित नेहरूंची दूरदृष्टी

उद्याच्या भारताचे स्वरूप आपण आज श्रमपूर्वक काय करीत आहोत यावर

अवलंबून राहील. औद्योगिक व इतर क्षेत्रांत शास्त्रीय व तंत्रवैज्ञानिक ज्ञानशाखात भारत भरीव प्रगती करील, आपल्या जनतेचे जीवनमान सुधारेल, शिक्षणाचा प्रसार होईल. प्रजा निरोगी व सशक्त बनेल आणि कला व संस्कृती लोकाभिरुची सुसंपन्न करतील, याबद्दल मला मुळींच शंका नाही.

* * *

## आपला देश म्हणजेच आपण

१९४८ साली देशाला उद्देशून भाषण करीत असताना पंडितजी म्हणाले होते,

" आपण सर्व भारताविषयी बोलतो व स्वतःसाठी कसल्या ना कसल्या गोष्टीची देशापासून अपेक्षा करतो. परंतु त्या बदल्यात आपण भारतमातेला काय देतो ? आपण जे देशासाठी करू त्यापेक्षा अधिक आपणाला मिळणे शक्य नाही. जे काही प्रेम, सेवा आणि विधायक कार्य आपण देशासाठी करू, त्यापेक्षा अधिक काही आपणांस राष्ट्रमाता देऊ शकणार नाही. आपले विचार आणि आपली कृती ह्याच आपल्या देशाची घडण घडवितील. कारण हा आपला देश म्हणजेच आपण सर्व आहोत ! "

* * *

## अखेरची इच्छा

" भारतीय जनतेने माझ्यावर एवढे अपरंपार प्रेम केले आहे, एवढा जिव्हाळा तिने दाखविला आहे की, या प्रेमाची परत फेड अल्पांशानेही करणे केवळ अशक्य आहे. खरे म्हणजे प्रेमासारख्या दिव्य भावनेची परतफेड तरी कशी होणार ? अनेकांचे कौतुक झाले, कांही जणांना लोकांनी पूजनीय मानले, पण माझ्या वाट्याला भारताच्या सर्व भागातील, सर्व थरातील जनतेचे जे प्रेम आले, त्यामुळे मी भरावून गेलो आहे. माझ्या उरल्या सुरल्या आयुष्यात या जनतेला व तिच्या प्रेमाला मी पात्र ठरो, एवढी एकच आशा मी व्यक्त करतो. माझे अनंत सहकारी व अगणित मित्र यांचे ऋण तर कधीच फिटणार नाही. अनेक महान कार्यांत हातात हात घालून कामे केली, ती

करीत असताना विजय मिळाला तर विजयाचे किंवा दुःख भोगावे लागले तर त्या दुःखाचेही आम्ही भागीदार झालो होतो.

" मृत्यूनंतर माझ्यासाठी कोणताही धार्मिक विधी केला जाऊ नये, असे मला अगदी मनापासून जाहीर करावयाचे आहे. अशा कर्मकांडावर माझा मुळीच विश्वास नाही. केवळ औपचारिक गोष्ट म्हणून सुद्धा अशा धार्मिक विधींना बळी पडणे म्हणजे एक प्रकारचे ढोंगच ठरेल. त्यामुळे आपली फसवणूक होते असे माझे स्पष्ट मत आहे.

" माझ्या निधनानंतर माझ्या देहाचे दहनच करावे. माझा मृत्यू परदेशात झाला तर दहन त्या देशात करून रक्षा मात्र अलाहाबादला पाठवावी. यापैकी मूठभर रक्षा गंगेत विसर्जन करावी आणि उरलेल्या राखेची विल्हेवाट खाली लिहिल्याप्रमाणे करावी. या पैकी चिमूटभर सुद्धां राख राखून ठेवू नये.

" माझ्या देहाच्या राखेपैकी मूठभर राख गंगेत टाका, असे माझ्या देहापुरते बोलावयाचे तर मी कोणत्याही धार्मिक भावनेने सांगितलेले नाही. आलाहाबादजवळून वाहात जाणाऱ्या गंगा व यमुना नद्यांशी लहानपणापासूनच मी मनाने बांधला गेलो आहे. जसजसा मी मोठा होत गेलो, तसतसे हे बंधनही अधिकाधिक दृढ होत गेले. जसजसे ऋतू बदलत जातात, तसतसे गंगा यमुनांचे रूप आणि वृत्ती बदलत जातात. ही त्यांची बदलती रूपे मी मनात कोरून ठेवली आहेत. अनेक वेळा या रूपांच्या पलीकडे जाऊन या नद्यांची गाणी मी ऐकली आहेत; त्यांच्या अनादी प्रवाहाबरोबर वाहात आलेल्या कथांचे मी श्रवण केले आहे. या नद्यांची प्राचीन परंपरा त्यांचा इतिहास व पुराणातून त्यासंबंधी असलेले उल्लेख यांच्यावर मी कितीतरी विचार केला आहे.

" या नद्या, विशेषतः गंगा सर्वार्थाने भारताची नदी आहे. गंगेवर भारतातील जनतेचे अलोट प्रेम आहे. गंगानदीच्या भोवती भरत वंशाची अनेक संस्मरणे गुंफली आहेत; भारताच्या आशाअकांक्षा, जयपराजय, यांची गंगा ही साक्षीदार आहे. भारतमातेच्या विजयाची गाणी तिने ऐकली आणि पराभवाचा आक्रोशही तिने ऐकला. गंगा हीं भारताच्या प्राचीनतम संस्कृतीचे व जीवनप्रवाहाचे प्रतीक आहे. हा जीवनप्रवाह बदलत राहातो, वाहत राहतो, पण त्याचे प्रतीक मात्र गंगाच राहते.

" गंगेकडे पाहिले म्हणजे मला हिमालयाच्या बर्फाच्छादित शिखरांची आणि खोल खोल दऱ्यांची आठवण होते. त्यांच्यावर मी फार फार प्रेम केले आहे. या हिमशिखरांप्रमाणेच मला गंगानदीकडे पाहून समृद्ध आणि विस्तीर्ण अशी दुआबातील मैदाने आठवतात. याच प्रदेशात माझे जीवन घडले आहे. जीवनकार्य ठरले आहे.

" सकाळी सूर्यकिरणांच्या कोवळ्या प्रकाशात गंगा कशी स्मितहास्य करीत, नाचत बागडत चाललेली दिसते, पण एकदा का संध्याछायांचे आवरण पडले म्हणजे तिचा प्रवाह कसा खिन्न आणि गूढ भासू लागतो. हिवाळ्यात रोडावतो खरा, पण गंगा कशी मंदगतीने आणि डौलाने वाहत जाते! पावसाळ्यात तिचा प्रचंड प्रवाह कसा घनगर्जना करीत येतो. त्या वेळचे त्याचे रूप म्हणजे भरदार छातीच्या सागराचेच जणू दर्शन; आणि त्या प्रवाहात सागराप्रमाणेच विध्वंसकतेचे सुप्त सामर्थ्य! वर्तमानकाळातून वाहत वाहत भविष्यकाळाच्या महान सागरात एकरूप होणाऱ्या भारताच्या भूतकालाचे गंगा हे मला प्रतीक वाटते, भव्य स्मारक वाटते.

" अनेक जुन्या परंपरा व रूढी मी टाकून दिल्या आहेत. भारतीय जनतेत भेदाभेद उत्पन्न करणाऱ्या, अगणित लोकांना दडपून ठेवून त्यांची भौतिक व आध्यात्मिक उन्नती रोखून धरणाऱ्या सर्व प्रकारच्या बंधांतून भारत मुक्त झाला पाहिजे असे मी सांगत आलो आहे. हे सर्व घडावे असेच मला नेहमी वाटत असले, तरी भूतकालाशी पूर्णतः फारकत घ्यावी असे मला कधीच वाटत नाही. आपला महान सांस्कृतिक वारसा हे माझेही अभिमानाचे निधान आहे. भारताच्या अनंत अशा भूतकालापैकी इतिहासाचा श्रीगणेशा जेव्हापासून लिहिता येतो, तेथपासूनच्या ज्ञात भूतकालापासून जी एक अक्षुण्ण व अखंड अशी परंपरा चालत आली आहे, त्या परंपरेचा मी एक दुवा आहे, याची जाणीव माझ्या मनात सतत जागती आहे. परंपरेची ही साखळी मी तोडणार नाही. ही परंपरा म्हणजे माझा अमोल ठेवा आहे. त्याच्यापासून मी सतत स्फूर्ती घेत आलो आहे.

" माझ्या या सर्व मनीषांचा, भावभावनांचा साक्षीदार असलेल्या माझ्या देहाची थोडी तरी राख म्हणूनच गंगेत पडावी अशी माझी विनंती आहे. भारताच्या सांस्कृतिक परंपरेला माझा तो अखेरचा प्रणिपात आहे. अला-

हाबादला गंगेत टाकलेली ही राख आपोआपच सागराला मिळेल-जो सागर भारतमातेच्या चरणतलांना रोज स्नान घालतो !

" मात्र मूठभर राखेचे गंगेत विसर्जन केल्यावर जी राख उरेल, ती विमानातून उंच आकाशात न्यावी आणि उंचावरूनच ती भारतभूमीवर टाकावी, ज्या ठिकाणी भारतातील शेतकरी काबाडकष्ट करतो त्या शेतात ती पडावी. तिथल्या मातीत मिसळून जावी, तिथल्या धुळीशी ती एकजीव व्हावी. भारताच्या भूमीचाच तो एक अंश बनावा. हीच माझी अखेरची इच्छा आहे. "

## अलौकिक अविस्मरणीय नेता

( प्रसिद्ध लेखिका पर्ल बक )

प्रत्येक शतकात मानवी जीवनावर प्रभाव पाडणाऱ्या काही व्यक्ती होऊन जातात. जवाहरलाल नेहरू त्यांपैकीच एक होते. गेली कित्येक वर्षे इतर कोठल्याही व्यक्तीपेक्षा ते जगातील सर्व पौर्वात्य तसेच पाश्चिमात्य देशांवर अधिक प्रभाव पाडीत होते. आणि तो प्रभाव सदैव हितकर असाच असे. त्यांची ओळख न पटलेले लोक त्यांच्यावर अनेक वेळा टीका करीत, तेव्हाही त्यांनी आपला प्रभाव पाडला. परिणामी आज ते आपल्या स्वतंत्र वृत्तीमुळे जगद्वंद्य झाले असून लोकांनी त्यांच्यावर अमाप प्रेम व्यक्त केले आहे.

ते सदैव नेतेच राहिले. मला आठवते, तरुणपणी त्यांनी महात्माजींचे अनुयायित्व पत्करले, तेव्हाच मी त्यांची चहाती झाले. महात्माजींना मी मानीत असे. ती एक प्रभावी व्यक्ती होती. तथापि तरुण जवाहरलाल आपले मन आणि इच्छाशक्ती स्वतंत्र ठेवूनही महात्माजींबद्दल गाढ प्रेम व आदर दर्शवीत, याचे मला आश्चर्य वाटत असे. मतभेद झाला असता मान न तुकविण्याचा त्यांचा गुण म्हणजे त्यांच्या मोठेपणाचे लक्षण होते आणि हाच गुण पुढे उत्कटतेने प्रकर्षाला आला.

माझ्या देशाच्या पुढाऱ्यांना पुष्कळ प्रसंगी पंतप्रधानांचे मनोगत समजू शकले नाही, याबद्दल मी खेद व्यक्त केला आहे. त्याचप्रमाणे श्री. नेहरू यांनी प्रतिटोला कधी दिला नाही वा कटुताही निर्माण केली नाही. यातच त्यांचे मोठे-पण सामावलेले आहे. त्यांची राजकीय भूमिका किती अचूक होती, ते गेल्या

काही वर्षांत दिसून आले आहे. त्यांच्या नेतृत्वाखाली भारत हा पौर्वात्य व पाश्चिमात्य देशांचे केंद्रस्थान बनला व उभयतांना समजेल अशी भाषा भारतीय बोलू लागले. मानवी इतिहासाच्या अत्यंत आणीबाणीच्या काळात जवाहरलाल नेहरू यांनी आपल्या देशातील अनेक भाषांच्या व धर्मांच्या जनतेला संघटित करून हा देश अनेक शतके भक्कम पायावर उभा राहील इतका बलशाली केला.

श्री. नेहरूंच्या इतर गुणांचाही मला विसर पडलेला नाही. त्यांचा स्वभाव, गोड व्यक्तित्व, त्यांची बुद्धिमत्ता, वागणूक सारे काही अलौकिक होते. अधिक शांतता लाभली असती, तर ते सृजनशील लेखक म्हणून अधिक चमकले असते. त्यांची शैली लोकविलक्षण होती. त्यांनी सारी बुद्धिमत्ता राजकीय जीवनासाठी वाहिली नसती, तर त्यांनी आणखी कितीतरी ग्रंथसंपदा निर्माण केली असती. ती केली नाही याबद्दल मला हळहळ वाटते. त्यांनी जे काही थोडे ग्रंथ लिहिले आहेत, त्यांना मूलभूत महत्त्व आहे. तथापि मला असे वाटते की, भारताला त्यांच्या ग्रंथांपेक्षाही त्यांनी देशाचे जे सतत नेतृत्व केले, त्याचीच अधिक गरज होती.

कोणत्याही दृष्टीकोनातून पाहता जवाहरलाल ही एक अविस्मरणीय व्यक्ती आहे. महात्माजींच्या छायेत त्यांनी आपल्या जीवनास प्रारंभ केला, परंतु लवकरच ते आपल्या पराक्रमाने तळपू लागले; आणि केवळ आधुनिक भारतातील सर्वश्रेष्ठ व्यक्ती म्हणूनच नव्हे, तर अखिल जगातील बोटावर मोजण्याइतक्या खऱ्या अर्थाने थोर व्यक्तींपैकी एक म्हणून अढळस्थान त्यांनी प्राप्त करून घेतले आहे. त्यांची माझी भेट झाली आणि त्यांच्या दिव्यवाणीने मी पुनीत झाले. हा माझा सर्वश्रेष्ठ ठेवा आहे असे मला वाटते.

## त्यांची स्मृति चिरंतन राहील

( खास राजपत्रातील गौरव )

नवी दिल्ली, ता. ३० मे १९६४ — पंतप्रधान जवाहरलाल नेहरू यांच्या निधनाबद्दल तीव्र शोक व्यक्त करणारे काळ्या चौकटीतील खास राजपत्र भारत सरकारने आज प्रसिद्ध केलेले आहे.

या राजपत्रात म्हटले आहे की, राष्ट्रपित्याच्या निधनानंतर पुन्हा एकदा राष्ट्राची अतिशय मोठी हानी श्री. नेहरूंच्या देहावसानामुळे झाली. श्री. नेहरू

जेवढे भारताचे तेवढेच अखिल मानवजातीचेही होते. म्हणूनच ह्या थोर व्यक्तीच्या महानिर्वाणामुळे सारे जग शोकाकुल झाले आहे.

श्री. नेहरू आधुनिक भारताचे प्रमुख निर्माते होते. राष्ट्राचे स्वातंत्र्य व ऐक्य यांच्याइतकेच जागतिक शांती व समृद्धी यांना त्यांनी आपले जीवन वाहिले होते. १९४८ मध्ये पॅरिस येथे युनो आमसभेच्या तिसऱ्या अधिवेशनापुढे ते प्रथम बोलले. युनोपुढे शेवटचे भाषण त्यांनी १९६० मध्ये केले, तेव्हा त्यांनी जागतिक शांततेची व त्यासाठी बड्या राष्ट्रांतील स्नेहसंबंध पुन्हा प्रस्थापित होण्याची आवश्यकता प्रतिपादन केली होती.

## अण्वस्त्र करारावर पहिली स्वाक्षरी

तीन अणुराष्ट्रांत १९६३ च्या ऑगस्टमध्ये झालेल्या अंशतः अण्वस्त्र चाचणी बंदी करारावर पहिली स्वाक्षरी भारतातर्फे त्यांनी केली.

लोकशाही चौकटीत राहून राष्ट्राचा नियोजनबद्ध आर्थिक विकास करण्याची त्यांची कल्पना तर अविस्मरणीय आहे. भारतास स्वातंत्र्य मिळण्यच्यापूर्वीच त्यांनी ही गरज ओळखली होती. त्या दृष्टीने १९३६ मध्ये अखिल भारतीय कॉंग्रेसने राष्ट्रीय नियोजन समिती स्थापन केली होती. स्वातंत्र्यप्राप्तीनंतर या प्रयत्नास फळ आले. नियोजन मंडळ स्थापन झाले आणि १९५१ पासून आपल्या पंचवार्षिक योजनांच्या ऐतिहासिक मालिकेस भारताने सुरुवात केली.

जवाहरलाल नेहरू उत्कृष्ट साहित्यिक होते. बंदीशालेतील रिकाम्या वेळात त्यानी आत्मचरित्र लिहिले. ' कन्येला पत्रे ', ' ग्लिम्प्सेस ऑफ वर्ल्ड हिस्ट्री ' आणि ' डिस्कव्हरी ऑफ इंडिया ' ही त्यांची ग्रंथरत्ने साहित्यात चिरंजीव आहेत.

त्यांची स्मृती भारतीय व जगातील जनतेच्या अंतःकरणाला चिरंतन जागती राहील. कारण गुरुदेव रवींद्रनाथ टागोरांच्या शब्दांत सांगावयाचे म्हणजे, " सत्यामुळे धोका येतो म्हणून जवाहरलालने सत्य कधी टाळले नाही; किंवा हितकारक ठरण्याची शक्यता आहे म्हणून असत्याची कास धरली नाही ! "

## पंडितजींचे लोकोत्तरत्व

भारताचे राष्ट्रपती डॉ. सर्वपल्ली राधाकृष्णन् यांच्या एका भाषणातील

( जवाहरलाल नेहरू स्मारक निधीच्या राष्ट्रीय समितीच्या पहिल्या बैठकीत केलेल्या ) महत्त्वाचा भाग :—

गेल्या पन्नास वर्षांचा काळ हा आपल्या राष्ट्राच्या इतिहासात फार मोठा घडामोडीचा काळ होऊन गेला. या काळात प्रथम महात्मा गांधी आणि नंतर पंडित नेहरू हे आपले नेते होते. या काळात निर्माण झालेल्या तत्त्वांचा आपल्या घटनेत आपण अंतर्भाव केला. संसदीय लोकशाही, कायद्याचे अधिराज्य आणि प्रातिनिधिक संस्था यांचा आपण स्वीकार केला. घटनापरिषदेत, हंगामी लोकसभेत, पंडितजी म्हणजे मार्गदर्शक ध्रुवतारा होते, लोकसभेला आपल्या स्वातंत्र्याचे व लोकशाहीचे अधिष्ठान हे स्थान त्यांनी मिळवून दिले. असहिष्णूशीही ते सहिष्णुवृत्तीने वागत. लोकसभेतील मताधिक्याचा गैरवापर त्यांनी केला नाही. कायदा मंत्र्याना ॲटर्नी जनरल नेमण्याबाबत किंवा १८ व्या घटना दुरुस्तीबाबत लोकमत प्रतिकूल दिसताच त्यांनी आपले टाकलेले पाऊल मागे घेतले. आपल्या मताबद्दल नेहरू हट्टाग्राह चालवीत नसत. नवीन विचारांचा स्वीकार करीत व लोकमताचा आदर राखीत.

आपल्या मनातही ह्या लोकशाही प्रवृत्तींनी मुळे धरली आहेत. हे नेहरूंच्या निधनानंतर सत्ताबदलाचे कार्य ज्या प्रकारे झाले त्यावरूनच सिद्ध झालेले आहे.

नेहरूंचा व्यक्तिस्वातंत्र्यावर गाढ विश्वास होता. मानवतेच्या नावावर व्यक्तीचा बळी देऊ नये आणि राज्य व संघटनांच्या चरकात व्यक्तिस्वातंत्र्य चिरडले जाऊ नये हे त्यांचे तत्त्व होते. सरकार हे व्यक्तीसाठी आहे ,व्यक्ती सरकारासाठी नव्हे, असे त्यांचे मत होते.

## नेहरूंची विज्ञान निष्ठा

देशाच्या विकासासाठी नेहरूंनी विज्ञानाची कास धरली. आपल्या देशात आता विज्ञानाचे महत्त्व वाढत आहे. पंडितजी अणुशक्ती मंडळाचेही अध्यक्ष होते. अण्वस्त्रे बनविण्याइतकी भारत आणि कॅनडा यांची तयारी आहे असे बीटन व मेडॉक्स यांनी आपल्या पुस्तकात लिहिले आहे. १९६३ साली चीन अण्वस्त्र तयारी करू शकेल पण भारताची इच्छा असेल तर त्याही आधी तो अण्वस्त्र बनवू शकला असता, असे या लेखकांनी म्हटले आहे. परंतु अणुशक्तीचा फक्त विधायक कामासाठीच उपयोग करू असा स्पष्ट निर्धार

आपण व्यक्त केला आहे. पण खरे महत्त्व या शास्त्रीय विजयांना नसून शास्त्रीय मनोवृत्ती निर्माण करण्याला आहे. आपण बहुतेकजण पढिक शास्त्रज्ञ आहोत. प्रयोगशाळेतून घरी आलो की रूढ समजुतींचा अंमल आपल्यावर पडू लागतो. ग्रामीण भागात हे जास्त आढळून येते. या मनोवृत्तीवर नेहरूंनी हल्ला केला. वाईट रूढींना नेस्तनाबूत करण्यासाठी ते झगडले.

## सौंदर्याचे व कलेचे भोक्ते

नेहरूंना मुले आवडत आणि मुलांना नेहरू! आपल्या मुलांना उत्तम नागरिक बनवू शकलो नाही, त्यांच्या अंगच्या उत्साहाला आपण वाव देऊ शकलो नाही, तर त्यांच्याबद्दलच्या आपल्या प्रेमाला काय अर्थ आहे? पंडितजी सौंदर्याचे आणि कलेचे भोक्ते होते. या सर्वांनी त्यांचे हृदय हेलावून जाई. हास्य आणि शोक यांनी हे विश्व बनले आहे. एका श्लोकात म्हटल्याप्रमाणे एकीकडे 'वीणावाद्यम्' तर दुसरीकडे 'हा हंत रुदितम्' एकीकडे 'रम्यानारी' तर दुसऱ्या बाजूस 'जराजर्जरवपु' एकीकडे 'विवाद गोष्टी' चाललेल्या आहेत, तर दुसऱ्या बाजूस 'सुरामात्य कलह', असे विश्व आहे तरी काय? अमृत, माया की विश्वमाया? जीवनातील ही विश्वमाया, या अमंगल गोष्टी दूर करण्यासाठी नेहरू झटले. मानवाचे अश्रू पुसून टाकण्यासाठी त्यांनी आपले जीवन वाहिले.

## हे विश्वची माझे घर

आजच्या जमान्यात 'परराष्ट्रसंबंध' हा वाक्प्रचार असंबद्ध आहे असे नेहरूंचे मत होते. सध्या सर्वच राष्ट्रे एकमेकांवर अधिकाधिक अवलंबून राहत आहेत. यासाठी सर्व जगाचा विचार करावा लागेल. एका राष्ट्राचा संकुचित विचार आपण करीत नाही. युद्ध अटळ नाही आणि शांतता अव्यवहार्य नाही, अशी नेहरूंची श्रद्धा होती. जगावर हुकमत गाजविण्यासाठी बड्या राष्ट्रांची अहमहमिका लागली आहे. त्यापासून अलिप्त राहण्यासाठी आणि देशाला आचार-विचाराचे स्वातंत्र्य राहावे म्हणून अलिप्तवादाचा त्यांनी पुरस्कार केला. जगातील कलह शक्य तेथे दूर कर यात भारताचा हातभार असावा, अशी पंडितजींची इच्छा होती. राष्ट्रसंघाच्या ध्येय धोरणाला म्हणूनच त्यांनी

दुजोरा दिला; आणि गाझा पट्टी, कोरिया इत्यादि विभागात आपण शांती-सैनिक पाठविले.

या सर्वांसाठी एक विशिष्ट मनोवृत्ती पाहिजे. नव्या जगाला नवा माणूस मिळाला पाहिजे. राग, भय, क्रोध यांच्यावर विजय मिळविलेला आणि निर्मोही असा नवमानवच नव्या व तेजस्वी जगाला शोभू शकेल. नेहरूंच्या रूपाने आपल्यापुढे एकमेवाद्वितीयम् असे महान उदाहरण आहे, त्याचे अनुकरण आपण करू या.

## पंडितजी लोकदेव होते

" पंडितजी राष्ट्रनेते होते तसेच ते लोकनेतेही होते. दोन्ही प्रकारचे नेतृत्व एका माणसात एकवटलेले क्वचितच सापडते. पंडितजींच्या कर्तृत्वाचा विशेष तो हाच ! " अशा शब्दात आचार्य विनोबा भावे यांनी पंडित नेहरुंना श्रद्धांजली वाहिली.

वर्धा जिल्ह्यातील ससुंद्रा गावी घेतलेल्या एका शोकसभेत ते बोलत होते. ( अमरावतीची १ जून १९६४ ची बातमी ) " पंडितजी एका बाजूला राष्ट्र पुरूष होते तसेच ते विश्वपुरुषही होते. राष्ट्राचे व विश्वाचे हित ही एक-रूपच असतात अशी त्यांची श्रद्धा होती व त्या दृष्टीनेच त्यांचे कार्य चालू होते. हे कार्य आता आपणांस पुढे चालवावयाचे आहे.

" पंडितजींचे ध्येयचित्र विश्वाएवढे होते ! न कोण्या प्रांताचा अभिमान, न एखाद्या भाषेचा आग्रह, न कोण्या धर्मपंथाशी चित्ताचे संबंध ! जगात ते कोठेही गेले तरी जो लोकसमूह त्यांच्यासमोर उभा राहत असे, त्याला पाहून त्यांच्या चित्तात भावाला भेटल्याचा आनंद होत असे. उपनिषदात म्हटले आहे की, 'मातृदेवो भव, पितृदेवो भव, आचार्य देवो भव, अतिथिदेवो भव.' त्या भाषेत बोलावयाचे झाल्यास पंडितजी लोकदेव होते. लोकच त्याचा देव होता. आणि लोकांना पाहून त्यांचे हृदय उचंबळून येत असे. असा मनुष्य देह सोडून गेला तर कुठे जाईल ? तो ' लोकात्मा ' होईल, लोकांतच राहील. लोकहृदय जोडण्याचे काम तुम्ही आम्ही खेड्यापाड्यांचे लोक आणि नगराचे नागरिक कशा रीतीने करीत आहोत, ते पाहावयाला वारंवार आमच्यामध्ये ते येतील. आम्हांला सोडून ते गेलेले नाहीत.

## या युगातील एक महापुरूष

पंडित जवाहरलाल नेहरू यांचे जिवलग मित्र आणि आपल्या महाराष्ट्र राज्याचे माजी राज्यपाल श्री. श्रीप्रकाश यांचा एक लेख पंडितजींच्या मृत्यूनंतर-प्रकाशित झाला आहे. त्यातील थोडासा भाग :—

जवाहरलालजींचा कामाचा उरक विलक्षण होता यात शंका नाही. अनेकविध कामे करण्याच्या, अनेक कार्यक्रमांना जाण्याच्या आणि देशभरच नव्हे, जगभर प्रवास करण्याच्या अविश्रांत व्यापात त्यांना चिंतनास असा अतिशय थोडा वेळ मिळे. या युगातला हा एक महापुरुष होता हे निश्चित आणि असा युगपुरुष आपल्यात जन्मला व आपल्या देशाची मान त्याने जगात उन्नत केली, याबद्दल आम्हांला सहर्ष अभिमान वाटणे साहजिकच आहे.

जवाहरलालजींचे हे कार्य फार मोठे आहे. पण दुसऱ्याही एका बाजूचा आपण विचार केला पाहिजे, तरच आपले कर्तव्य व जबाबदारी यांचा आपल्याला विसर पडणार नाही. प्रत्येकाला काही ना काही मर्यादा असतात. आपल्या थोर पंत प्रधानांनाही त्या होत्या. कोणताही माणूस प्रत्येक गोष्ट करू शकेलच अशी अपेक्षा करणे चूक ठरेल. आपले ओझे आपणां सर्वांना मिळून उचलावयाचे आहे. थोर व्यक्ती आपल्यांत असते तेव्हा, लोक तिच्या प्रभावाने भारलेले असतात, ती म्हणेल त्याला 'हो 'कार देतात; तिला विरोध करावयाचे धैर्य त्यांच्यात नसते. प्रत्येक गोष्ट ते त्या व्यक्तीवर सोपवून टाकतात, स्वतःची शक्ती त्यासाठी खर्च करीत नाहीत.

आज जवाहरलालजी आम्हांला सोडून गेले आहेत. आत्मसंतुष्ट राहून आपल्याला चालणार नाही. आपल्यापुढे उभा असलेला कामाचा डोंगर उपसण्यास आणि अडचणींना तोंड देण्यास आपण आता सज्ज झाले पाहिजे.

## पंडितजींचा वारसा

दिल्लीच्या संसदेचे एक सदस्य बॅ. नाथ पै यांनी पंडितजींच्या निधनानंतर लिहिलेल्या एका लेखातील काही भाग :—

पंडित जवाहरलाल म्हणजे आपल्या स्वातंत्र्यलढ्याचा निर्भय सेनानी! त्यांनी सरंजामदारी युगातून देशाला आधुनिक युगात आणण्याची अतोनात

खटपट केली. सामान्यातून त्यांनी आपल्याला असामान्यत्वाच्या पदवीला पोचविले. दैववादाच्या बेड्यांतून त्यांनी आमची सुटका केली; आणि मानवी पुरुषार्थाबद्दल त्यांनी आमच्यामध्ये नवश्रद्धा रुजविली...

त्यांचे थोर मन म्हणजे कुबेराचा कधी रिता न होणारा आपला राष्ट्रीय खजिना होता. ... एखादी गोष्ट त्यांच्याशी निगडित झाली म्हणजे तिला एक वेगळाच भव्यपणा येई, एक नवे ओज चढे. राजकारणातला भोंगळपणा काढून टाकण्याचा त्यांचा प्रयत्न होता. लोकजीवनातील जडता दूर करण्याची त्यांची धडपड होती. भारतीय समाज हा तेजस्वी, पुरुषार्थप्रवण आणि ध्येयासक्त व्हावा ही त्यांची तळमळ होती; आणि त्यांचे स्वतःचे जीवन या गुणांनी मंडित झालेले होते. ते हाडाचे लढवय्ये होते. पण त्यांच्या लढण्यात कुठे कटुता, रांगडेपणा किंवा असभ्यता नव्हती.

तात्कालिक हानीलाभाच्या पलीकडचे पाहाण्याची त्यांची दृष्टी होती. भविष्यातील भव्यतेकडे त्यांचे अंतःकरण झेपावत असे. नित्यानित्याचा विवेक त्यांचा कधी सुटलेला दिसला नाही. त्यांच्या निधनाने या गोष्टीला आपण आचवलो आहो. परंतु आपली ही थोर परंपरा आपल्याला जतन करावयाची आहे. त्यातली कृतार्थता अनुभवायची आहे. ज्या ज्या वेळी आपण पूर्वग्रह बाजूला सारू, सहिष्णुता हा आपला व्यवहार धर्म होईल व कुठल्याही दंडेला-पुढे मान न वाकविण्याचा आपण निर्धार करू, त्या त्या वेळी पंडित नेहरूंचा वारसा आपल्याला अभिमानाने सांगता येईल.

१४४४६

मराठा ग्रंथ संग्रहालय, ठाणे. स्थळप्रत.
अनुक्रम ३८८३८ वि: धारेम
क्रमांक ९२२८ नोंद दि: स्थळप्रत

REFBK-0014446